# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

**बी. ए. भाग–१ इतिहास**

**सत्र–१ : पेपर– OE-I**

# मराठा किल्ले

**(Maratha Forts)**

**सत्र–२ : पेपर– OE-II**

# निवडक किल्ल्यांचा अभ्यास

**(Study of Select Forts)**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२४
बी. ए. भाग - १ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-48427-05-2

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. के. बी. पाटील** (सदस्य सचिव)
प्र.संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**अभ्यासमंडळ : इतिहास**

अध्यक्ष - **डॉ. चंद्रवदन मोहनराव नाईक**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर

- **डॉ. अवनिश आर. पाटील**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. अभयकुमार जगन्नाथ पाटील**
  सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड,
  ता. कराड, जि. सातारा

- **डॉ. श्रीमती आरती बळवंत नाडगौडा**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती कविता अशोक गगराणी**
  द न्यू कॉलेज, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती उर्मिला एन. क्षिरसागर**
  मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली

- **डॉ. जयपाल चंद्रकांत सावंत**
  शंकरराव जगताप आर्टस कॉलेज, वाघोली, ता. सातारा

- **डॉ. संभाजी आनंदा मोरे**
  एम. एच. शिंदे महाविद्यालय, तिसंगी, ता. गगनबावडा,
  जि. कोल्हापूर

- **डॉ. प्रमोदकुमार अंकुश ओलेकर**
  आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा, ता. वाळवा,
  जि. सांगली

- **डॉ. चंद्रकांत संदिपान चव्हाण**
  इतिहास अधिविभाग, वालचंद कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड
  सायन्स, अशोक चौक, सोलापूर

- **डॉ. तेजस मदन घारगे**
  डायरेक्टोरेट ऑफ आर्किओलॉजी ॲण्ड म्युझियम, संत
  गोर्गे फोर्ट, संत गोर्गे हॉस्पिटल प्रिमाईसेस, फोर्ट, मुंबई

- **डॉ. नंदा पारेकर**
  एव्हरग्रीन होम, टॉवर डी, फेज ४, फ्टॅट नं. २०८,
  राजहंस प्रिंटींग प्रेस समोर, प्रभू हॉस्पिटल रोड,
  नागाळापार्क, कोल्हापूर

- **डॉ. निरंजन कुलकर्णी**
  इतिहास अधिविभाग, मा. श्री. आण्णासाहेब डांगे, आर्टस,
  कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, हातकणंगले, जि. कोल्हापूर

- **श्री. सदानंद कदम**
  शिवराज, १०८२, दक्षिण वसंत नगर, छत्रपती शिवाजीराजे
  मार्ग, सांगली.

# प्रस्तावना

शैक्षणिक वर्ष २००७ पासून शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, यांच्या वतीने दूरशिक्षण केंद्रामार्फत बहि:स्थ विद्यार्थ्यांना दूरशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच यंदाच्या वर्षापासून म्हणजे २०२४-२५ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारीत अभ्यासक्रम राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने, बी. ए. भाग-१ इतिहास या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी ''**मराठा किल्ले**'' या विषयाचे सत्र-१ तसेच ''**निवडक किल्ल्यांचा अभ्यास**'' सत्र-२ साठीचे स्वयं अध्ययनाचे हे पुस्तक सन २०२४-२५ या वर्षात तयार केले आहे. सदर पुस्तकाच्या लेखनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पदवी व पदव्युत्तर विभागात अध्ययन करणाऱ्या अनुभवी व तज्ज्ञ लेखकांकडून या विषयाच्या अभ्यासक्रमानुसार असलेल्या विविध घटकांचे लेखन करून घेण्यात आले आहे. या पुस्तकातील विविध घटक लिहिताना साधी व सोपी भाषा, संकल्पनात्मक स्पष्टता, विषयाच्या आकलनासाठी तक्ते इत्यादींचा वापर केलेला आहे. वाचक व विद्यार्थ्यांना समजेल अशी विषयाची सोपी व सुटसुटीत मांडणी करण्यात आलेली आहे. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयं अध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे दिलेली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, शब्दार्थ व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे.

**मराठा किल्ले** या स्वयं अध्ययन साहित्यामध्ये ओळख, मराठाकालीन किल्ल्यांचे स्वरूप आणि वास्तूकला आणि **निवडक किल्ल्यांचा अभ्यास** या स्वयं अध्ययन साहित्यामध्ये महाराष्ट्रामधील किल्ले, भारतातील किल्ले इ. घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र अंतर्गत स्वयं अध्ययन साहित्य निर्मितीसाठी मा. कुलगुरू यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन मोलाचे ठरले. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक, समन्वयक यांचे सहकार्य लाभले. सदर पुस्तक पूर्ण करण्यासाठी घटक लेखकांनी तसेच पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. या सर्वांच्या मार्गदर्शनाबद्दल व सहकार्याबद्दल मन:पूर्वक आभार!

**■ संपादक ■**

**डॉ. तानाजी हवालदार**
विश्वासराव नाईक आर्टस, कॉमर्स अ‍ॅण्ड बाबा नाईक
सायन्स महाविद्यालय, शिराळा,
ता. शिराळा, जि. सांगली

**डॉ. धीरज शिंदे**
श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या
महाविद्यालय, इचलकरंजी,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

| | |
|---|---|
| दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र | **मराठा किल्ले** |
| शिवाजी विद्यापीठ, | **निवडक किल्ल्यांचा अभ्यास** |
| कोल्हापूर | **बी. ए. भाग–१ इतिहास सत्र–१ व २** |

| **लेखकाचे नाव** | **घटक क्रमांक** | |
|---|---|---|
| | **सत्र–१** | **सत्र–२** |
| **डॉ. उमेश जांभोरे**<br>यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर,<br>ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर | १ | – |
| **डॉ. सुरेश शिखरे**<br>श्री. शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर | २ | – |
| **डॉ. धीरज शिंदे**<br>श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी | – | १ |
| **डॉ. तानाजी हवालदार**<br>विश्वासराव नाईक आर्टस, कॉमर्स ॲण्ड बाबा नाईक<br>सायन्स महाविद्यालय, शिराळा, जि. सांगली | – | २ |

**■ संपादक ■**


**डॉ. तानाजी हवालदार**
विश्वासराव नाईक आर्टस, कॉमर्स ॲण्ड बाबा नाईक
सायन्स महाविद्यालय, शिराळा,
ता. शिराळा, जि. सांगली

**डॉ. धीरज शिंदे**
श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या
महाविद्यालय, इचलकरंजी,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सत्र–१ : मराठा किल्ले** | |
| १. | ओळख | १ |
| २. | मराठाकालीन किल्ल्यांचे स्वरूप आणि वास्तूकला | २२ |
| | **सत्र–२ : निवडक किल्ल्यांचा अभ्यास** | |
| १. | महाराष्ट्रातील किल्ले | ४३ |
| २. | भारतातील किल्ले | ७३ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

---

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्यास साहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२४-२५ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक १
# ओळख
## (Introduction)

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

१.२.१ किल्ला: व्याख्या आणि मुख्य प्रकार

१.२.२ किल्ले बांधणीची गरज

१.२.३ मराठ्यांच्या इतिहासात किल्ल्याचे महत्त्व

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## १.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला पुढील उद्दिष्ट्ये स्पष्ट करता येतील.

- किल्ला म्हणजे काय ते समजेल तसेच किल्ल्यांच्या व्याख्या स्पष्ट करता येतील.
- मराठाकालीन किल्ल्यांचे विविध प्रकार स्पष्ट करता येतील.
- मराठाकालीन किल्ले आणि त्यांच्या बांधणीची गरज याविषयी माहिती घेता येईल.
- छत्रपती शिवाजी महाराजांचे किल्ले बांधणी संबंधीचे धोरण विशद करता येईल.
- स्वराज्य निर्मिती, विस्तार व दृढीकरणामध्ये किल्ल्यांच्या महत्त्वांचे विवेचन करता येईल.

## १.१ प्रस्तावना :

प्राचीन ते आधुनिक काळाच्या आरंभापर्यंत राज्य संरक्षणाच्या दृष्टीने राज्यकर्त्यांनी किल्ल्यांचे महत्त्व जाणले होते. त्यामुळे राज्य निर्मिती, राज्यविस्तार व राज्य वृद्धिसाठी त्यांनी किल्ले बांधणीकडे विशेष लक्ष दिले. हडप्पा संस्कृतीच्या काळापासून विविध राजवटींमध्ये किल्ले बांधल्याचा उल्लेख आढळतो. भारतीय लोकांना किल्ल्यांचे वेगवेगळे प्रकार आणि त्याच्या उपयोगासंबंधी चांगली माहिती होती. अर्थात किल्ल्यांचे हे प्रकार सर्वच कालखंडात सारखेच होते असे नाही, तर आवश्यकतेनुसार त्याचा उपयोग व त्यात बदल होत गेले. तसेच हे बदल कोणत्याही एकाच कालखंडात घडून आले नसून त्या त्या प्रदेशाच्या भौगोलिक परिस्थितीनुसार किल्ले उभारण्यात आले. महाराष्ट्राची विशेषत: मराठ्यांच्या राज्याची भौगोलिक परिस्थिती बघता येथील दक्षिणोत्तर सह्याद्रीच्या पर्वत रांगांमुळे तसेच घनदाट अरण्य, डोंगर, दऱ्या, दुर्गम प्रदेश यामुळे स्वराज्यात बहुतांशी 'गिरिदुर्ग' अर्थात 'डोंगरी किल्ले' बांधले गेले. कारण अशा किल्ल्यांना नैसर्गिक संरक्षण लाभल्यामुळे तसेच ते उंच डोंगर माथ्यावर असल्यामुळे शत्रूपासून संरक्षण करणे सहज शक्य होई. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या संरक्षणार्थ किल्ल्यांची साखळीच निर्माण केली आणि त्या अनुषंगाने अनेक नवीन गिरिदुर्ग, भुईकोट व जलदुर्ग बांधले. तसेच जुन्या गडांची डागडुगी व दुरुस्ती करून त्यांना अभेद्य बनविले.

मराठा कालखंडामध्ये गनिमीकावा युद्ध तंत्रामुळे तसेच तत्कालीन भौगोलिक परिस्थितीमुळे किल्ल्यांना राजकीय महत्त्व प्राप्त झाले होते. तसेच 'संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग' असल्यामुळे त्यास लष्करी, संरक्षणात्मक, आर्थिक, प्रशासकीय, सामजिक, सांस्कृतिक, धार्मिक, वास्तुरचनात्मक दृष्टीने विशेष महत्त्व होते.

## १.२ विषय विवेचन :

### १.२.१ किल्ला : व्याख्या आणि मुख्य प्रकार (Forts: Definition and Major types)

'किल्ला' यास दुर्ग, गड, कोट, गढी अशा विविध नावाने ओळखले जाते. इंग्रजी भाषेत त्यास फोर्ट (Fort), कॅसल (Castle), सिटॅडल (Citadel), बर्ग (Burgh) इत्यादी संज्ञांनी संबोधिले आहे. तर संस्कृत मध्ये त्यास 'दुर्ग' असे म्हटले आहे. 'दुर्ग' शब्दाचा उगम 'दुर्गमान' शब्दामध्ये आहे. ज्याचा अर्थ जिंकण्यास दुर्गम असा होतो. 'राज्यव्यवहार कोशात'ही त्यासाठी 'दुर्ग' हा प्रतिशब्द सुचविला आहे. 'अमर कोषात' किल्ल्याचा उल्लेख 'पर्वतादिभी: दुर्गम पूरम कोट्टम इत्थमर' असा आला आहे. ज्याचा अर्थ सहज पोहचता न येणारे अवघड ठिकाण असा होतो. तर 'आज्ञापत्र' या ग्रंथामध्ये रामचंद्रपंत अमात्य यांनी 'संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग' असे म्हणत 'गडकोट हेच राज्य, गडकोट म्हणजे राज्याचे मुळ, गडकोट म्हणजे खजिना, गडकोट म्हणजे सैन्याचे वळ, गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी, गडकोट म्हणजे आपली वसतिस्थळे, गडकोट म्हणजे आपले प्राणसंरक्षण.' अशा शब्दात त्याचे महत्त्व विशद केले आहे. 'दुर्ग' किंवा 'किल्ला' याच्या विविध व्याख्या सांगता येतील त्या पुढीलप्रमाणे आहे.

**व्याख्या :**

१) शत्रूपासून संरक्षण करण्यासाठी व सभोवतालच्या प्रदेशावर नियंत्रण ठेवण्याकरिता बांधलेली वास्तू म्हणजे 'किल्ला' होय.

२) संरक्षणात्मक तटबंदीयुक्त बांधकाम म्हणजे 'दुर्ग' किंवा 'किल्ला' होय.

३) प्रतिकार करण्यासाठी तयार केलेले बळकट ठिकाण म्हणजे 'दुर्ग' होय.

४) 'दुर्ग' किंवा 'किल्ला' म्हणजे बचावाचे उत्तम ठिकाण होय किंवा अशी तटबंदीयुक्त जागा ज्यामध्ये सशस्त्र सैनिक व त्यांचा नेता असतो.

५) नैसर्गिक परिस्थितीचा वापर करून मोक्याच्या ठिकाणी केलेले संरक्षणात्मक बांधकाम तसेच एखाद्या नगराच्या संरक्षणासाठी केलेले तटबंदीयुक्त बांधकाम म्हणजे 'दुर्ग' होय .

६) 'दुर्ग' म्हणजे शत्रूपासून बचाव करण्यासाठी वसाहतीभोवती उभी केलेली संरक्षक भिंत किंवा व्यापारी बंदराच्या सुरक्षिततेसाठी बांधण्यात आलेल्या भिंती.

७) 'गढी' म्हणजे तटबंदीयुक्त घर, महाल किंवा मोठा वाडा होय. यामध्ये बुरुज, दरवाजे, जंग्या असतात, पण त्या मोठ्या परिपूर्ण किल्ल्यांच्यापेक्षा लहान स्वरूपाच्या असतात.

**किल्ल्याचे प्रकार :**

किल्ल्याचे अस्तित्त्व हे प्राचीन काळापासून असल्याचे पुरातत्वीय पुराव्याच्या आधारे स्पष्ट होते. प्राचीन, मध्ययुगीन ते आधुनिक काळखंडातील अनेक विद्वान व राजनीतिशास्त्रज्ञांनी तसेच तत्कालीन ग्रंथात किल्ल्याचे विविध प्रकार सांगितले आहे. त्याचा थोडक्यात परामर्श घेवून मराठेकालीन किल्ल्याचे प्रकार याचा आढावा घेता येईल. ऋग्वेदामध्ये तटबंदीयुक्त किल्ल्याचा उल्लेख असून वेदकाळात दुर्गाचे सहा प्रकार सांगितले आहे. 'मनुस्मृती' या ग्रंथात देखील दुर्गाचे सहा प्रकार सांगितले असून ते धनुदुर्ग, महिदुर्ग, अब्दुर्ग, वाक्षदुर्ग, नृदुर्ग व गिरिदुर्ग असे आहेत. कौटिल्याच्या 'अर्थशास्त्रात' आठ प्रकार दिले आहे. 'मानसर' ग्रंथात शिबिर, बहिनिमुख, स्थानिय, द्रोणक, समविद्व किंवा वर्धक, कोलक, निगम आणि स्कंधावर असे प्रकार दिले आहे. 'शुक्रनीती' ग्रंथात किल्ल्याचे परीदुर्ग, परीघदुर्ग, वनदुर्ग, धानवन, जलदुर्ग, गिरिदुर्ग, सैन्यदुर्ग, सहाय्यदुर्ग असे आठ प्रकार दिले असून त्यापैकी परीगघदुर्ग म्हणजे ज्याच्या सर्व बाजूंनी खोल खंदक असतो असा किल्ला. भोज राजाने रचलेल्या 'युक्तीकल्पतरु' या ग्रंथात किल्ल्यांचे कृत्रिम व नैसर्गिक (अकृत्रिम) असे दोन मुख्य प्रकार सांगितले आहेत. सोमेश्वर देव लिखित 'अभिल्लार्षितार्थ चिंतामणी' मध्ये किल्ल्याचे जलदुर्ग, गिरीदुर्ग, अश्मदुर्ग, इष्टिकादुर्ग, मृतिकादुर्ग, बाक्ष्मदुर्ग किंवा वनदुर्ग, मरुदुर्ग, नृदुर्ग किंवा नरदुर्ग, दारूदुर्ग म्हणजे मेढेकोट असे नऊ प्रकार दिले आहे. विजयनगरकालीन 'आकाशभैरवकल्प' या ग्रंथामध्ये किल्ल्याचे आठ प्रकार तर त्याच काळातील लाला लक्ष्मीधर यांच्या 'देवज्ञ विलासात' मध्येही दुर्गाचे आठ प्रकार सांगितले आहेत. छत्रपती संभाजी महाराजांच्या 'बुधभुषणम्' या ग्रंथात सहा प्रकार सांगितले आहे. 'शिवतत्त्व रत्नाकर' यामध्ये आठ प्रकार दिले आहे. कवी परमानंद लिखित 'शिवभारत' मध्ये किल्ल्याचे चार प्रकार

दिले असून रघुनाथ हणमंते यांच्या 'राज्यव्यवहार कोशा' मध्ये तीन प्रकार सांगितले आहेत. शिवकालीन अर्थात मराठेकालीन किल्ल्याच्या प्रकारांची माहिती पुढीलप्रमाणे घेता येईल.

**मराठाकालीन किल्ल्याचे प्रकार :**

**१) गिरिदुर्ग :**

'गिरिदुर्ग' म्हणजे 'डोंगरी' किल्ला किंवा डोंगरावर बांधलेला किल्ला होय. संरक्षणाच्या दृष्टीने गिरीदुर्गांना अतिशय महत्त्व आहे. गिरीदुर्गास नैसर्गिक संरक्षण लाभल्यामुळे तसेच ते उंच डोंगर माथ्यावर असल्यामुळे शत्रू सैन्याला गडाच्या पायथ्यापासून त्यावर हल्ला करावा लागतो. शिवाय अशा किल्ल्यावरील थोडीशी शिबंदी देखील शेकडो शत्रू सैन्यानिशी लढा देऊन किल्ल्याचे उत्तम प्रकारे संरक्षण करू शकत होते. त्यामुळे गिरिदुर्ग जिंकून घेणे प्रबळ शत्रूलाही फार अवघड जात असे. स्वराज्यातील बहुतांश किल्ले हे गिरीदुर्गच होते. त्यामुळे अशा गिरिदुर्गावरच स्वराज्याची संपूर्ण मदार होती. किंबहुना मराठी राज्याचे खरे सामर्थ्य हे गिरीदुर्गातच होते असे म्हटले पाहिजे. स्वराज्य रक्षणाच्या कामी छत्रपती शिवाजी महाराजांना गनिमीकावा युद्धपद्धतीत हे गिरीदुर्गच उपयुक्त ठरले. दक्षिणोत्तर पसरलेल्या सह्याद्रीच्या पर्वत रांगामध्ये हे गिरिदुर्ग बांधण्यात आलेले आहे. स्वराज्यातील या गिरीदुर्गामध्ये राजगड, राजगड, तोरणा, पुरंदर, सिंहगड, विशालगड, प्रतापगड, पन्हाळा इत्यादींचा प्रामुख्याने समावेश होतो.

शिवकाळात गिरिदुर्ग बांधणीचे एक स्वतंत्र शास्त्रच निर्माण झाले होते. त्यादृष्टीने रामचंद्रपंत अमात्य 'आज्ञापत्र' या ग्रंथात त्यासंदर्भात मौलिक सूचना करताना म्हणतात, गिरिदुर्ग बांधणीसाठी योग्य ते स्थळ निवडावे, किल्ल्याजवळ दुसरे उंच पर्वत किंवा टेकड्या असू नये, त्या असल्यास सुरुंग लावून किल्ल्याच्या नियंत्रणात आणावे. तसे शक्य न झाल्यास त्यांच्याभोवती तट बांधून त्यांचे किल्ल्यांत रूपांतर करावे. किल्ल्याला दरवाजा बांधीत असताना तो खालील मारा चुकवून पुढे बुरुज देवून बांधावा. गड पाहून किल्ल्यास दोन तीन दरवाजे तसेच चोरदिंड्या बांधावे जेणेकरून संकटप्रसंगी शत्रूस चुकवून किंवा त्यास गाफील ठेवून तेथून बाहेर पडणे शक्य होईल. गडावर अधिकारी नेमावे आणि तो सुरक्षित करावा. या सर्व बाबींमुळे गिरिदुर्ग सुरक्षित होत असे.

गिरिदुर्ग बांधताना इतरही काही महत्त्वाच्या गोष्टींची विशेष काळजी घेतली जात होती. ज्यामध्ये किल्ल्यावर पिण्याचे पाणी, धान्यसाठा, बाजारपेठ, सदर, निवासाची सोय, कारखाने, शस्त्रास्त्रे, टांकसाळ याची तरतूद केली जात असे. राजधानीचा दुर्ग सर्व बाबतीत स्वयंपूर्ण असला पाहिजे असा महाराजांचा कटाक्ष होता. त्यामुळे किल्ले रायगड येथे राजधानी नेण्यापूर्वी राजधानीच्या गडासाठी आवश्यक त्या सर्व सोयी महाराजांनी तेथे निर्माण करविल्या होत्या.

शुक्रनितीमध्ये डोंगरी किल्ल्याबाबत असे म्हटले आहे की, ''किल्ल्याच्या आश्रयाने एक सशस्त्र माणूस शंभर योद्धयांशी लढू शकतात. यासाठी राजाने किल्ल्यांचा आश्रय करावा.'' तर कौटिल्यांच्या मते, ''गडदुर्गात भुईकोट किल्ल्यापेक्षा पाणकोट किल्ला चांगला व पाणकोट किल्ल्यापेक्षा डोंगरी किल्ला चांगला.''

**गिरिदुर्गाची वैशिष्ट्ये :**

गिरिदुर्गाची अनेक वैशिष्ट्ये असली तरी मेट, माची आणि बालेकिल्ला ही गिरिदुर्गाची खास वैशिष्ट्ये मानली जातात.

- **मेट :**

'मेट' म्हणजे गडाच्या येण्या-जाण्याच्या मार्गावरील पहारा देण्याचे ठिकाण होय. गडाच्या चढणीवरील सपाट जागा मेटासाठी निवडली जात असे. शिवकालीन गडावर अशा प्रकारची मेटे आढळून येतात. उदाहरणार्थ, तोरणा किल्ल्यावर सात मेटे असल्याचे उल्लेख मिळतात. मेटाच्या जवळपास असलेल्या वास्तूंच्या नावाने मेटांचा नामनिर्देश होत असे, जसे की कोठी दरवाजा मेटा, भांडी दरवाजा मेटा, ढोल काठी मेटा इत्यादी.

- **माची :**

'माची' हा शब्द प्राकृत असून त्याचा अर्थ 'उंच भाग' किवा 'ओटा' असा होतो. राज्यव्यवहार कोशामध्ये माचीला 'उपत्यका' म्हटलेले आहे. गडाच्या चढणीवर मध्येच एखादे विस्तृत लांबीरुंदी असलेले मैदान 'माची' म्हणून ओळखले जाई. गडाच्या संरक्षणाच्या दृष्टीने माचीचे अनन्यसाधारण महत्त्व होते. त्यामुळे त्याच्या सभोवती तटबंदी बांधून त्यास सुरक्षित केले जात होते. गडावरील महत्त्वाच्या इमारती ह्या माचीवर असल्यामुळे माचीचे रस्ते दुर्गम करणे गरजेचे होते. राजगडावरील सुवेळा, संजीवनी आणि पद्मावती या तीन माच्या प्रमुख होत्या. स्वराज्यातील तोरणा, पुरंदर, मलंगगड, लोहगड इत्यादी अनेक किल्ल्यांवरही माच्या आहेत. शिवकाळात 'झुंजार' आणि 'बुधला' या दोन प्रसिद्ध माच्या किल्ल्याच्या संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या मानल्या गेल्या होत्या.

- **बालेकिल्ला :**

बालेकिल्ला हा 'फारसी' शब्द असून त्याचा अर्थ मुख्य किल्ल्याच्या आत उंच जागी बांधलेले तटवेष्ठित ठिकाण होय. दुसऱ्या शब्दात बालेकिल्ला म्हणजे किल्ल्यावरील सर्वात सुरक्षित व महत्त्वाचे ठिकाण होय. एखाद्या किल्ल्याच्या सपाटीवर उंचवटा किंवा उंच टेकडी असल्यास त्या भागाभोवती तट-बुरुजांची संरक्षक भिंत बांधून तो भाग अभेद्य केला जातो. दुर्गाच्या अशा उंचीवरील भागास 'बालेकिल्ला' असे म्हणतात. 'राज्यव्यवहार कोश या ग्रंथामध्ये बालेकिल्ल्याला 'अधित्यका' असे म्हटले आहे. स्वराज्यातील रायगड, पुरंदर, तोरणा, प्रतापगड, जिंजी इत्यादी महत्त्वाच्या गिरीदुर्गांवर बालेकिल्ला आहेत. बालेकिल्ल्यावर प्रशासकीय इमारती, राजाचे निवासस्थान यासह अनेक महत्त्वाच्या इमारती असत. त्यामुळे त्यास अनन्यसाधारण असे महत्त्व असून शत्रूने गडाच्या माच्यापर्यंतचा भाग जरी काबीज केला तरी बालेकिल्ला शेवटपर्यंत मोठ्या शर्थीने लढविला जात होता.

## २) भुईकोट किल्ला :

भुईकोट किल्ला यास 'भुईदुर्ग' किंवा 'स्थलदुर्ग' म्हणून देखील संबोधले जाते. भुईकोट म्हणजे भूमीवर बांधलेला किंवा सपाट जमिनीवर बांधलेला 'कोट' होय. तसेच जे 'पूर' किंवा मोठे शहर तटांनी परिवेष्टित आहे. ज्याचे सभोवार खंदकांनी संरक्षण केले आहे. नाना प्रकारच्या उपयुक्त वस्तूंचा आणि गावात, धान्य, पाणी, पैसा इत्यादींचा जेथे भरपूर साठा आहे. अनेक अस्त्रांनी सज्ज आहे अशा नगराला 'कोष्टदुर्ग' किंवा 'भुईकोट' किल्ला म्हटले जाते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजकीय हालचाली प्रामुख्याने मावळ आणि कोकण प्रदेशामध्ये झाल्यामुळे स्थलदुर्गाच्या तुलनेत गिरिदुर्गांना अधिक महत्त्व प्राप्त झाले तर दुसरीकडे मराठ्यांच्या हालचालीवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने चाकण व कल्याण येथील स्थलदुर्ग मोगलांनी आपल्या वर्चस्वाखाली आणण्याचा प्रयत्न केला. महाराजांच्या ताब्यात असलेल्या स्थलदुर्गांची संख्या फारशी नव्हती. चित्रगुप्त बखरीमध्ये १०८ स्थलदुर्ग महाराजांच्या ताब्यात असल्याचा उल्लेख आहे; परंतु प्रत्यक्षात शिवकाळामध्ये मराठ्यांच्या ताब्यात पन्नासपेक्षा अधिक किल्ले नसावे किंबहुना त्यापैकी बहुतेक किल्ले कर्नाटक प्रदेशातच होते.

## ३) जलदुर्ग :

जलदुर्ग म्हणजे पाण्यात बांधलेला दुर्ग होय. फारसी भाषेत जलदुर्गाला 'जंझीरा-बट' असा प्रतिशब्द आढळतो. जलदुर्ग हा खडकावर किंवा बेटावर बांधलेला असून तो चारही बाजूने पाण्याने वेढलेला असतो. असे किल्ले बहुदा समुद्रातच बांधलेले आहेत. समुद्र किनाऱ्यापासून थोड्याफार अंतरावर असलेल्या खडकावर किंवा बेटांवर जलदुर्ग बांधणे सोयीचे होत असे. त्यामुळे बहुतांश जलदुर्ग हे महाराष्ट्राच्या पश्चिम किना-यावरील अरबी समुद्रात लहानश्या बेटांवर बांधण्यात आले आहेत. जलदुर्गाची तटबंदी गिरिदुर्गापेक्षा मजबूत आणि अधिक रुंदीची बांधणे आवश्यक असते. शत्रू सैन्याला पाण्यातून होड्यांच्या किंवा गलबतांच्या सहाय्याने थेट किल्ल्याच्या तटापर्यंत पोहोचणे व त्यावर हल्ला करणे शक्य असते. त्यामुळे जलदुर्गाच्या पडकोटांतून शत्रूंवर मारा करण्यासाठी एकदम सरळ आणि खोल छिद्रे ठेवलेले असतात. अशा प्रकारचे छिद्रे सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग इत्यादी जलदुर्गाच्या पडकोटांना पहावयास मिळतात.

छत्रपती शिवाजी महाराजांनी जंजिऱ्याच्या सिद्दीद्वारा स्वराज्यास होणारा उपद्रवास आळा घाल्यण्याकरिता जलदुर्ग बांधून घेतले. ज्यामध्ये प्रभावळी भागात 'पद्मदुर्ग' बांधला. हा किल्ला इतका भक्कम होता की, ''पद्मदुर्ग राजपुरीच्या उरावरी दुसरी राजपुरी केली आहे'' असे म्हटले जाते. तसेच त्यांनी मालवणजवळ समुद्रात असलेल्या खडकाळ बेटावर 'सिंधुदुर्ग' हा किल्ला बांधला. या किल्ल्याच्या बांधकामासाठी महाराजांनी पोर्तुगीज तज्ञांची मदत घेतलेली होती. किल्ल्याचा पाया घालतेवेळी पाच खंडी शिसे ओतल्याचे सांगितले जाते. किल्ल्याच्या पूर्ण बांधकामासाठी महाराजांनी एक कोटी होन खर्ची घातले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी आरमार उभारणीकडे विशेष लक्ष दिल्यामुळे त्यांनी जलदुर्गाचे महत्त्व जाणून अनेक नवीन जलदुर्ग बांधून घेतले. ज्यामध्ये सिंधुदुर्ग, पद्मदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी, उंदेरी इत्यादींचा स्वराज्यातील प्रसिद्ध जलदुर्गात समावेश होतो.

## ४) वनदुर्ग :

शिवकाळात किल्ल्यांच्या गिरिदुर्ग, भुईकोट व जलदुर्ग या मुख्य प्रकारासह 'वनदुर्ग' हा प्रकारही आढळून येतो. अ. रा. कुलकर्णी व ग. ह. खरे संपादित 'मराठ्यांचा इतिहास' (खंड पहिला) यामध्ये शिवकालीन किल्ल्यांच्या तीन मुख्य प्रकाराव्यतिरिक्त 'वनदुर्ग' या चौथ्या प्रकाराचीही माहिती मिळते.

'वनदुर्ग' हा किल्ल्याचा वैशिष्टयपूर्ण प्रकार मानला जातो. 'वनदुर्ग' याचा अर्थ 'अरण्यात बांधलेला किल्ला' व 'घनदाट अरण्य' हाच किल्ला आहे असा होतो. दक्षिण कोकणामध्ये अशाप्रकारची घनदाट अरण्ये ठिकठिकाणी आढळतात. अशा अरण्याच्या साह्याने मराठ्यांनी शत्रुसैन्याला अनेक वेळा पराभूत केले.

उदाहरणार्थ, इ.स. १४५३ मध्ये विशाळगडाच्या वाटेवर असलेल्या अरण्यात बहमनी सरदार खलफ मलिकु तुजार याला घेरून शिर्के या मराठा सेनानीच्या साह्याने संगमेश्वराच्या राज्यकर्त्याने त्याच्या फौजेची कत्तल केली. त्यादृष्टीने बघता विशाळगडाच्या वाटेवर असलेले ते अरण्य म्हणजे एक प्रकारचा 'वनदुर्ग' होय. इ.स. १६६१ च्या सुमारास मराठ्यांनी मोगल अधिकारी कारतलबखानाच्या सेनेला उंबरखिंडीच्या अरण्यात अचानकपणे घेरले व त्याची फजिती करून त्यास शरण येण्यास भाग पाडले. शिवभारतामध्ये या घटनेचे वर्णन असे की, 'तुंग, त्रिकोणा आणि लोहगड या किल्ल्यांच्या मार्गाने मोगल सेना जात असताना मराठ्यांनी त्यांना तेथे न अडविता घनदाट अरण्य असलेल्या खिंडीत गाठले.' त्यामुळे 'उंबरखिंडीचे अरण्य' हे एकप्रकारे मराठ्यांना वनदुर्गाप्रमाणे उपयुक्त ठरले.

**स्वयं अध्ययन प्रश्न–१**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) 'दुर्ग' शब्दाचा उगम.............शब्दामध्ये आहे.

अ) दुर्गमान ब) देशमान क) दुर्गम ड) दुर्गटक

२) .............हा किल्ला 'जलदुर्ग' प्रकारात मोडतो.

अ) रायगड ब) पन्हाळा क) चाकण ड) सिंधुदुर्ग

३) कौटिल्याचे मते किल्ल्याच्या सर्व प्रकारात..........हा किल्ला चांगला आहे.

अ) डोंगरी ब) भुईकोट क) जलदुर्ग ड) स्थलदुर्ग

४) जोड्या जुळवा

| गट १ | गट २ |
|---|---|
| १) गिरिदुर्ग | a) सिंधुदुर्ग |
| २) भुईकोट | b) मुडागड |
| ३) जलदुर्ग | c) चाकण |
| ४) वनदुर्ग | d) रायगड |

५) खालील दोन विधानांच्या आधारे योग्य पर्याय निवडा.

१) छत्रपती शिवाजी महराजांनी सिंधुदुर्ग किल्ला बांधला.

२) सिंधुदुर्ग हा किल्ला जलदुर्ग प्रकारात मोडतो.

अ) विधान १ बरोबर आणि २ चुकीचे आहे

ब) विधान २ बरोबर आणि १ चुकीचे आहे

क) दोन्ही विधाने बरोबर आहे

ड) दोन्ही विधाने चुकीची आहे

### **१.२.२ किल्ले बांधणीची गरज** (Need to construct Forts)

**१) स्वराज्याचे बळकटीकरण :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी कारकीर्दीच्या सुरुवातीस त्यांच्या पुणे जहागिरीच्या पूर्वेस असणारा मावळ प्रांत काबीज केला. कृष्णाजी अनंत सभासद या घटनेचे वर्णन करताना म्हणतो, ''पुण्यास येताच बारा मावळ काबीज केली. मावळे देशमुख बांधून, दस्त करून, पुंड होते त्यांस मारिले.'' परंतु केवळ प्रदेश ताब्यात असून उपयोगाचे नाही तर त्या प्रदेशाचे संरक्षण व स्वराज्याचे बळकटीकरण करायचे असेल तर त्यावरील किल्लेही आपल्या ताब्यात असले पाहिजे असे धोरण छत्रपती शिवाजी महाराजांनी आखले. पुढे यातून तोरणा, कोंढाणा (सिंहगड), चाकण, पुरंदर इत्यादी गड ताब्यात घेतले. मुरंबगड हा डोंगर ताब्यात घेवून त्यावर 'राजगड' हा मोठा व भक्कम असा किल्ला बांधून घेतला. त्यास आपली राजधानी केली. अशा रीतीने 'राजगड'ला स्वराज्याची पहिली राजधानी होण्याचा मान मिळाला. जावळी विजयानंतर 'भोरप्या' नामक डोंगरावर 'प्रतापगड' हा बुलंद किल्ला बांधला. 'रायरी'चे रुपांतर किल्ले 'रायगड' मध्ये केले. इ.स. १६७४ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक किल्ले 'रायगड' येथे होवून त्यास अधिकृतपणे मराठी सत्तेच्या राजधानीचा दर्जा प्राप्त झाला. तसेच सिंधुदुर्ग, पद्मदुर्ग यासह असंख्य जलदुर्ग बांधून छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे बळकटीकरण केले. यादृष्टीने ९१ कलमी बखरीतील महाराजांचे पुढील उद्गार बोलके आहेत. ते असे, ''जैसा कुणबी शेतास माळा घालून शेत राखितो असे किल्ले राज्यास रक्षण आहेत. तारवांस खिळे मारून बळकट करितात तशी राज्यास बळकटी किल्ल्यांची आहे.'' एकंदरीत यातून स्वराज्याचे बळकटीकरण करण्याच्या दृष्टीने किल्ले बांधणीची गरज होती हे स्पष्ट होते.

**२) स्वराज्याचे संरक्षण व संकटप्रसंगी मदत :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्याप्रमाणे अठरापगड जातीतील लोकांना स्वराज्य स्थापनेच्या कार्यात सामील करून घेतले. त्याचप्रमाणे शत्रूच्या रूपाने अचानक येणाऱ्या संकटावर मात करण्यासाठी किल्ल्यांची गरज होती. हे जाणून त्यांनी स्वराज्याचे संरक्षण, दृढीकरण व विस्तार यासाठी नवीन किल्ल्यांची बांधणी व जुन्या किल्ल्यांची डागडुगी करून घेतली. छत्रपती शिवाजी महाराजांनी कर्नाटक मोहिमेत वेल्लोर, जिंजी,

तंजावर इत्यादी किल्ले ताब्यात घेवून त्याची पुनर्बांधणी केली. जिंजीच्या किल्ल्याकडे तर त्यांनी विशेष लक्ष दिले. मार्टिन लिहितो, ''शिवाजीने जिंजी किल्ल्याची जागा बारकाईने पाहिली. जिंजीमुळे सुरक्षिततेची मोठी व्यवस्था होत होती. शिवाजीने आज्ञा केली की किल्ल्याच्या तटाचा काही भाग पाडावा आणि तटबंदी बांधावे. त्याप्रमाणे किल्ल्यामधील एका भागाचे काम आणि त्याऐवजी तटबंदी उभारण्याचे काम जोरात चालू होते.'' भविष्यकालीन संकटाना तोंड देण्यासाठी केलेली ही तरतूद होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या या दूरदृष्टीचा प्रत्यय अल्पावधीत दिसून आला.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर मराठ्यांचे राज्य नष्ट करण्याच्या उद्देशाने मोगल बादशहा औरंगजेब प्रचंड फौजेनिशी व बड्या सरदारानिशी दक्षिणेत आला. त्याने स्वराज्यावर चौफेर हल्ले चढविले. अशातच छत्रपती संभाजी महाराजांची कैद, रायगडचा पाडाव या घटनांमुळे तर स्वराज्यावर मोठे संकट ओढवले होते. मराठ्यांचे राज्य आता आपल्याला सहज जिंकता येईल असे औरंगजेबास वाटत होते. परंतु याच सुमारास छत्रपती राजाराम महाराज यांनी रायगडाहून कूच करून दूर कर्नाटकातील 'जिंजी' किल्ल्याचा आश्रय घेतला. जिंजीस राजधानीचा गड बनवून तेथून मोगलांशी तीव्र लढा सुरु ठेवला. परिणामी मोगलांना एकाच वेळी महाराष्ट्र व कर्नाटकात मराठ्यांशी लढावे लागले त्यामुळे मोगल सैन्याची शक्ती कमकुवत होवून त्याचा फायदा स्वराज्यास झाला. एकंदरीत यातून स्वराज्याचे संरक्षण व संकटप्रसंगी सहाय्यतेच्या दृष्टीने किल्ले बांधणीची गरज स्पष्ट होते.

### ३) सिद्दींचा बंदोबस्त :

छत्रपती शिवाजी महाराजांनी चंद्रराव मोऱ्यांचा पाडाव करून इ.स.१६५६ मध्ये जावळी जिंकून घेतली. परिणामी महाराजांच्या छोट्या पूर्ण जहागिरीचे रुपांतर राज्यात झाले आणि स्वराज्याच्या सीमा समुद्रास जावून भिडल्या. सागरावर यावेळी पोर्तुगीज, इंग्रज व सिध्दी यांची सत्ता व वर्चस्व होते. अशातच स्वराज्यातील कल्याण, भिवंडी, राजापूर ते मालवण या समुद्रकिनाऱ्यावरील प्रदेशास व तेथील रयतेस सिद्दींचा सातत्याने त्रास होत असे. छत्रपती शिवाजी महाराजांनी याची दखल घेत सिद्दींचा बंदोबस्त, प्रजेचे संरक्षण व पश्चिम किनारा सुरक्षित करण्यासाठी आरमार उभारणी सोबत जलदुर्ग बांधणीचे कार्य हाती घेतले. त्यादृष्टीने पद्मदुर्ग, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग इत्यादी जलदुर्ग बांधले. सिद्दीच्या प्रदेशावर आक्रमण करून राजापूर, तळा, घोसाला जिंकून समुद्रकिनारा मराठ्यांनी ताब्यात घेतला. अमात्य लिहितात, ''(जे शत्रू) जलदुर्गसहित होते यांस नुतनच जलदुर्ग निर्माण करून पराभवले.'' अशारितीने छत्रपती शिवाजी महाराजांनी जलदुर्गाची बांधणी करून त्याद्वारे सिद्दीचा बंदोबस्त व त्याच्यावर वचक निर्माण केला.

### ४) परकिय शत्रूंवर दहशत बसविणे :

सोळाव्या व सतराव्या शतकात अनेक युरोपियन व्यापार करण्याच्या हेतूने भारतात आले. यामध्ये पोर्तुगीज व इंग्रज यांचा प्रामुख्याने समावेश होता. त्यांनी भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर आपल्या वखारी उभारण्यास प्रारंभ केल्या. अल्पावधीतच त्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षा महाराजांच्या लक्षात आल्या. पाश्चात्त्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षा व त्यांच्या प्रवृत्तीचे विश्लेषण करताना रामचंद्र अमात्य लिहितात,

'....त्यास ही हट्टी जात, हातास आले स्थळ मेल्यानेही सोडवायचे नव्हते.'' पाश्चात्यांच्या या प्रवृत्तीमुळे त्यांच्याशी आपला कधी ना कधी तरी संघर्ष होणारच हे जाणून महाराजांनी आपले सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न केला. त्या प्रयत्नांचाच एक भाग म्हणून त्यांनी आरमार उभारले व जलदुर्ग बांधले. पुढे खांदेरी बेटाच्या मालकी हक्कावरून इंग्रज व मराठे यांच्यात संघर्ष घडून आला. ज्यात इंग्रजांचा पराभव होवून मराठे विजयी झाले. अशाप्रकारे जलदुर्ग बांधणीमुळे पश्चिम किना-यावर परकीयांचा प्रभाव कमी करण्यात व त्यांच्यावर दहशत बसविण्यात  मराठ्यांना यश आले.

**५) राजकीय व लष्करी हालचालीचे केंद्र :**

शिवकाळात किल्ले हे राजकीय व लष्करी हालचालीचे महत्त्वाचे केंद्र होते. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ले बांधणीचे धोरण स्वीकारले. या किल्ल्यांवरून राज्यकारभार चालत असे. तह, करारनामे, युद्धाची आखणी, युद्धाचे डावपेच व लष्करी मोहिमा यासंबधीचे धोरण हे किल्ल्यावरून ठरत असे. त्यावर भाष्य करतांना न्या. रानडे म्हणतात, ''स्वराज्यातील शेकडो गिरिदुर्ग महत्त्वाच्या व मोक्याच्या ठिकाणी असतांना नवीन गिरिदुर्गाची उभारणी करण्याची फारशी गरज नव्हतीच; परंतु राजकीय हालचालींच्या दृष्टीने एखादी जागा किंवा स्थळ महत्त्वाचे आढळल्यास महाराजांनी त्या ठिकाणी नवे दुर्ग उभारले.'' काळाची गरज म्हणून कोकणची किनारपट्टी सुरक्षित करण्यासाठी जलदुर्ग उभारणीकडे महाराजांनी विशेष लक्ष दिले. त्यास पुष्टी देताना कृष्णाजी अनंत सभासद लिहितात, ''राजियांनी जागाजागा डोंगर पाहून गड वसविले, की येणेकडून दर्या जेर आहे आणि पानियांतील राजे जेर होतील, असे जाणून कित्येक पानियांतील डोंगर बांधून दर्यामध्ये गड वसविले...जोवर पानियांतील गड असतील, तोवर आपले नाव चालेल; असा विचार करून अगणित जंजिरे जमिनीवर व पाणियात वसविले.''

**६) मुख्य किल्ल्यास संरक्षक गड :**

शत्रूच्या आक्रमणाप्रसंगी स्वराज्यातील किल्ल्यांचे, तेथील धान्याची कोठारे, खजिना व रयतेचे संरक्षण व्हावे, शत्रूचे आक्रमण रोखता यावे तसेच शत्रूच्या आक्रमणाची गती मंद करता यावी या हेतूने छत्रपती शिवाजी महाराजांनी मुख्य किल्ल्याच्या संरक्षणार्थ जोडकिल्ला बांधून घेतला. अशा जोडकिल्ल्याच्या माध्यमातून व तेथील सैनिकांच्या तुकड्याद्वारे शत्रूंना प्रतिकार करून मुख्य किल्ल्याचा बचाव होत असे. उदाहरणार्थ, छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ले पन्हाळा याचे महत्त्व जाणून त्याचे संरक्षणार्थ 'पावनगड' हा जोडकिल्ला बांधून घेतला आणि किल्ले पन्हाळ्याच्या संरक्षणाची तरतूद केली.

**७) राजधानी म्हणून गडाचे महत्त्व :**

चंद्रराव मोरे यांचेकडून जावळी जिंकून घेतल्यानंतर तेथील 'रायरी' किल्ला महाराजांच्या ताब्यात आला. 'रायरी' अर्थात 'रायगड' होय. तो अतिउंच व चढण्यास कठीण असा गड होता. तो गड पाहिल्यानंतर त्यावर राजधानीचा गड निर्माण करावा तसेच त्यास स्वराज्याची राजधानी बनवावी हा विचार महाराजांच्या मनात आला. हे सांगताना सभासद बखरकार लिहितात, ''राजा खास जाऊन पाहता गड बहुत चखोट, चौतर्फी गडाचे कडे तासिल्याप्रमाणे, दीड गांव उंच, पर्जन्यकाळी कडियावरी गवत उगवत नाही, आणि धोंडा तासीव

एकच आहे, (असा चखोट.) दौलताबादही दशगुणी गड उंच. असे देखोन बहूत संतुष्ट जाले आणि बोलिले, तक्तास जागा गड हाच करावा.''

छत्रपती शिवाजी महाराजांनी रायगडचे महत्त्व ओळखून होते. रायगड हा गड आडवाटेवर असला तरी हमरस्त्यावर आहे. येथून रत्नागिरी जिल्हा, दक्षिणेत अथवा कोठेही जाण्यास सोयीचे आहे. रायगडचा माथा राजधानी बनविण्यास सोयीचा व पुरेसा आहे. तसेच शत्रूपासून संरक्षण करण्याच्या दृष्टीने उपयुक्त व शत्रूला अवघड वाटणा-या प्रदेशातील आहे शिवाय सागरी दळणवळणास तो जवळ आहे. तेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांनी कल्याणचा सुभेदार आबाजी सोनदेव यास रायगडावर राजधानीस आवश्यक त्या इमारती बांधण्याची आज्ञा केली. त्यानुसार रायगडावर तीनशे इमारती बांधण्यात आल्या. ज्यामध्ये राजवाडे, कचेऱ्या, धान्याची दास्ताने, दारूगोळ्याची कोठारे, शिबंदीच्या रहाण्याच्या जागा, व्यापाराची पेठ, पाण्याचे हौद, तलाव, टांकसाळ इत्यादींचा प्रामुख्याने समावेश होतो. यासोबतच राजधानीच्या संरक्षणाच्या दृष्टीने आवश्यक ती सर्व खबरदारी घेतली गेली. अशाप्रकारे राजधानीच्या गडाची निर्मिती होवून रायगड स्वराज्याच्या सेवेसाठी सज्ज झाला.

**८) आज्ञापत्र व किल्ले बांधणी :**

छत्रपती संभाजी महाराज (दुसरे) यांच्या कारकिर्दीत रामचंद्रपंत अमात्य यांनी 'आज्ञापत्र' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात त्यांनी किल्ले बांधणीचे गरज तसेच किल्ले कसे बांधावे व त्याची निगा कशी राखावी याविषयी सविस्तर माहिती दिली आहे. ते म्हणतात, ''संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग नसता मोकळा देश परचक्र येताच निराश्रय, प्रजा भग्न होऊन देश उद्वस होतो. देश उद्वस झाल्यावरी राज्य असे कोणास म्हणावे? या करिता पूर्वी जे जे राजे झाले त्यांणी आधी देशामध्ये दुर्ग बांधून तो तो देश शास्वत करून घेतला. आणि आले परचक्रसंकट दुर्गाश्रयी परिहार केले.'' पुढे ते हेही लिहितात, हे राज्य तर तीर्थरूप थोरले कैलासवासी स्वामींनी गडावरूनच निर्माण केले.''

रामचंद्र अमात्य यांचे मते, गडकोट हेच राज्य, राज्याचे मुळ, खजिना, सैन्याचे बळ, राज्यलक्ष्मी, वसतिस्थळे, प्राणसंरक्षण असल्यामुळे त्याचे संरक्षण व नूतन बांधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अशाप्रकारे रामचंद्रपंत अमात्य यांनी अतिशय मोजक्या व समर्पक शब्दात गड अर्थात किल्ले बांधणीची गरज प्रतिपादन केली आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न-२**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) छत्रपती शिवाजी महाराजांनी सिद्दींचा बंदोबस्त करण्यासाठी.......बांधले.

अ) गिरिदुर्ग ब) भुईकोट क) जलदुर्ग ड) गढी

२) छत्रपती शिवाजी महाराजांनी पन्हाळगडाच्या स्वरक्षणार्थ.........हा जोडकिल्ला बांधला.

अ) विशाळगड ब) पावनगड क) राजगड ड) पुरंदर

३) छत्रपती शिवाजी महाराजांनी कल्याणचा सुभेदार........यास रायगडावर राजधानीस आवश्यक त्या इमारती बांधण्याची आज्ञा केली.

अ) आबाजी सोनदेव ब) रघुनाथपंत क) मोरोपंत पिंगळे ड) प्रल्हाद निराजी

४) जोड्या जुळवा

| गट १ | गट २ |
|---|---|
| १) रायरी | a) प्रतापगड |
| २) भोरप्या डोंगर | b) विशाळगड |
| ३) मुरंबगड | c) राजगड |
| ४) खेळणा | d) रायगड |

५) खालील दोन विधानांच्या आधारे योग्य पर्याय निवडा.

१) 'संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग' हे सुप्रसिद्ध विधान आज्ञापत्रातील आहे.

२) 'आज्ञापत्र' हा ग्रंथ रामचंद्रपंत अमात्य यांनी लिहिला.

अ) विधान १ बरोबर आणि २ चुकीचे आहे

ब) विधान २ बरोबर आणि १ चुकीचे आहे

क) दोन्ही विधाने बरोबर आहेत.

ड) दोन्ही विधाने चुकीची आहेत.

### **१.२.३ मराठ्यांच्या इतिहासात किल्ल्याचे महत्त्व :** (Importance of Forts in Maratha History)

मराठ्यांच्या इतिहासात किल्ल्यांचे अनन्यसाधारण महत्त्व असून ते ऐतिहासिक, राजकीय, लष्करी व संरक्षण, भौगोलिक, आर्थिक, सामाजिक, प्रशासकीय, युद्धनीती, वास्तुरचना, मराठ्यांच्या इतिहासाची साधने, राजधानीचा गड यासारख्या विविध मुद्यांच्या आधारे सविस्तर स्पष्ट करता येते.

**१) ऐतिहासिक महत्त्व :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची निर्मिती करीत असताना किल्ल्यांना अतिशय महत्त्व दिले. किल्ल्यांमुळेच स्वराज्याची निर्मिती, दृढीकरण व विस्तार घडून आला. अशा या किल्ल्यांचे राजकीयदृष्ट्या जितके महत्त्व होते किंबहुना तितकेच महत्त्व ऐतिहासिकदृष्ट्या देखील होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील अनेक घटना ह्या किल्ल्यांच्या साक्षीने घडून आल्या. किल्ले 'शिवनेरी' येथे १९ फेब्रुवारी १६३०

रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म झाला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पहिल्या विजयाचे प्रतिक ठरला तो किल्ले 'तोरणा', हा गड जिंकून छत्रपती शिवाजी महाराजांनी 'स्वराज्याचे तोरण बांधले' असे मानले जाते. आदिलशाही सरदार सिद्दी जोहरने घातलेल्या वेढ्यातून महाराजांनी बुद्धिचातुर्याने आपली सुटका करवून घेतली तो गड 'पन्हाळा'. ''शिवाजी काय? चढे घोडीयानिशी जिवंत कैद करून घेऊन येतो'' अशी शेरवी मिरविणाऱ्या अफझलखानाचा वध महाराजांनी प्रतापगडाच्या पायथ्याशी केला. दक्षीण भारतातील दूरच्या प्रदेशातील 'जिंजी' किल्ला जिंकून तेथे वर्चस्व निर्माण केले. ०६ जून १६७४ रोजी किल्ले 'रायगड' येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक होवून ते 'छत्रसिंहासनाधीश्वर व संस्कारयुक्त राजे' झाले. सन १६८० मध्ये 'रायगड' येथेच छत्रपती शिवाजी महाराजांचे निधन झाले. महाराजांच्या कारकीर्दीतच मुरारबाजी प्रभूंनी किल्ला शत्रूंच्या हाती जावू नये गाजविलेल्या पराक्रमामुळे 'पुरंदर'ला कायमची संस्मरणीयता लाभली. किल्ले रोहिडा व कोंढाणा सुभेदार तानाजी मालुसरे यांच्या पराक्रमाचे साक्षीदार बनले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या संरक्षणासाठी बाजीप्रभू देशपांडे आणि हिरडस मावळातील शुर योद्ध्यांनी खेळणा (विशाळगड) किल्ल्याच्या वाटेवरील खिंड अडवून शत्रूंशी पराक्रमाची शर्थ करीत प्राणार्पण केले. पुढे मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या काळात मावळे व किल्ले यांनी मोगल बादशहा औरंगजेब याच्याशी कडवी झुंज दिली. औरंगजेबाला त्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत मराठी राज्य जिंकता आले नाही. स्वराज्य अभेद्य राहिले ते किल्ल्यामुळेच. या सर्व शिवाजी महाराजांशी संबंधित घटना प्रसंगातून किल्ल्यांचे अनन्यसाधारण महत्त्व स्पष्ट होते.

**२) राजकीय महत्त्व :**

किल्ल्यांचे राजकीय महत्त्व स्पष्ट करतांना 'मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष' या ग्रंथात न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे म्हणतात, ''महाराष्ट्राची स्थिती निसर्गत:च संरक्षणाला योग्य असून पर्वतांच्या शिखरांवरील पहाडी किल्ले त्याच्या संरक्षणाला साह्य करणारे आहेत. राजकीय इतिहासांत त्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावलेली आहे.''

शिवकाळात तोरणा, पुरंदर, सिंहगड, राजगड, रायगड इत्यादी किल्ले म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजकीय हालचालीचे केंद्रबिंदू होते. यापैकी राजगड व रायगड या किल्ल्यास तर महाराजांनी स्वराज्याची राजधानी बनविले. 'भोरप्या' नावाच्या डोंगरावर 'प्रतापगड' हा बुलंद किल्ला बांधून घाटमार्गावर नियंत्रण प्रस्थापित केले. याच गडाच्या साक्षीने अफझलखान व छत्रपती शिवाजी महाराज यांच्यात संघर्ष होवून स्वराज्याचे भवितव्य ठरले.

मावळ प्रांतातील शिवनेरी किल्ल्यामुळे जुन्नरचे, चाकणचा किल्ल्यामुळे घोटण आणि पौड या मावळ प्रदेशाचे तर तुंग व तिकोणा या किल्ल्यांमुळे पवन मावळाचे संरक्षण करणे शक्य झाले. सिंहगडावरून मुसे, रोहिड्यावरून हिरडस मावळ व रोहीडखो-यावर तर राजगड किल्ल्यावरून गुंजण मावळ, काणद व वेळवंड खो-यावर नियंत्रण व वर्चस्व राखता येणे शक्य झाले. पुढील काळात याच गडाच्या साह्याने छत्रपती शिवाजी

महाराजांनी स्वराज्याची स्थापना व विस्तार केला. या सर्व बाबींमुळेच शिवकाळात किल्ल्यास राजकीय महत्त्व प्राप्त झाले होते.

### ३) लष्करी व संरक्षणात्मक महत्त्व :

लष्करी व संरक्षणात्मकदृष्ट्यासुद्धा मराठेकालीन किल्ल्यांना अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. किल्ल्यांवरील लष्कर व किल्ल्यांच्या चौफेर परिसरात चौकीच्या रूपाने महाराजांनी लष्कर तैनात ठेवले होते. किंबहुना शत्रूला रोखण्यासाठी लष्करी ठाणे म्हणून त्यांनी किल्ल्यांचा उपयोग केला. स्वराज्याच्या संरक्षणाच्या दृष्टीने एका किल्ल्याचा दुसऱ्या किल्ल्याशी संपर्क साधता यावा यासाठी स्वराज्यातील किल्ल्यांच्या तीन साखळ्या तयार केल्या होत्या. पहिली साखळी वायव्येला असलेल्या अशेरी किल्ल्यापासून दक्षिणेकडे असलेल्या विशाळगड पर्यंत होती. पश्चिम किनारपट्टीवरील जलदुर्ग ही दुसरी साखळी तर तिसरी साखळी विशाळगड ते जिंजी दरम्यानच्या किल्ल्यांची होती. त्यामुळे मराठेशाहीचे यश कोणत्याही एका किल्ल्यात नसून किल्ल्यांच्या साखळीत होते. किंबहुना त्याहून अधिक कोणत्याही किल्ल्याच्या विशिष्ट प्रसंगी केलेल्या उपयोगात आहे. रायगड हा राजधानीचा गड हस्तगत करूनही औरंगजेबाला मराठ्यांचे राज्य नष्ट करता आले नाही यावरून किल्ल्यांचे लष्करी व संरक्षणात्मक महत्त्व अधिक ठळकपणे स्पष्ट होते.

### ४) भौगोलिक महत्त्व :

महाराष्ट्राच्या उत्तरेस सातपुडा, दक्षिणेस पंचगंगा, पूर्वेस वैनगंगा, तर पश्चिमेस अरबी समुद्र आहे. तथापि सह्याद्रीच्या उत्तर-दक्षिण विस्तारामुळे महाराष्ट्राचे कोकण व देश असे दोन विभाग पडले आहे. अशात सह्याद्री व अरबी समुद्र यांच्या दरम्यानचा कोकण भाग असंख्य खाड्या व नद्यांनी उंचसखल बनला आहे. घनदाट अरण्य, हिस्त्र पशु श्वापदे यामुळे देशावरून कोकणात जाणारे मार्ग अत्यंत बिकट बनले होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील किल्ल्यांची उभारणी करण्यासाठी त्याचा प्रभावीपणे उपयोग करून घेतला. आणि सह्याद्रीच्या पर्वत रांगामध्ये स्वराज्याचे असंख्य किल्ले बांधले. या भौगोलिक वैविधतेमुळे किल्ले मराठ्याची आश्रयस्थाने बनली. तसेच त्यांनी दीर्घकाळ शत्रूंशी झुंज देत स्वराज्य अबाधित ठेवले.

### ५) आर्थिक महत्त्व :

छत्रपती शिवाजी महाराजांनी जुन्या किल्ल्यांची दुरुस्ती, नवीन किल्ल्यांची बांधणी, किल्ल्यांवरील इतर बांधकामे व रसद इत्यादी कामांसाठी स्वतंत्रपणे रकमेची तरतूद केली होती. उदाहरणार्थ सन १६७१-७२ च्या नोंदीप्रमाणे किल्ल्याच्या बांधणीसाठी १,७५,००० होन इतकी रक्कम मंजूर केली होती, आणि त्यापैकी एकट्या रायगडासाठी ५० हजार होन राखून ठेवले होते. यातून छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या सरंक्षण व्यवस्थेस किल्ल्याला दिलेले महत्त्व स्पष्ट होते.

शिवकालीन किल्ल्याचे आणखी महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे त्यावरील बाजारपेठांची रचना हे होय. छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ल्यांवरील सैनिकांकरिता तसेच सामान्य रयतेकरिता स्वराज्याच्या राजधानीच्या ठिकाणी अर्थात किल्ले रायगड व किल्ले राजगड येथे भक्कम बाजारपेठांची उभारणी केली. किल्ल्यावरील या बाजारपेठा म्हणजे आर्थिक उलाढालीचे ते महत्त्वाचे केंद्र होते.

**६) प्रशासकीय महत्त्व :**

स्वराज्याच्या कार्याची सुरुवातच मुळात किल्ल्यांपासून असल्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ले प्रशासनाकडे विशेष लक्ष दिले. महाराजांनी किल्ले प्रशासनात हवालदार, सबनीस, कारखानीस हे तीन महत्त्वाचे अधिकारी नियुक्त करून त्यांचे कार्य निश्चित केले. आपापले कार्य करीत असताना हे तीनही अधिकारी एकमेकांवर अप्रत्यक्षरीत्या नियंत्रण ठेवत असत. उदाहरणार्थ सबनीस पत्रव्यवहाराचे कार्य करीत असता त्या पत्रावर हवालदार व कारखानीस हे आपले संमतीदर्शक मुद्रा उमटवित असे. तर कारखानीस धान्य व दारुगोळा वितरीत करीत असताना सबनीसाचा प्रतिनिधी तिथे हजर असे तसेच पुरवठ्यासंबंधीच्या कारखानिसाच्या पत्रावर सबनीस मुद्रा उमठवित असे. शिवाय आज्ञापत्रात उल्लेख केल्याप्रमाणे तीन वर्षात हवालदार, चार वर्षांनी सरनौबत, पाच वर्षांनी सबनीस व कारखानीस यांची बदली होत असे. परिणामी किल्ल्यांवरील अधिकाऱ्यांचे एकमेकांवर अप्रत्यक्षरीत्या नियंत्रण व सततच्या बदल्या यामुळे किल्ल्यांवर फंदफितुरी, दगाफटका किवा बंड होण्याची शक्यता फारशी नसे यातूनच मराठाकालीन किल्ल्याचे प्रशासकीय महत्त्व निदर्शनास येते.

**७) सामाजिक महत्त्व :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ला प्रशासनात वेगवेगळ्या जातीतील लोक अधिकारपदी नियुक्त केले. किल्ल्यावरील हवालदार हा 'मराठा', सबनीस 'ब्राम्हण' तर कारखानीस हा 'कायस्थ प्रभू' जातीतील असे. किल्ल्याच्या मार्गावर भिल्ल, रामोशी, बेरड इत्यादी जमातींच्या चौक्या असत. अर्थात त्यांच्यातील स्वामीनिष्ठा, स्वराज्यनिष्ठा, प्रामणिकपणा व पात्रता हे निकष पडताळूनच स्वतः छत्रपती त्यांची नियुक्ती करीत असत. याशिवाय किल्ल्यावरील मुख्य अधिकाऱ्यांच्या हाताखाली काम करणारे नोकर चाकर हे सुतार, लोहार, पाथरवट इत्यादी असत. छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ले प्रशासनात केलेला जाती वैशिष्ट्यांचा अचूक वापर यातून त्याचे सामाजिक महत्त्व तसेच अठरापगड जातीमधील लोकांना स्वराज्य कार्यात सहभागी करून घेतले.

**८) धार्मिक महत्त्व :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील प्रजाजनांना धार्मिक स्वातंत्र्य दिले. त्याचप्रमाणे तीर्थयात्रा करण्यास परवानगी दिली. तुळजाभवानी ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या भोसले कुळाची कुलदेवता होय. महाराजांनी किल्ले प्रतापगड येथे तुळजाभवानीचे मंदिर बांधले. छत्रपती शिवाजी महाराजांनी गडावरील सैन्यांमध्ये चैतन्य निर्माण करण्याचे धोरण आखले. त्याचाच एक भाग म्हणून क्षात्रधर्माचे पालन करणे प्रत्येक सैनिकांचे आद्यकर्तव्य आहे असा विचार त्यांच्यात रुजविण्याचा प्रयत्न झाला. त्यादृष्टीने मुदगल कवीच्या रामायणातील युद्धकांडाचे पारायण किल्यावरील शिबंदीच्या लोकांत दररोज रात्री जेवण झाल्यावर करण्यात येई. अशाप्रकारे युद्धकांडाची पारायणे किल्ल्या-किल्यातून होत राहिली. त्यामुळे मराठ्यांचा क्षात्रधर्म जागृत झाला.

**९) सांस्कृतिक महत्त्व :**

शिवकाळात सततच्या युद्धजन्य वातावरणातही पोवाडे गाणारे, कीर्तनकार, गोंधळी, तमसगीर इत्यादी कलाकार जनतेची करमणूक करीत. पोवाडे हे शूरवीरांचे गुणगान करीत असे. तसेच सांस्कृतिक वारसा जतन करीत असत. पोवाडे गाणाऱ्यास लोकाश्रय असे. तुळशीदास यांनी 'तानाजीचा पोवाडा' रचला. महाराज राजगडावर असताना त्यांनी तुळशीदास यास बोलावून घेतले. तेथे तुळशीदासाने महाराजापुढे तानाजीचा पोवाडा गायिला. सिंहगडची हकीगत ऐकून महाराज अत्यंत खूश झाले आणि त्यांनी तुळशीदासाच्या हातात एक हजार रुपयांचा तोडा घातला. त्याच पोवाड्यात शिवाजी महाराज राजगडावरून प्रतापगडी गेले त्याचे चित्रण आहे. शिवाजी महाराजांच्या शौर्याचा उल्लेख करून तुळशीदास म्हणतो ''शूर मर्दाचा पोवाडा शूर मर्दाने ऐकावा शिवरायाच्या राज्यात ऐसा उमराव होणे नाही'' यावरून प्रत्यक्ष महाराज गुणीजनांचा व त्यांच्या कलेचा गौरव करीत होते, असे वरील वर्णनावरून दिसून येते.

**१०) युद्धनीतीत महत्त्व :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी भारतीय युद्धशास्त्रात गडकोटांचे महत्त्व ओळखले होते. परिणामी त्यांनी स्वराज्याची राजकीय व लष्करी व्यवस्था किल्ल्यांवर आधारित केली. महाराजांनी युध्दनीतीत गनिमीकावा युद्धपद्धतीचा स्वीकार करून डोंगरी किल्ल्यांना संरक्षण विषयक कार्यात महत्त्वाचे स्थान दिले. शत्रू बेसावध असताना त्याच्यावर अनपेक्षितपणे छापे घालून, लुटमार करून, छुपे हल्ले करून त्यांनी आदिलशाह, मोगल यासारख्या बलाढ्य प्रतिस्पर्ध्याच्या सैन्याला पराभूत केले. महाराजांच्या या गनिमीकावा युद्धपद्धतीत स्वराज्यातील किल्ल्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका निभावली.

**११) स्वराज्याची राजधानी म्हणून रायगडचे महत्त्व :**

छत्रपती शिवाजी महाराजाच्या राज्याभिषेकप्रसंगी स्वराज्याच्या राजधानीचा किल्ला म्हणून 'रायगड' यास अधिकृत मान्यता मिळाली. त्यामुळे स्वराज्याच्या राजधानीचा गड म्हणून किल्ले 'रायगड' यास अनन्यसाधारण महत्त्व लाभले आहे. स्वतः महाराजांनीच रायगडची राजधानीचा गड म्हणून निवड करून त्यादृष्टीने आवश्यक त्या सर्व इमारतीचे बांधकाम व संरक्षणाच्या उपायोजना केल्या होत्या. या गडावरून महाराजांनी अनेक मोहिमांची तसेच रयतेच्या कल्याणाच्या योजनांची आखणी केली.

रायगडाचे महत्त्व वर्णन करतांना टॉमस निकल्सन त्याच्या रोजनिशीत लिहितो, ''वाटेत पायऱ्या खोदल्या आहेत. दरवाजाजवळील पायऱ्या पक्क्या खडकांत खोदल्या आहेत. जेथे टेकडीस नैसर्गिक अभेद्यता नाही, तेथे २४ फूट उंचीचा तट बांधला आहे. चाळीस फुटावर दुसरी भिंत (दुसरी तटबंदी) बांधून किल्ला इतका अभेद्य बनविला आहे, की अन्नाचा पुरवठा भरपूर असल्यास अल्पशिबंदीच्या साह्याने तो सर्व जगाविरुद्ध लढू शकेल, पाण्यासाठी मोठे तलाव असून ते पावसाळ्यात भरल्यावर पाणी वर्षभर पुरून उरेल, टेकडीच्या माथ्यावर मोठे शहर वसले आहे. घरे सामान्य प्रतीचीच आहेत. अत्युच्च भागी शिवाजीचा चौसोपी वाडा आहे. त्याच्या मध्यभागी मोठी इमारत आहे. 'तीत बसून तो कारभार पाहतो.' रायगडला 'पूर्वेकडील जिब्राल्टर' म्हणून ओळखले जाते. मात्र 'जिब्राल्टर' हा अभेद्य किल्ला असूनही त्यात अनेक उणिवा आहेत.

पाणीपुवठा, धान्य पुरवठा याबाबत 'जिब्राल्टर' हा गैरसोयीचा किल्ला आहे. या उलट रायगडही अभेद्य किल्ला असून तो धान्यपुरवठा व पाणी पुरवठा या सोयींनी युक्त आहे.

**१२) वास्तुरचनेच्या दृष्टीने किल्ल्याचे महत्त्व :**

वास्तुकलेच्या दृष्टीकोनातून किल्ल्याचे महत्त्व समजावून घेण्यासाठी मध्ययुगातील युद्धाचे तत्व व तंत्र लक्षात घेणे आवश्यक आहे. समोरासमोरच्या लढाईत जीवित व वित्तहानी अधिक होईल हे लक्षात घेवून मराठ्यांनी गनिमीकावा युद्धपद्धतीचा अवलंब करून शत्रूंशी लढा दिला. त्यादृष्टीने त्यांनी गडाची रचना केली. ज्यामध्ये किल्ल्यास भक्कम तटबंदी व पडकोट, तटबंदीस मोक्याच्या व आवश्यक त्या ठिकाणी बुरुज, किल्ल्याच्या सभोवती खंदक, येण्या-जाण्याचे मार्ग बुरुजाचे आहारी मात्र शत्रूचा थेट मारा चुकविणारे दरवाजे, चोरदिंड्या, गडावर येणारी अवघड वाट किंवा मार्ग बांधण्यात आले. तसेच धान्याची कोठारे, पाण्याच्या टाक्या, कचेऱ्या, महाल व आवश्यक त्या सर्व इमारती इत्यादींचीही बांधणी केली. यावरून मराठ्यांचे किल्ले हे तत्कालिन वास्तुकलेचे श्रेष्ठ नमुने होते.

**१३) 'आज्ञापत्रात' विशद झालेले किल्ल्यांचे महत्त्व :**

'संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग' या एकाच वाक्यात किल्ल्यांचे महत्त्व रामचंद्रपंत अमात्य यांनी 'आज्ञापत्रा'मध्ये स्पष्ट केले आहे. पुढे ते म्हणतात, ''दुर्ग नसता मोकळा देश परचक्र येताच निराश्रय, प्रजा भग्न होऊन देश उद्ध्वस्त होतो. देश उद्ध्वस्त झाल्यावरी राज्य असे कोणास म्हणावे? या करिता पूर्वी जे जे राजे झाले त्यांणी आधी देशामध्ये दुर्ग बांधून तो तो देश शास्वत करून घेतला. आणि आले परचक्रसंकट दुर्गाश्रयी परिहार केले.''

छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य विशद करताना रामचंद्रपंत अमात्य लिहितात, ''हे राज्य तर तीर्थरूप थोरले कैलासवासी स्वामींनी गडावरूनच निर्माण केले. जो जो देश स्वशासनवश न होय त्या देशी स्थळविशेष पाहून गड बांधिले, तसेच जलदुर्ग बांधिले.''

किल्ल्याचे महत्त्व सविस्तर विशद करतांना रामचंद्रपंत अमात्य म्हणतात, ''गडकोटाचा आश्रय नसता फौजेच्याने परमुलखी ताकाव धरून राहावत नाही. फौजेविरहित परमुखी प्रवेश होणेच नाही. इतक्याने कारण ते गडकोट विरहित जे राज्य त्या राज्याची स्थिति म्हणजे अभ्रपटलन्याय आहे. याकरिता ज्यास राज्य पाहिजे त्यांणी गडकोट हेच राज्य, गडकोट म्हणजे राज्याचे मुळ, गडकोट म्हणजे खजिना, गडकोट म्हणजे सैन्याचे वळ, गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी, गडकोट म्हणजे आपली वसतिस्थळे, गडकोट म्हणजे आपले प्राणसंरक्षण, असे पूर्ण चितांत आणून कोणाचे भरवशावर न राहता आहे त्याचे संरक्षण करणे: व नूतन बांधण्याचा हव्यास स्वतांच करावा, कोणाचा विश्वास मानू नये.'' आज्ञापत्रातील वरील वर्णनांवरून किल्ल्यांचे महत्त्व अधिक ठळकपणे प्रतिबिंबित होते.

**१४) 'शिवाभारता'त विशद झालेले किल्ल्यांचे महत्त्व :**

कवी परमानंद लिखित 'शिवभारत' (अ.१६,६१-६३) या ग्रंथामध्ये मराठेकालीन किल्ल्यांचे महत्त्व पुढील श्लोकांमधून व्यक्त झाले आहे.

न दुर्ग दुर्गमित्येव दुर्गम मन्यते जन:।
तस्य दुर्गमता सैव यत्प्रभुस्तस्य दुर्गम:।।
प्रभुणा दुर्गमं दुर्ग प्रभुदुगण दुर्गम:।
अदुर्गमत्वादुभयोर्विद्विषत्रेव दुर्गम:।।
ति ये यानि दुर्गाणि तानि सर्वाणि सर्वथा।
यथा सुदुर्गमाणि स्युस्तथा सद्यो विधीयातम।।

अर्थात 'दुर्गाला केवळ दुर्ग म्हणूनच लोक दुर्गम मानत नाहीत, तर त्याचा स्वामी दुर्गम असणे हीच त्याची दुर्गमता होय. प्रभुमुळे दुर्ग दुर्गम होतो व दुर्गामुळे प्रभु दुर्गम होतो. दोघांच्याही अभावी शतूच दुर्गम होतो. तुमचे जे दुर्ग आहेत ते सर्व ज्यायोगे सर्वस्वी अत्यंत दुर्गम होतील असे त्वरित करा.' शिवभारतातील हे श्लोक मराठेकालीन किल्ल्याचे महत्त्व प्रतिपादन करण्याच्या दृष्टीने अधिक बोलके आहे असेच म्हणावे लागेल.

**१५) २१ व्या शतकातील किल्ल्याचे महत्त्व :**

२१ व्या शतकामध्ये 'पर्यटन' हा सेवा स्वरूपाचा उद्योग म्हणून उदयास आला आहे. अशातच ऐतिहासिक पर्यटनामध्ये किल्ल्यांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. किल्ल्याचा इतिहास जाणून घेणे व किल्ल्यावरील वास्तुशिल्पे पाहण्यासाठी पर्यटक मोठ्या संख्येनी किल्ल्यांना भेटी देतात. त्यादृष्टीने स्वराज्यातील किल्ले तर महाराष्ट्राचे व देशाचे मानबिंदू आहेत. मराठेकालीन किल्ले व मावळ्यांनी आदिलशाही, मोगल यासारख्या बलाढ्य सत्ता तसेच पोर्तुगीज, इंग्रज, सिध्दी यासारख्या परकीय सत्तेसमोर न झुकता त्यांना तीव्र प्रतिकार केला. मराठेकालीन किल्ले हे स्वदेशप्रेम, स्वसंस्कृती, स्वाभिमान व स्वकर्तृत्वाचे साक्ष देत मोठ्या दिमाखात उभे आहेत. जे आजच्या पिढीला राष्ट्र उभारणीसाठी दिशादर्शन करीत आहे. स्वराज्याचे गडकोट केवळ दगड-मातीची स्मारके नसून स्वातंत्र्य, स्वराज्य याच्या संरक्षणासाठी हजारो मावळ्यांनी दिलेल्या बलिदानाचे प्रतिक असलेने पर्यटक आणि आजच्या तरूण पिढीने याची जाणीव ठेवून त्याचे पावित्र्य राखणे ही आपली जबाबदारी आहे. याची जाणीव ठेवणे गरजेचे आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न-३**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) स्वराज्याच्या राजधानीचा गड म्हणून.........यास अनन्यसाधारण महत्त्व आहे.

अ) रायगड ब) पावनगड क) प्रतापगड ड) सिंहगड

२) किल्ले................येथे छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक झाला.

अ) विशाळगड  ब) सिंधुदुर्ग  क) राजगड  ड) रायगड

३) छत्रपती शिवाजी महाराजांनी 'प्रतापगड' येथे.............चे मंदिर बांधले.

अ) अंबाबाई  ब) तुळजाभवानी  क) महाकाली  ड) महालक्ष्मी

४) जोड्या जुळवा

| गट १ | गट २ |
|---|---|
| १) रायगड | a) छ. शिवाजी महाराजांचे जन्मस्थळ |
| २) प्रतापगड | b) छ. शिवाजी महाराजांच्या पहिल्या विजयाचे प्रतिक |
| ३) तोरणा | c) छ. शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक |
| ४) शिवनेरी | d) छ. शिवाजी महाराज व अफझलखान संघर्ष |

५) खालील दोन विधानांच्या आधारे योग्य पर्याय निवडा.

१) छत्रपती शिवाजी महाराजांनी 'रायगड' व 'राजगड' येथे बाजारपेठा बांधल्या.

२) किल्ल्यावरील बाजारपेठा ह्या आर्थिक उलाढालीचे केंद्र होते.

अ) विधान १ बरोबर आणि २ चुकीचे आहे.

ब) विधान २ बरोबर आणि १ चुकीचे आहे.

क) दोन्ही विधाने बरोबर आहे.

ड) दोन्ही विधाने चुकीची आहे.

## १.३ सारांश :

छत्रपती शिवाजी महाराजांनी सह्याद्री पर्वत रांगेच्या नैसर्गिक अनुकूलतेचा लाभ घेत अनेक किल्ले बांधले. या किल्ल्यांच्या सहाय्याने मराठ्यांनी आदिलशहा व मोगल यासारख्या बलाढ्य सत्तेशी तीव्र लढा देवून स्वराज्य वृद्धी व स्वराज्य रक्षण केल्याचे सिद्ध होते. सिद्दी, पोर्तुगीज व इंग्रज यासारख्या परकीय सागरी सत्तेशी संपर्क येताच त्यापासून स्वराज्यातील प्रदेशाला व रयतेला होणारा संभाव्य धोका लक्षात घेता महाराजांनी 'जलदुर्ग' बांधणीचे धोरण स्विकारले. तसेच त्यादृष्टीने अल्पावधी उपलब्ध साधनाच्या आधारे स्वराज्याच्या समुद्र किनारपट्टीवर भक्कम 'जलदुर्ग' बांधले. या जलदुर्गांनी परकीय सागरी सत्तांवर वचक बसविला. तसेच आरमारास साह्य करून स्वराज्य रक्षण केल्याचे दिसून येते.

एकंदरीत, स्वराज्य निर्मिती, विस्तार व दृढीकरण यामध्ये मराठा किल्ल्यांनी महत्त्वाची भूमिका वठविली. त्यादृष्टीने किल्ले हे स्वराज्याचे आधारस्तंभ होते.

## १.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

किल्ला : संरक्षणात्मक तटबंदीयुक्त बांधकाम

गिरिदुर्ग : डोंगरी किल्ला किंवा डोंगरावर बांधलेला किल्ला

भुईकोट : भूमीवर किंवा सपाट जमिनीवर बांधलेला किल्ला

माची : गडाच्या चढणीवर मध्येच एखादे विस्तृत लांबी रूंदी असलेले मैदान

जलदुर्ग : समुद्राच्या पाण्यात खडकावर किंवा बेटावर बांधलेला किल्ला

मेट : गडाच्या येण्याजाण्याच्या मार्गावरील पहारा देण्याचे ठिकाण

बालेकिल्ला : किल्ल्याच्या उंच जागी बांधलेले तटवेष्ठित व सर्वात सुरक्षित ठिकाण

गढी : तटबंदीयुक्त घर, महाल किंवा मोठा वाडा

## १.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

- स्वयं अध्ययन प्रश्न–१

अ) योग्य पर्याय निवडा.

१) अ) दुर्गमान

२) ड) सिंधुदुर्ग

३) अ) डोंगरी

४) १–d, २–c, ३–a, ४–b

५) क) दोन्ही विधाने बरोबर आहे

- स्वयं अध्ययन प्रश्न–२

अ) योग्य पर्याय निवडा.

१) क) जलदुर्ग

२) ब) पावनगड

३) अ) आबाजी सोनदेव

४) १–d, २–a, ३–c, ४–b

५) क) दोन्ही विधाने बरोबर आहे

- स्वयं अध्ययन प्रश्न–३

अ) योग्य पर्याय निवडा.

१) अ) रायगड

२) अ) रायगड

३) ब) तुळजाभवानी

४) १ – c, २– d, ३– b, ४– a

५) क) दोन्ही विधाने बरोबर आहे

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

(अ) टीपा लिहा

१) किल्ला

२) गिरिदुर्गाची वैशिष्ट्ये

३) जलदुर्ग

४) किल्ले बांधणीची गरज

५) किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व

६) आज्ञापत्रातील किल्ल्याचे महत्त्व

(ब) लघुत्तरी प्रश्न

१) किल्ला म्हणजे काय? ते सांगून किल्ल्याचे प्रकार स्पष्ट करा.

२) मराठ्यांच्या इतिहासातील किल्ल्यांचे महत्त्व विशद करा.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१) कुलकर्णी, अ. रा. (संपा.), आज्ञापत्र, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००७

२) आवळसकर, शां. वि., रायगडची जीवनकथा, महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९६२

३) जोशी स. वि., दुर्गसंवर्धन, बुकमार्क पब्लिकेशन, पुणे, २०१८

४) कुलकर्णी, अ. रा. व खरे ग. ह. (संपा.), मराठ्यांचा इतिहास, खंड पहिला, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८४

५) रानडे, म. गो. (अनुवाद फाटक, न.र.), मराठी सत्तेचा उत्कर्ष, महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९६४

६) खोबरेकर, वि. गो., महाराष्ट्राचा इतिहास मराठा कालखंड भाग १, शिवकाळ (१६३०-१७०७), महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, २००६


❑❑❑

## घटक २
## मराठाकालीन किल्ल्यांचे स्वरूप आणि वास्तूकला

**अनुक्रमणिका**


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

  २.२.१ किल्ले बांधण्यासाठी जागेची निवड

  २.२.२ किल्ले वास्तुकलेचे प्रमुख घटक

  २.२.३ मराठाकालीन किल्ले प्रशासन

२.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके/ संदर्भ ग्रंथ सूची


### २.० उद्दिष्ट्ये

विद्यार्थी मित्रांनो या घटकाचा अभ्यास केल्यानंतर खालील मुद्यांचे आकलन होण्यास मदत होईल.

१) मराठाकालीन किल्ले बांधणीचे महत्व स्पष्ट करता येईल.

२) मराठा कालखंडात किल्ले बांधणी करताना कोणत्या घटकांचा सविस्तर विचार करून दुर्ग उभारले जात याची चर्चा करता येईल.

३) मराठाकालीन किल्ले वास्तुकलेचे, प्रमुख घटकांचे वर्णन करता येईल.

४) मराठाकालीन किल्ले वास्तुकलेची प्रमुख वैशिष्ठ्ये सांगता येतील.

५) मराठाकालीन किल्ले प्रशासन कसे होते ते स्पष्ट करता येईल.

६) मराठाकालीन किल्ले प्रशासनाची वैशिष्ठ्ये सांगता येतील.

७) छत्रपती शिवाजी महाराजांचे किल्ले व्यवस्थापन समजण्यास मदत होईल.

## २.१ प्रस्तावना

प्राचीन काळापासून जगाच्या इतिहासामध्ये राजकिय घडामोडींमध्ये किल्ल्यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. कौटिल्याने अर्थशास्त्रामध्ये किल्ल्याची चर्चा करताना किल्ल्याचा समावेश राज्याच्या सात अंगांमध्ये केलेला आहे. प्राचीन काळात मौर्य, सातवाहन, चालुक्य काळामध्ये किल्ले अथवा दुर्गांचा उल्लेख आढळतो. शिलाहार राजांनी अनेक किल्ले बांधून आपल्या राज्याचा भक्कम बंदोबस्त केला होता. शिलाहार राज्यकर्त्यानंतर देवगिरीच्या यादवांनी देवगिरीचा उत्तम किल्ला बांधला. विजयनगरचे साम्राज्य संपुष्टात आल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या उदयापर्यंत ही परंपरा खंडित झालेली दिसते. छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्यांचा उपयोग राज्याच्या संरक्षण व्यवस्थेत अत्यंत खुबीने करून घेतलेला दिसतो. मध्ययुगीन काळात किल्ल्याचे महत्त्व समजून स्वराज्याची उभारणी, विस्तार आणि स्वराज्य संरक्षणासाठी किल्ल्यांचा पुरेपुर वापर करून घेणारे छत्रपती शिवाजी महाराज एकमेव होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी शत्रूच्या ताब्यातील अनेक किल्ले प्राप्त करून त्या किल्ल्यांची डागडुजी आणि पुर्नबांधणी केली. स्वराज्याचा जसा विस्तार होत गेला त्याचबरोबर त्यांनी आवश्यकतेनुसार नवीन किल्ले बांधले. स्वराज्याचा विस्तार होत असताना शत्रूंचा मुकाबला करण्यासाठी किल्यांचा वापर अगदी अचूकपणे करून घेतला. शत्रू प्रदेशातील किल्ले जिंकून घेणे, नवीन किल्ले बांधणे, किल्यांची डागडुजी करणे, किल्यावर पुरेशी शिबंदी ठेवणे आणि किल्ल्यावर पुरेशी रसद राहील याच्याकडे महाराजांचा कटाक्ष असे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचा कणा म्हणून किल्यांना अनन्यसाधारण स्थान दिलेले दिसते. रामचंद्रपंत अमात्य आपल्या आज्ञापत्रात किल्ल्याची महती सांगताना असे नमूद करतात की, ''संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग. दुर्ग नसता मोकळा देश परचक्र येताच निराश्रय, प्रजा भग्न होऊन देश उद्ध्वस्त होतो. देश उद्ध्वस्त झाल्यास राज्य असे कोणास म्हणावे? या करिता पूर्वी जे राजे झाले त्यांनी आधी देशांमध्ये दुर्ग बांधून तो देश शाश्वत करून घेतला. परचक्रसंकट दुर्गाश्रयी परिहार केले.'' अर्थात किल्ल्याच्या आश्रयाने स्वराज्याचे संरक्षण करता येणे शक्य होते शिवाय शत्रू बलाढ्य असेल तर अनेक कुटुंबाना किल्ल्यामध्ये आश्रय मिळत असे. परचक्राच्या प्रसंगी रयतेचे जीवन व अब्रूचे रक्षण करता येत असे. किल्ला हे जसे लष्कराचे महत्वाचे ठाणे असे, त्याचप्रमाणे मुलकी प्रशासन व महसूल गोळा करण्यासाठी लागणारी यंत्रणा तयार करण्याचे काम किल्ल्याच्या आश्रयाने होत असे. किल्ल्याच्या आश्रयाने सभोवतालच्या गावांचे संरक्षणदेखील होत असे. तसेच किल्ले हे टेहळणीच्या कार्यातही उपयोगी असत.

स्वराज्यावर आलेल्या अनेक संकटांना किल्ल्याच्या आश्रयाने तोंड देता आले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ले धोरणासंबंधी गो. स. सरदेसाई म्हणतात की, ''प्रत्येक किल्ला हा शिवरायांच्या राज्य मालिकेतील एक अवयव होय. या बहुमोल दुर्ग मालिकेने महाराजांनी आपले राज्य बंदिस्त केले. त्यांनी आपली अचाट कृत्ये या किल्ल्यांच्या साहाय्याने तडीस नेली. शिवरायांनी प्राप्त केलेले धन हे हा किल्ल्यांची बांधणी करून ते सुरक्षित ठेवण्यातच खर्च झाले. आरमाराचे महत्त्व ओळखून सागरी किल्ले बांधले. मालवणचा सिंधुदुर्ग हे राजांच्या दूरदृष्टीचे उदाहरण आहे. महाराजांच्यावर अनेक आणीबाणीचे प्रसंग आले,

त्यामधून त्यांची सुटका या किल्ल्यानीच केली. कित्येक किल्ले संरक्षणाच्या दृष्टीने तर काही शत्रूवर अनपेक्षित हल्ला करून त्याला सैरभैर करून टाकण्यासाठी राजे उपयोगात आणीत असत. आपली राजधानी एका किल्ल्यावर निर्माण करून शिवरायांनी किल्ल्यांचे महत्त्व जगाला पटवून दिले.'' जेम्स डग्लस या युरोपिय इतिहासकाराने छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांचे महत्त्व स्पष्टपणे नमूद केले आहे. तो लिहितो की, ''त्यांचे सर्व सामर्थ्य किल्यावर अवलंबून होते, तो खराखुरा दुर्ग स्वामी होता. त्याचा जन्म दुर्गात झाला. त्याला दुर्गामुळे वैभव प्राप्त झाले. त्याचे किल्ले त्याच्या भारतातील शत्रूंना धाक होता. त्याच्या राष्ट्राची ती संवर्धन भूमी होती. त्याच्या विजयाचा तो पाया होता. त्याच्या वाढत्या महत्वाकांक्षेचा तो जिना होता. दुर्ग हेच त्याचे निवासस्थान व तेच त्याच्या आनंदाचे निधान होते. कित्येक किल्ले त्याने बांधले, जे आधी बांधले होते त्या सर्वांना त्याने बळकटी आणली.'' एकूणच शिवकालीन इतिहासाचा धांडोळा घेतला असता आपणास असे दिसते की, किल्ले हे स्वराज्याचे प्रशासन, युद्धतंत्र आणि संरक्षणाचा महत्त्वाचा दुवा होते.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ किल्ले बांधण्यासाठी सुयोग्य स्थाननिश्चीती

रामचंद्रपंत अमात्य यांनी आज्ञापत्रात शिवकालीन किल्लाबांधणी संबंधी विस्तृत चर्चा केलेली आहे. किल्ला बांधणीमध्ये किल्ल्यासाठी स्थल संशोधन, किल्ल्यावरील जलसंचय, किल्ल्याचे दरवाजे, किल्ल्याचे संरक्षण, किल्ल्यामधील बालेकिल्ला, माची, अठरा कारखाने व इतर बाबींचा समावेश होतो. याशिवाय मराठाकालीन काही बखरींमधूनही किल्ला बांधणी संबंधी माहिती मिळते. किल्ला बांधणीसंबंधी 'आज्ञापत्र'कार म्हणतात की, ''राज्यरक्षणाचें मुख्य कारण किल्ले, देशोदेशीं स्थळें पाहून बांधावे. किल्ल्यासमीप दुसरा पर्वत किल्ल्यासमुदायी आसू नये. कदाचित असला तरी सुरूंग लावून पाडून गडाचे आहारी आणावा. सुरूंगास असाध्य असा असला तरी तोहि जागा मोकळी न सोडिता बांधून मजबूत करावा. गडाची इमारत गरजेची करू नये. तट, बुरूज, चिलखते, पहारे, पडकोट जेथे जेथे असावे ते बरे मजबूत बांधावे, नाजूक जागे जे असतील ते सुरूंगादि प्रयत्नेंकरून, अवघड करून, पक्की इमारत बांधोन गडाचा आयब काढावा. दरवाजे बांधावे, ते खालील मारा चुकवून, पुढे बुरुज देऊन, येतिजाती मार्ग बुरूजाचे आहारी पडोन दरवाजे बांधावे. किल्ल्यास एक दरवाजा थोर अयब आहे, याकरिता गड पाहून, एक दोन तिन दरवाजे, तशाच चोरदिंड्या करून ठेवाव्या. त्यामध्ये हमेशा राबत्यास पाहिजे तितक्या ठेवून वरकड दरवाजे व दिंड्या चिणून टाकाव्या. इमारतीवरील मामलेदार वगैरे आदिकरून ठेवाणे ते बरे शहाणे, कृतकर्मे, निरालस्य पाहून ठेवावे. गडाची इमारत मुस्तेद करावी. कित्येक किल्ले प्रत्तेक पर्वताचे आहेत.

कित्येक पर्वत थोर थोर, त्याचा एखादा कोन, कोपऱ्याची जागा पाहोन बांधावा लागतो. त्यास दरवाजापुढे अथवा तटाखाली मैदानभुमी लागते, म्हणजे तो गड भुईकोटांत दाखल जाहला. आला गनीम त्यानी दरवाजास अथवा तटास लागावे असेम होते ही गोष्ट बरी नव्हे. याकरिता जातीचा किल्ला असेल त्यास आधी सर्व प्रयत्ने दरवाज्यापुढे तटाखाली जितके मैदान असेल तितका खंदक खोल आणी रुंद खणून तटाचे पायी दुसरा पडकोट मजबूत बांधोन त्यावर भांडी, जुंबरे ठेवून, खंदकाचे कडेस एकाएकी परकी फौज येऊन

न पावे असे करावे. गडास यावयाचे मार्ग असतील ते सुगम नसावे. सुगम असले तर ते मार्ग मोडून, तावर झाडी वाढवून आणखीकडे परके फौजेस येता कठीण असे मार्ग घालावे. याविरहित बलकबुलीस चोरवाटा ठेवाव्या. त्या सर्वकाळ चालू देऊ नयेत. समयास तेच दिंडी अथवा दरवाज्याचा राबता करुन सांजवादा चढवीत जावा.''

**किल्ला बांधणीचे स्थान व उभारणी :**

**१) स्थळ संशोधन :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ले बांधण्याच्या जागेसंबंधी विशेष काळजी घेतलेली दिसून येते. किल्ला बांधण्याची जागा ही अवघड आणि दुर्गम ठिकाणी असली पाहिजे. पाणीपुरवठा मुबलक प्रमाणात झाला पाहिजे. सभोवतालच्या प्रदेशावर अशा किल्ल्यावरून देखरेख ठेवता आली पाहिजे. राज्याचा मुख्य भाग किल्ला असल्याने शिवभारतकार परमानंद म्हणतात की, 'दुर्गाला केवळ दुर्ग म्हणून लोक दुर्गम मानत नाहीत, तर त्याचा स्वामी दुर्गम असणे हीच त्याची दुर्गमता. प्रभुमुळे दुर्ग दुर्गम होतो व दुर्गामुळे प्रभू दुर्गम होतो. दोघांच्या अभावी शत्रूच दुर्गम होतो.' रामचंद्रपंत अमात्य आज्ञापत्रात दुर्गम स्थळाचे संशोधन कसे करावे याविषयी म्हणतात की, ''.....राज्यरक्षणाचे मुख्य कारण किल्ले, देशोदेशी स्थळें पाहून बांधावे. किल्ल्यासमीप दुसरा पर्वत किल्ल्यासमुदायी आसू नये. कदाचित असला तरी सुरूंग लावून पाडून गडाचे आहारी आणावा. सुरूंगास असाध्य असा असला तरी तोहि जागा मोकळी न सोडिता बांधून मजबूत करावा.... '' सर्व प्रथम अत्यंत दुर्गम अशा डोंगराची निवड करावी. अशा ठिकाणी किल्ला बांधल्यानंतर त्याच्या भोवती तटबंदी करावी व किल्ल्याची अभेद्यता वाढवावी. पर्वत दुर्गम आहे परंतु जवळच इतर उंच डोंगर अथवा शिखरे आहेत मात्र ती सुरुंग लावून फोडता येत नसतील तर किल्ल्याचा अभेद्यपणा टिकवण्यासाठी त्याच्या समोरचा डोंगरही बांधून पूर्ण करावा. उदा. अंकाई- टंकाई, चंदन-वंदन.

**२) जलसंचय :**

किल्ल्याची अभेदयता टिकवण्यासाठी पाणी हा अत्यंत महत्वाचा घटक होता. किल्ल्यांवर बारमाही स्वरुपात पाणीपुरवठा झाला पाहिजे यावर महाराजांचा कटाक्ष होता असे दिसते. किल्ला बांधण्यापूर्वी त्या ठिकाणी पाण्याची उपलब्धता आहे का नाही याची खात्री करून किल्ला बांधला जात असे. पाण्याची नैसर्गिक सोय नसेल तर पाण्यासाठी वेगळी व्यवस्था करण्यात येत असे. पाण्याची सोय झाल्याशिवाय किल्ल्याचे इतर बांधकाम करीत नसत. पाणी साठवण्यासाठी उतारावर बांध घालणे, मोठे तलाव खोदणे, खडकात छोट्या-मोठ्या टाकी खोदणे आवश्यक होते. किल्ल्यावरील पाण्यासंबंधी रामचंद्रपंत अमात्य म्हणतात की, ''गडावर आधी उदक पाहून किल्ला बांधावा. पाणी नाही आणी ते स्थळ तो आवश्यक बांधणे प्राप्त झाले तरी आधी खडक फोडून तळी, टाकी पर्जन्यकाळापर्यंत संपूर्ण गडास पाणी पुरेल अशी मजबूत बांधावी. गडावरी झराही आहे. जसे तसे पाणीही पुरते, म्हणुन तितकीयावरीच निश्चिती न मानावी, उद्योग करावा, कि निमित्य की, झुंजामध्ये भांडियांचे आवाजाखाली झरे स्वल्प होतात आणि पाणियाचा खर्च विशेष लागतो, तेव्हां संकट पडते याकरीतां तसे जागीं जखिरियाचे पाणी म्हणून दोन चार टाकी तळी बांधावी. त्यातील पाणी खर्च होऊ

न द्यावे, गडाचे पाणी बहुत जतन राखावे.'' छत्रपती शिवाजी महाराजांनी जे किल्ले नव्याने बांधले अथवा ज्यांची पुर्नबांधणी केले तिथे पाण्याची उत्तम व्यवस्था केलेली दिसते. उदा. सिंधुदुर्ग, रायगड (गंगासागर तलाव), राजगड (ब्रह्मऋषींचे तळे, पद्मावतीचे तळे), पन्हाळा (सादोबा तलाव, नागझरी, सोमाळ, अंधारबाव), सिंहगड (देवटाके), विशाळगड (भूपाळ तळे), इत्यादीचा समावेश आहे.

**महाद्वार व इतर दरवाजे :**

किल्ल्याखालून तोफेने मारा करता येणार नाही अशा ठिकाणी दरवाजा असे. किल्ल्यामध्ये प्रवेशद्वार एकच न ठेवता सोईप्रमाणे, गरजेनुसार एक, दोन किंवा तीन सुद्धा बांधत असत. राजकियदृष्ट्या महत्त्वाच्या किल्ल्यांवर चोर दरवाजाही बांधला जात असे. ऐनवेळी अशा चोर दरवाजामधून शत्रुच्या हाती सापडण्याचा धोका असल्यास निसटून जाण्यासाठी वापर होत असे. मुख्य प्रवेशद्वार भरभक्कम बांधणीच्या दोन बुरुजांमध्ये बांधलेले असे आणि तो दरवाजा बाहेरून तोफा अथवा बंदुकीच्या टप्प्यात येवू नये म्हणून त्याच्या संरक्षणार्थ आडोसा देणारे तट बुरूजयुक्त बांधकाम केलेले असे त्याला रणमंडल असे म्हणतात. शिवकालीन अनेक किल्ल्यामधे रणमंडलाची रचना दिसून येते. उदा. अलिबागचा पाणकोट, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, रायगड, तोरणा, सुधागड इत्यादी किल्ले आहेत. अनेक वेळा जिभीचा वापर मोठ्या कल्पकतेने करून स्थलदुर्गाच्या मुख्य दरवाजाचे संरक्षण केलेले आढळते. किल्ल्याखाली जर मैदान असेल तर तेथे खोल व रुंद खंदक खोदलेले असत. किल्ल्याच्या दरवाजांना लोखंडी पट्ट्या मारून दरवाजा पक्का केला जाई. दरवाजे लाकडी व जाड असत, परंतु त्यांना बाहेरच्या बाजूने धडक मारू नये म्हणून अणकुचीदार लांब खिळे ठोकलेले असत. किल्ल्यातील तटांनाही दरवाजे असत. किल्ल्यामधून आत प्रवेश केल्यानंतर समोर वाट न ठेवता, डाव्या किंवा उजव्या बाजूला वाट असे. दरवाजाच्या आतल्या बाजूस दरवाजा घट्ट बसण्यासाठी एक अथवा दोन मोठे आडणे असे.

किल्ल्यातील मुख्य प्रवेशद्वारातून किल्ल्यात प्रवेश केल्यावर एखाद्या अनोखी व्यक्तीला सहजासहजी हवे तेथे फिरता येऊ नये म्हणून किल्ल्याच्या आतील वाटांच्यावर एक-दोन दरवाजे बांधण्याची पद्धत होती. उदा. प्रचंडगडाच्या बिनीदरवाजातून आतमध्ये गेल्यानंतर कोठी, कोकण आणि चित्ता दरवाजा असे तीन दरवाजे लागतात. शिवनेरी किल्ल्यामध्ये असे सात दरवाजे आहेत. किल्ल्यामधील या दरवाज्यांना उपदरवाजे म्हणतात. याशिवाय काही किल्ल्यांच्यावर चोर दरवाजे देखील पाहावयास मिळतात. उदा. रायगड किल्ल्यास असा एक चोर दरवाजा आहे. मुख्य दरवाजा शत्रूने फोडला तर चोरवाटेने गरजेनुरूप पलायनाची सोय केलेली असे.

**स्वयं-अध्ययन प्रश्न क्र. १**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१) देवगिरीचा किल्ला .......... यांनी बांधला.

अ) यादव ब) शिलाहार क) चालुक्य ड) मौर्य

२) कौटिल्याने .......... ग्रंथामध्ये किल्ल्याची चर्चा केलेली आहे.

अ) चाणक्य नीती ब) अर्थशास्त्र क) राज्यशास्त्र ड) शुक्रनीती

३) 'संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग' असे .......... ग्रंथात म्हटले आहे.

अ) आज्ञापत्र ब) अर्थशास्त्र क) राज्यशास्त्र ड) शुक्रनीती

४) कवींद्र परमानंद यांनी ............. ग्रंथ लिहिला आहे.

अ) आज्ञापत्र ब) अर्थशास्त्र क) शिवभारत ड) शुक्रनीती

५) बिनीदरवाजा .......... किल्ल्यावर आहे.

अ) पन्हाळा ब) शिवनेरी क) प्रचंडगड ड) रायगड

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) आज्ञापत्र हा ग्रंथ कोणी लिहिला आहे.

२) कोणत्या युरोपीय इतिहासकाराने छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्याची स्तुती केलेली आहे.

३) सादोबा तलाव कोणत्या किल्ल्यावर आहे.

४) सलग सात दरवाजांची रचना कोणत्या किल्ल्यावर आहे.

५) रायगडावरील प्रसिद्ध तलाव कोणता आहे.

## २.२.२ मराठाकालीन किल्ले वास्तुकलेचे प्रमुख घटक

शिवकालीन किल्ल्याच्या वास्तुरचनेसंदर्भात आज्ञापत्र, राज्यव्यवहारकोश व काही बखरींच्या मधून किल्ला बांधकामाच्या संदर्भात माहिती मिळते. रघुनाथपंत हणमंते यांनी राज्यव्यवहार कोशामध्ये दुर्गवर्ग या प्रकरणात किल्ल्याच्या संदर्भात खालीलप्रमाणे माहिती नमूद केलेली आहे, ''.... गडाच्या डोंगराच्या बाजूने कडे तुटलेले असत व वर शिखरे असत. त्यासभोवती तट व तटाला विशिष्ट जागी बुरूज बांधीत असत. गडांच्या पायथ्याला माचीचे डोंगर असत व तेथे परचक्राच्या परिहारार्थ तोंड देता यावे म्हणून माचीचा बंदोबस्त करीत. गडात एक बालेकिल्ला ही बांधीत असत. इतर दुर्ग व भुईकोट यांच्या सभोवती जी भिंत असते तिच्याभोवती खंदक असे; परंतु हा खंदक जेथे वलयाकार असे तेथे त्याला रेवणी असे म्हणत. तटाच्या पृष्ठभागावर एक पडकोट म्हणजे भिंत बांधत असत. तटाभोवती टेहळणी करण्यासही सुरक्षिततेच्या दृष्टीने सोईचे असे; कारण त्या तट, ज्या भिंतीत जे छिद्र ठेवलेले असत त्यांना जंग्या म्हणत. त्यातून थेट त्या पायथ्यापर्यंतच्या हालचालींवर गुप्तपणे लक्ष ठेवणे शक्य होत असे. गस्तीच्या सोईसाठी फालिका म्हणजे चर्या ही असत. गडाला दरवाजे असत. मुख्य दरवाजावरील माडावर एक देवडी व तेथून बाहेर पाहता येण्यासाठी तिला झरोके असत. त्या देवडीवर जाण्यासाठी एक जिना ठेवीत व देवडीवरील छपरावर सज्जा

किंवा देवडीला गच्ची बांधीत. दारांच्या चौकटी व दारे ही फार मजबूत व न किडणाऱ्या लाकडांची असत. मुख्य दारांच्या उंबऱ्या बाहेर एक चांगला ओटा बांधीत व त्या ओट्याचा उपयोग बाहेरील देवडीसाठी करीत. दाराला आत भक्कम अर्गळा व बाहेर व आत कुलपे लावीत, देवडी व तटातील पावसाचे पाणी वगैरे बाहेर जाण्यासाठी लहान लहान गटारे किंवा नळ टाकीत. दरवाजाच्या आत एखादे कारंजे व मोठे उघडे मैदान किंवा चबूतरा राखीत, खास बागा ही लावीत. गडकिल्ल्यात हरएक लढाऊ वस्तूंचा संग्रह म्हणजे जकीरा असे व जीवनोपयोगी आवश्यक वस्तूचा भरपूर साठा ठेवीत. हा साठा किमान एक- दोन वर्षे गडावरील सर्व लोकांस भरपूर प्रमाणात मिळेल इतका शिल्लक ठेवला जाई. त्यासाठी गडावर एक 'अंबरखाना' म्हणजे धान्याचे कोठार असे, व हे धान्य किंवा गल्ला गडावरील व गडावर अवलंबून असणाऱ्या लोकांस भरपूर होईल असाच संग्रहित केला जाई. त्याशिवाय एक कारखाना बांधला जात असे. ''

**तटबंदी :**

किल्ल्याच्या संरक्षक भिंतीतील बुरुजांना जोडणारी भरभक्कम भिंत म्हणजे तटबंदी. किल्ल्याच्या संरक्षणाच्या दृष्टीकोणातून किल्ल्याच्या काही भागात किंवा संपूर्ण किल्ल्याच्या सभोवताली बांधलेली भिंत. तटबंदी दगड-विटा-माती-लाकूड अशा गोष्टींचा वापर करून बांधत असत. तटबंदीचा आकार आवश्यकतेनुसार अथवा भौगोलिक परिस्थितीनुसार अर्धवर्तुळाकार बांधला जात असे. तटबंदी ही घडीव दगडावर दगड रचून बांधत असत अथवा तिरकस व एकमेकांत गुंतलेल्या दगडांमध्ये बांधत. महाराष्ट्रातील किल्ल्यांच्या काही तटांची बांधणी चिलखती पद्धतीची आहे. म्हणजे एकात एक असे दोन तट. रायगडाचे तट असे आहेत. तटबंदीच्या प्रत्येक भागाला काही विशिष्ट नावे दिलेली दिसतात. तटबंदीवरून सैन्याला व्यवस्थित फिरता अथवा सैन्य सामग्रीची व्यवस्थित आदान-प्रदान करता यावी यासाठी हे तट अतिशय रुंद आणि भक्कम बांधत असत. तटावरील वरच्या भागास फांजी असे म्हणतात. तटबंदीच्या माथ्यावर बांधलेल्या भक्कम बांधकामाला चर्या किंवा कंगोरा असे म्हणतात. भुईकोटास सर्व बाजूंनी तट असणे आवश्यक असे. अनेक किल्ल्यामध्ये तटबंदी बरोबर पडकोट बांधलेले दिसतात.

**कोट :**

तटबंदी माची इतर भागापासून किल्ल्याचा संरक्षित परिसर वेगळा करणारी भिंत म्हणजे कोट. हा कोट चिखल माती, कच्च्या विटा, पक्क्या भाजक्या विटा अथवा दगडी असे.

**पडकोट :**

पडकोट म्हणजे किल्ल्याच्या तटबंदीच्या आतील तट म्हणजे पडकोट. अर्थात कोटाच्या आतील दुसरा कोट. त्याला मेढेकोट असेही म्हणतात

**बुरूज :**

किल्ल्याच्या तटाला लगटू करू पाहणाऱ्या सैनिकांवर किल्ल्याच्या तटापासून पुढे आलेल्या बुरुजांमधून मारा करणे अधिक सोयीस्कर असे. बुरूज किल्ल्याच्या ही पहाऱ्याची जागा. बुरुजाच्या आत पहारेकऱ्याची

राहण्याची सोय असे. बुरुजांवर तोफा ठेवल्या जात. तोफांची तोंडे वेगवेगळ्या दिशांना फिरवण्यासाठी त्या लाकडी गाड्यांवर बसवलेल्या असत.

**खंदक :**

किल्ल्याच्या तटाभोवती बाहेरच्या बाजूस रुंद व खोलगट खणलेल्या चरीला खंदक अथवा परिखा असे म्हणतात. खंदकामध्ये पाणी साठवलेले असते. अंजनवेल, आग्वाद, जयगड, देवगड, निवती इत्यादि किल्ल्यावर खंदक आहेत. बहुतांशी भुईकोट किल्ल्याभोवती संरक्षक कवच म्हणून खंदक खणत असत. कारण भुईकोट सपाटीवर असल्यामुळे शत्रुसैन्य तटबंदीला थेट भिडू नये म्हणून तटबंदीच्या बाहेर लांब, रुंद व खोल चर खणून त्यात पाणी सोडत असत. उदा. देवगिरी किल्ल्याचा खंदक प्रसिद्ध आहे.

**रेवणी :** किल्ल्याच्या सभोवतालचा खंदक आणि किल्ल्याची तटबंदी यांच्यामधील जागा ज्याला रेवणी असे म्हणत.

**रणमंडल :** किल्ल्याच्या मुख्य प्रवेशद्वारच्या बाहेरील दोन्ही बाजूस लागून अर्धवर्तुळाकार बुरूज बांधलेले असत त्याला रणमंडल म्हणत. उदा. रायगड किल्ल्याचा महादरवाजा.

**देवडी :** किल्ल्याच्या दरवाज्याजवळ बाहेरच्या पहारेकऱ्यांसाठी बसण्यासाठी केलेल्या चौथऱ्यासारख्या जागेस देवडी म्हणत.

**जिभी :** किल्ल्याच्या दरवाज्या बाहेरून किल्ल्याच्या आतील भाग दिसू नये यासाठी किल्ल्याच्या दरवाजासमोर काही अंतरावर आडवी बांधलेली संरक्षणात्मक भिंत म्हणजे जिभी. बहुतांशी वेळा ती चंद्रकोरीच्या आकाराची असे. जिभीच्या दोन्ही टोकांना अर्धवर्तुळाकार बुरूज बांधलेले असतात.

**अलंगा :** किल्ल्यांवरील गस्त घालताना पहारेकऱ्यांना तटाजवळ विशिष्ट जागी बांधलेल्या घरांना अलंगा असे म्हणतात. अलंगा कायम पहारा करणाऱ्या सैनिकांच्यासाठी तटबंदीजवळ मात्र तटबंदीच्या आत बांधलेल्या असत. रायगड किल्ल्याच्या चारही बाजूंना अशा तऱ्हेचे अलंगे पाहावयास मिळतात.

**अडसर :** किल्ला आतून बंद करण्याचे साधन ज्याला अडसर, आडणे अथवा आगळा असे म्हणतात. किल्ल्याचा दरवाजा बंद केल्यानंतर आतील बाजूने एक आडवे चौकोनी अथवा गोल आकाराचे अडसर लावून तो दरवाजा बाहेरून उघडता येणार नाही अशी व्यवस्था केलेली असते. अडसर दरवाज्याच्या आतील एका बाजूला पूर्णपणे आत सरकवून ठेवता येतो अशी रचना असते.

**जंग्या :** किल्ल्याच्या तटबंदीत असलेल्या चर्या आणि फांजीमधून बाण, बंदुकीच्या गोळीने शत्रुचा वेध घेण्यासाठी आणि युध्दप्रसंगी त्या तटबंदीकडे येणाऱ्या शत्रुसैन्यावर नजर ठेवण्यासाठी तटबंदीत पाडलेले व दुर्गाबाहेरच्या बाजूला उतरत गेलेले चौकोनी आकाराचे छोटे गाळे म्हणजे जंग्या. जंग्या तटबंदीप्रमाणेच बुरुजात देखील असत. फांजीच्या आश्रयाला राहून किल्ल्यातील सैन्य शत्रूच्या हल्ल्यापासून संरक्षण करून घेत असत आणि जंग्यावाटे बाण अथवा बंदुकीच्या गोळ्या झाडून शत्रू सैन्याचे आक्रमण रोखण्याचे माध्यम असे.

**लादणी :** किल्ल्याच्या तटबंदीवरून गस्त घालण्यासाठी फांजीच्या काटकोनात असलेल्या फरसबंदी मार्गाला लादणी असे म्हणतात. लादणी इतकी रुंद असते की एका वेळेस चार पाच लोक त्यावरून सहज चालत जाऊ शकत, तर कधी इतकी अरुंद असते की एका वेळेस एकच माणूस त्यावरून चालत जाऊ शकत असे.

**माची :** माची हा किल्ल्याच्या बांधणीतला अत्यंत महत्त्वाचा घटक होता. ज्या गडाचा विस्तार अधिक सपाट असे त्या गडावर माच्या अधिक असत. राज्यव्यवहार कोशामध्ये 'माची' ला 'उपत्यका' असे म्हटले आहे. डोंगराच्या उतरणीवर मध्येच जी सपाट जागा असे त्याला माची असे म्हणत. डोंगरी किल्ल्यावर एक किंवा अनेक टोकाचे कडे असतात, त्यावर संरक्षणाची व्यवस्था करून माची बांधतात. काही प्रसंगी माचीवर इमारती अथवा सदर बांधली जात असे. माचीवर शिबंदी असते. माचीवर तट बांधून सुरक्षितता निर्माण करण्यात येत असे. डोंगरी किल्ल्यावर माची असे. मात्र प्रत्येक डोंगरी किल्ल्यावर माची असेलच असे नाही. काही किल्ल्यावर अनेक माच्या असलेल्या दिसतात. उदा. राजगडावर पद्मावती, सुवेळा व संजीवनी अशा तीन माच्या आहेत. प्रचंडगडावर बुधला व झुंझार माच्या आहेत. माची हा देखील दुर्गाचाच एक भाग असल्याने तो देखील तट-बुरुजांची संरक्षक भिंत बांधून सुरक्षित केलेला असे.

**अंधार कोठडी :** अंधारकोठडी म्हणजे कैदी ठेवायची जागा. गंभीर गुन्हे केलेल्या गुन्हेगाराला अंधारकोठडीमध्ये ठेवले जात असे. महत्त्वाच्या किल्ल्यामध्ये अशा प्रकारच्या अंधार कोठड्या असत. अंधार कोठडी साधारणत: वीस ते पंचवीस हात लांबीची, अतिशय अरुंद खोली असे. खोलीमध्ये दगडी फरसबंदी केलेली असे आणि वरती केवळ एक झरोका (खिडकी) ठेवलेला असे. उदा. रायगडावर अशा प्रकारच्या तीन अंधारकोठड्या पाहावयास मिळतात.

**धान्यकोठी :** किल्ल्यावर धान्य (अंबरखाना) साठवण्यास ज्या इमारतीची बांधणी केलेली असते त्यास धान्यकोठी अथवा अंबरखाना म्हणतात. पन्हाळगडावरील गंगा, यमुना व सरस्वती या धान्यकोठ्या प्रसिध्द आहेत. रायगडावर सध्या ज्याला राजवाडा आणि भांडारगृहे म्हणून ओळखले जाते ती धान्य कोठारे अथवा पेव आहेत. ज्यामध्ये वरच्या बाजूने पोती सोडण्याची व्यवस्था आहे. धान्यकोठीची रचना अतिशय व्यवस्थित असते. आतमध्ये ओल येऊ नये म्हणून इतर इमारतीपासून वेगळी, तळातील भिंतीची बांधणी पूर्ण दगडी केलेली असते.

**शौचकूप :** किल्ल्याच्या तटबंदीवर गस्तीसाठी नेमलेल्यास पहारेकऱ्यांना प्राथरविधीसाठी बांधलेली जागा ज्याला तारत्खाना अथवा शौचकूप. पहारेकऱ्यांनी नेमून दिलेली जागा सोडून जावे लागू नये व गडावर स्वच्छता रहावी याकरता सर्व तटावर अशा प्रकारच्या शौचकूपांची सोय केलेली आढळते. (उदा. राजगड, सिंधुदुर्ग, रायगड, जयगड)

**दारूखाना :** किल्ल्यामधील तोफा-बंदुकांच्यासाठी लागणारी दारू, तोफगोळे वगैरे युध्दोपयोगी साहित्य साठविण्याच्या जागेला दारूखाना किंवा दारूकोठार असे म्हणत. किल्ल्यावरील मनुष्यवस्तीपासून दूर,

किल्ल्याच्या एका टोकाला दारूखाना बांधत. युध्दजन्य परिस्थितीत आवश्यकतेनुसार दारूगोळा आणून तटबंदी अथवा बुरुजालगत बंदिस्त खोलीत ठेवीत असत.

**नगारखाना :** सर्व किल्ल्यावर नगारखाने बांधले जात. किल्ल्याच्या मुख्य दरवाजा, महत्त्वाच्या मंदिरासमोर अथवा राजसभेसमोर नगारा वाजवण्यासाठी बांधलेली वेगळी इमारत असे. उदा. रायगड, जंजिरा, सिंधुदुर्ग या किल्ल्यांवर अशा प्रकारची जागा आहे.

**बालेकिल्ला :** बालेकिल्ला म्हणजे गडावरील सर्वात सुरक्षित व उंच जागा. बालेकिल्ला तटबंदीने अधिक मजबूत केलेला असतो. राज्यव्यवहार कोशामध्ये बालेकिल्ल्यास 'आदित्यका' असे म्हटले आहे. भुईकोटातील बालेकिल्ल्याला अर्क असे म्हणतात. राजगड, जिंजी व पुरंदर इत्यादी किल्ल्यामध्ये बालेकिल्ले आहेत. राजगडचा बालेकिल्ला निश्चित पहाण्यासारखा आहे. बालेकिल्ल्यामध्ये राजप्रशासन विषयक विविध इमारती असत. यामध्ये दिवाणवाडा, सदर, देवालय, घरठाणी, बाजारपेठा, दारूखाना, अंबरखाना इ. इमारती बांधलेल्या दिसतात. बालेकिल्ल्यात स्वतः राजा, राजपुत्र अथवा राजपरिवार राहत असे. क्वचित प्रसंगी एका गडावर दोन बालेकिल्ले असल्याचे दिसते. राजमाची किल्ल्याला दोन उभे सुळके आहेत, म्हणून तिथे दोन बालेकिल्ले आहेत. मात्र सर्वच किल्ल्यांवर बालेकिल्ले असतीलच असे नाही.

**अठरा कारखाने :** किल्ल्यावर नेहमी लागणाऱ्या वस्तूंसाठी बांधलेल्या इमारतींना कारखाना असे म्हणत. किल्ल्यामध्ये १८ कारखाने व १२ महाल असत. कारखाने छत्रपतींच्या कार्याशी निगडित असत. कारखाने पुढीलप्रमाणे;

| | | | |
|---|---|---|---|
| १) खजिना | २) जवाहरखाना | ३) अंबरखाना | ४) शराबतखाना |
| ५) तोफखाना | ६) दप्तरखाना | ७) जामदारखाना | ८) जिरातखाना |
| ९) मुदपाकखाना | १०) उष्टरखाना | ११) नगारखाना | १२) तालीमखाना |
| १३) पीलखाना | १४) फरासखाना | १५) आबदारखाना | १६) शिकारखाना |
| १७) दारूखाना | १८) शहतखाना | | |

**बारा महाल :**

| | | | |
|---|---|---|---|
| १) पोते | २) सौदागीर | ३) पालखी | ४) कोठी |
| ५) इमारत | ६) पागा | ७) शेरी | ८) दरुणी |
| ९) सबिना | १०) बहिली | ११) भट्टी | १२) टंकसाळ. |

### ८) किल्ल्यावरील महत्त्वाच्या इमारती :

किल्ल्यावर अधिकाऱ्यांच्या राहण्याच्या आणि कारभाऱ्यांच्या इमारती बांधलेल्या असत. इमारतींची बांधणी मजबूत व भक्कम केलेली असे. किल्ल्यावरील राजमंदिर चुन्याने बांधलेले असावे असा दंडक होता.

बाकीची घरे मातीने बांधलेली असत. किल्ल्यामध्ये दिवाणवाडा, सदर, अलंगा, घुसळखाना, राणीवसा, अधिकाऱ्यांच्या इमारती, पागा, तळघरे, सरदारांची घरठाणी इ. इमारती असत. मात्र सर्वच किल्ल्यांवर अशा प्रकारच्या इमारती असतीलच असे नाही. किल्ल्यांच्या महत्वावर किल्ल्यावरील वास्तु अवलंबून असत. उदा. रायगड, राजगड, पन्हाळा. किल्ल्यावरील अधिकारी वर्गाशिवाय इतरही अनेक लोक किल्ल्यावर राहत असत. यासंबंधी रामचंद्रपंत अमात्य म्हणतात, ''ब्राम्हण, ज्योतिषी, वैदिक, व्युत्पन्न, शस्त्रवैद्य, पंचाक्षरी, जखमा बांधणारे, लोहार, सुतार, पाथरवट, चांभार यांचाही गड पाहून एक एक, दोन दोन असाम्या करून ठेवावे.''

**स्वयं–अध्ययन प्रश्न क्र. २**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१) रघुनाथपंत हणमंते यांनी ............ ग्रंथ लिहिला आहे.

अ) आज्ञापत्र ब) अर्थशास्त्र क) शिवभारत ड) राज्यव्यवहार कोश

२) किल्ला आतून बंद करण्याच्या साधनास ........... म्हणतात.

अ) अडसर ब) अलंगा क) अडवणे ड) यापैकी नाही

३) किल्ल्याच्या तटबंदीच्या वरून सोडलेल्या छोट्या छिद्रांना .......... काय म्हणतात.

अ) जंग्या ब) अलंगा क) चर्या ड) लादणी

४) राजगडावर किती माच्या आहेत.

अ) २ ब) ३ क) ४ ड) ५

५) राज्यव्यवहार कोशामध्ये बालेकिल्ल्यास असे म्हटले जाते.

अ) आदित्यका ब) उपत्यका क) अलंगा ड) चर्या

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) धान्याच्या कोठारास काय म्हणत असत.

२) किल्ल्यांच्या काही तटांची बांधणी कोणत्या पद्धतीची असे.

३) राज्यव्यवहार कोशामध्ये माचीला काय म्हटले आहे.

४) झुंझार माची कोणत्या किल्ल्यावर आहे.

५) किल्ल्याच्या दरवाज्याजवळ पहारेकऱ्यांसाठी केलेल्या चौथऱ्यावजा जागेस काय म्हणत.

### २.२.३ मराठाकालीन किल्ले प्रशासन

प्राचीन काळापासून भारतात किल्ले पाहावयास मिळतात. किल्ल्यांचे अनेक प्रकार तत्कालीन लष्करी व्यवस्था, भौगोलिक परिस्थिती व प्रशासकीय गरज यावर अवलंबून असल्याचे दिसून येते. प्राचीनकाळ ते शिवकाळापर्यंत किल्ल्यांच्या प्रकारात बदल झालेले दिसतात. शिवकाळात प्रामुख्याने किल्ल्यांचे प्रमुख तीन प्रकार पाहावयास मिळतात. गिरीदुर्ग (डोंगरी किल्ला), स्थलदुर्ग (भुईकोट), जंजिरा (जलदुर्ग) इत्यादी. शिवकाळात किल्ल्यांची संख्या नेमकी किती होती याबाबत विविध संदर्भ आणि मतमतांतरे आहेत. कारण स्वराज्यात नवीन प्रदेश जिंकून घेणे अथवा स्वराज्यातील काही भाग शत्रूच्या ताब्यात जाणे आणि येणे हे सातत्याने सुरू होते. कृष्णाजी अनंत सभासद यांनी आपल्या सभासद बखरीमध्ये २४०, मल्हार रामराव चिटणीस यांनी आपल्या चिटणीस बखरीत ३१७, तर चित्रगुप्त बखरीमध्ये डोंगरी किल्ले २४०, जमिनीवरचे किल्ले १०८, समुद्रातील किल्ले १३ असे एकूण ३६१ किल्ले स्वराज्यात होते असे नमूद केलेले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्यांसाठी स्वतंत्र प्रशासन व्यवस्था निर्माण केलेली होती. किल्यांचे प्रशासन अभेद्य असावे यासाठीही महाराजांनी विशेष दक्षता घेतलेली दिसते. किल्ला स्वसंरक्षणाचे जसे मुख्य केंद्र होते तसेच ते स्वराज्यातील प्रदेशाचे प्रशासकीय व्यवहार आणि व्यापाराचे मुख्य केंद्र होते. शिवकालीन किल्ले प्रशासनाच्या संदर्भात मराठाकालीन विविध बखरीत माहिती व वर्णन आढळते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यव्यवस्थेत प्रत्यक्ष प्रशासनात कार्यरत राहिलेले रामचंद्रपंत अमात्य बावडेकर आपल्या आज्ञापत्रात किल्ल्यांच्या प्रशासन व व्यवस्थापनासंदर्भात लिहितात की, ''गडकोट संरक्षणाचे कार्य फार नाजूक. परम नाजूक स्थळास एखादा मामलेदारादि जे लोक् ठेवणे, त्यांनी भेद केलियामुळे अथवा शत्रू चालोन आला असता नामर्दी केल्यामुळे अथवा त्यांचे गाफिलीमुळे स्थळास दगा जाहला तर स्थळसहित तितके राष्ट्र हातीचे गेलेच. उरल्या स्थळास व राष्ट्रास उपसर्ग लागला. शत्रू प्रबळ येऊन पावला असता जो गेला किल्ला त्या किल्लेकरांचे वारे इतर राहिले. किल्लेकरांस लागोन तेही स्थळास अपाय योजितात. म्हणजे एक एक राज्यासच धक्का बसतो. या कारणे किल्ले कोट जतन करणे ही गोष्ट सामान्य आहे असे न समजता, तेथील उस्तवारी व शासन यांस तिळतूल्य अंतर पडो न द्यावे. त्यास आधी किल्ल्याचा जीव तो किल्ल्याचा हवालदार, तसाच सदर सरनौबत म्हणजे निःस्पृह कोणाचे निसपतीचे अथवा एकाचे आर्जवामुळे ठेवावे असे नाही... कबीलेदार, विश्वासू, उद्योगी, अलालुची, अनिद्रित सकल लोकांचे समाधान रक्षून यथोचित सर्वांपासून स्वामिकार्य घेत हे स्थळ म्हणजे धन्याने परम प्रिय ठेवी दिली. आपले प्राणान्त यास दगा होऊ नये, असे पूर्ण चित्तांत आणून जे धन्यांनी लावून दिली मर्यादा तीस तिळांश अंतर पडो न देता, दिवसाचा उद्योग दिवसा, रात्रीचा उद्योग रात्री, निरलस्यपणे करून सर्व प्रयत्ने स्थळ जतन करीत असे ठेवावे, तसेच सबनीस व कारखानीस हे कारकून धन्यानी लावून दिले. मर्यादेचे प्रेरक सकल उचितानुचित कार्याचे सूचक असे हवालदार, सरनौबत, खावंद असे हेही खावंद यांनीही त्याच न्याये सकळास वर्तवून आपण वर्तावे लागते...तीन वर्षांनी हवालदार काढावा. चार वर्षांनी सरनौबती काढावा. पाच वर्षांनी सबनीस, कारखानीस काढावे आणि मामलेवर त्या त्या मामले योग्य आणखी तशा गुणसंपत्तीचे मामलेदार पाठवावे... किल्ल्याचा हवालदार सरनौबती करीत असता तो मृत्यू पावला असता तो तो मामला त्याचे पुत्रास अथवा भाऊबंदास

सांगावा. त्याचे पुत्र अथवा भाऊबंद असतील त्यांचे समाधान करून त्यांचे स्वरूपानरूप आणखी उद्योग सांगून चालवावे.....किल्ले खालील मुलुखातील देशमुख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी, चौगले आदि करून मिरास वतनदारी यास त्या समीपच्या किल्ल्यावर सेवा न सांगावी. त्यांचे वतनापासून दहा पाच गावे दूर किल्ले असतील तशा किल्ल्यांस ठेवावे. तेच वतन आणि समीपतेची सेवा जाहलियावरी चाकरीवर दुरुस्त न राहता क्षणाक्षणा घरास जाणार, किंबहुना समयविशेषी वतनाचे आशेने स्थळास भेद करून दगाही करणार, याकरिता किल्ल्याजवळील लोक किल्ल्यावर न ठेवावे. किल्ल्याचे मामले करीत असता चोरीमारी, लाच, कलागत, सुस्ती या काहिली इत्यादी अन्याय असलिया शिरस्त्याप्रमाणे मुदतींचाच मार्ग न पाहता तर तात्काळ मुदत न भरताही त्यास काढून आणावे, अन्याय पाहून शासन करावे. अन्याय खरा जाहला, बेमुलाहिजा त्याचा शिरच्छेद करावा आणि ते मस्तक गडोगडो फिरवावे. असे जो करील त्यास हा नतीजा म्हणोन दांडोरा पिटवावा. वाजवी न्याय करिता निरपराध झाला तर त्याचे आपणास काढून आणलेला डाग चिंतातून जाय असे बहुतारीतीने समाधान करावे, परंतु फिरोजी त्याचे मामलिया त्यास न पाठवावे... स्थळास गलिमाचा वेढा आला तरी सामान व उपराळा आहे तो गडवईतून रोज झुंजून स्थळ जतन करावे. सामान सरले, उपराळा राहिला, निदान येऊन पडिले, तरी धन्यांनी हर उपाय मामलेदारादि लोक काढून आणून वाचवावे. धन्याचा हात पावेना असे झाले तरी परिच्छिन्न मामलेदारादि लोकी वाखा होऊन मरावे. त्यांचे मुलांचे धन्यानी सर्व प्रकारे चालवावे...... पडिले तर सल्ला करून स्थळ देऊन आपला जीव वाचवावा, असे सर्वार्थी न करावे. जो मामलेदार असे करून तोंड घेऊन येईल त्याचे मुखावलोकन न करिता फिरोन सेवा न सांगता त्यास घरीच बसवावे.....कोणी मामलेदार स्थळास संकट झाले म्हणोन स्थळ गनिमास देऊन आपला जीव वाचवून तो गनिमाकडे गेला तरी तो यत्ने करून हस्तगत होई ते गोष्ट करावी. कदाचित हातास न लागे तरी उपाये मारवावा. उपाये करून गनिमाकडे गेला तो न मिळे असे झाले तरी त्याचे लेक गुलाम करावे, बायका बटकी कराव्या, त्यासही विष मारेकरी आदि करून हर प्रयत्ने तेथील तेथे मारवावा... भिडेने भीड वाढते. केली मर्यादा ते भंगतेच तेच राज्यनाशाचे कारण. याकरिता मर्यादाभंग सहसा होऊ न द्यावा. या उताऱ्यावरून शिवाजीराजांनी किल्ल्यांच्या अंतर्गत व्यवस्थेबाबत विशेष दक्षता घेतल्याचे स्पष्ट होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ल्याचे व्यवस्थापन व जबाबदारी कोणाही एका व्यक्तीवर अथवा जाती समुहावर पूर्णपणे कधीच सोपविली नाही. भेदनीती, पुंडाईबाबत महाराजांनी ही दक्षता घेतलेली होती. प्रत्येक किल्ल्यावर समान दर्जाचे तीन अधिकारी असत.

यामध्ये १) हवालदार २) सबनीस ३) कारखानीस यांचा समावेश होता. या तिघांच्याही नेमणुका करताना येथेही त्यांच्या वैशिष्ट्यांचा अचूक वापर केलेला दिसतो. या तीन अधिकाऱ्यांकडे पुढीलप्रमाणे कार्य सोपवलेली होती.

**१) हवालदार :**

किल्ल्याच्या संपूर्ण संरक्षणाची जबाबदारी हवालदारवर असे. किल्ल्यामधील लष्कर आणि सभोवतालच्या प्रजेवर त्याची सत्ता असे. किल्याचा एकंदरीत कारभार पाहणे, किल्ल्यांच्या चाव्या

त्याच्याकडे असत. सायंकाळी किल्ल्याचे दरवाजे व्यवस्थित बंद करणे, कुलपे लावणे व दुसऱ्या दिवशीच्या सकाळपर्यंत कोणत्याही परिस्थितीत ती न उघडणे ही त्याची खास जबाबदारी. पराक्रमी, निस्वार्थी, विश्वासू व्यक्तीची नियुक्ती या पदावर केली जात होती. हवालदार हा शक्यतो मराठा जातीचा नेमला जात असे.

**२) सबनीस :**

किल्ल्यावरील सर्व मुलकी जमा खर्चाचा व्यवहार सबनीस पाहत असे. तो जातीने ब्राह्मण असे. खर्चाबाबतचे सर्व हुकूमनामे सबनिसाच्या नावाने निघत. मात्र त्यास हवालदार व कारखानिसाची मान्यता घ्यावी लागे. दैनंदिन जमाखर्च या अधिकाऱ्यांच्या संमतीने ठरविला जाई. प्रत्यक्ष रोख पैसा सबनिसाच्या ताब्यात असे. त्यावर हवालदाराचे शिक्का (सील) असे. किल्ल्यावरील सैन्य हवालदाराच्या ताब्यात असे. त्याचे हजेरीपत्रक सबनिसाच्या ताब्यात असे तर कारखानीस त्याची तपासणी करीत असे.

**३) कारखानीस :**

किल्ल्याच्या प्रत्येक व्यवहारात कारखानीस सहभागी असे. तो प्रभू जातीचा असे. किल्यावरील कारखान्यांचे नियंत्रण कारखानीसाच्याकडे असे. दारुगोळ्याची व्यवस्था करणे, धान्यपुरवठा, दारूगोळा, डागडुजी, शस्त्रास्त्रे यांची साठेनिर्मिती, किल्याची दुरुस्ती व इमारतींची देखरेख ठेवणे, सबनीस जो पत्रव्यवहार करत असे त्यावर हवालदार व कारखानीस आपले संमतीदर्शक शिक्के उठवत असत. पत्रव्यवहारांची नोंद कारखानीसाच्या दप्तरी होत असे व नंतरच हे पत्र किल्याबाहेर पाठवले जाई.

छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ल्याचे प्रशासन तयार करत असताना किल्यावरील अधिकाऱ्याच्या नियुक्त्या विविध जातीतील व्यक्तींच्या केलेल्या होत्या. परिणामी किल्ल्यावर दगाफटका होण्याची अथवा बंडाळी होण्याची फारशी भीती उरत नसे. तिघेही अधिकारी एकमेकावर अप्रत्यक्षरीत्या नियंत्रण ठेवत असत. याशिवाय किल्याच्या तटबंदीच्या संरक्षणासाठी तटसरनौबत नावाचा अधिकारी नियुक्त केलेला असे. किल्याच्या वाटेवरती भिल्ल, रामोशी, पटवारी, बेरड इत्यादी जमातींच्या चौक्या असत. या जमाती अत्यंत काळजीपूर्वक किल्याच्या संरक्षणाचे काम करत.

**४) किल्ल्यावरील शिबंदी :**

शिवकाळामध्ये किल्यावरील शिबंदीचा म्हणजेच सैनिकांचा प्रमुख हा हवालदार असे. साधारणत: प्रत्येक किल्यावर सैनिक रचना पुढीलप्रमाणे असे,

१० सैनिक = १ नाईक

१० नाईक = १ जमादार

सर्व जमादार = १ हवालदार

### ५) अधिकाऱ्यांचे वेतन :

छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रशासकीय यंत्रणा तयार करत असताना अधिकारी अथवा सेवकांना रोख स्वरुपात वेतन देण्याचा प्रघात सुरू केला. किल्ले प्रशासनामध्ये हवालदारास प्रतीवर्षी १२५ होन, कारखानीस व सबनीस यांनाही हवालदाराला जेवढे वेतन मिळत होते तेवढेच वेतन दिले जात असे. तटसरनौबतास १०० होन इतके वेतन दिले जाई. अधिकारी, नोकर-चाकर, सैन्य यांना पुरेसे वेतन आणि तेही वेळेत होईल याकडे महाराजांचा कटाक्ष असे. .

### ६) किल्ल्यांसाठी स्वतंत्र निधीची तरतूद :

छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ल्यांच्या संदर्भात स्वतंत्र निधीची व्यवस्था केलेली दिसते. यामध्ये जुने किल्ले दुरुस्त करणे, नवीन किल्ल्यांची बांधणी, किल्ल्यावरची रसद, बांधकामे इतर कार्यासाठी स्वतंत्रपणे निधीची तरतूद केलेली दिसते. उदा. सन १६७१ मध्ये १,७५,००० होन किल्याच्या बांधणीसाठी व १,२५,००० होन किल्यावरील रसदीसाठी म्हणजेच अन्नधान्य, दारूगोळा इत्यादीसाठी बाजूला ठेवले होते. या निधीचा विनियोग त्याच कारणासाठी होत असे. राज्याच्या संरक्षण व्यवस्थेत महाराजांनी किल्याला दिलेले महत्त्व यातून प्रतिपादित होते.

### ड) किल्ल्यासंबंधी इतर नियम :

१) छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील प्रत्येक किल्ला स्वतःच्या नियंत्रणाखाली ठेवलेला होता.

२) प्रत्येक किल्ल्यावर सरकारी अधिकारी व सरकारी सैन्य ठेवून ते कार्यक्षम राहील याची दक्षता घेतलेली होती.

३) किल्ल्यांच्या संरक्षणाची प्रमुख जबाबदारी हवालदाराकडे असली तरी ती किल्ल्यावरील तिघा अधिकाऱ्यांची संयुक्तपणे समजली जात होती.

४) किल्ल्यावर फंदफितुरी होऊ नये म्हणून किल्ल्यावर राहणाऱ्या प्रत्येकाच्या प्रामाणिकपणाबाबत, स्वामिनिष्ठेबाबत खात्री झाल्यावरच त्याची किल्ल्यावर नेमणूक होत असे.

५) किल्ल्यावर प्रत्येक अधिकाऱ्यांस आपल्या बायकामुलांसह किल्ल्यावर राहण्याची सक्ती असल्याने ते किल्ल्याच्या संरक्षणाच्याबाबत अधिक दक्ष होते.

६) किल्ल्यावरील कोणतेही अधिकारी वंशपरंपरागत नव्हते. अकार्यक्षम व्यक्तीस अथवा अधिकाऱ्यास केव्हाही काढले जात असे.

७) स्वराज्याच्या सोईनुसार वारंवार अधिकार्यांच्या बदल्या केल्या जात असत.

८) किल्ल्यावर गरजेचे साहित्य, धान्य, पाणी, औषधे इ. चा नियमित पुरवठा होईल याची दक्षता घेतली जात असे.

९) किल्ल्यावरील अधिकाऱ्यांना वरील सर्व नियमांची अत्यंत काटेकोरपणे अंमलबजावणी करावी लागे. महाराज स्वत: अचानक किल्ल्यास भेटी देऊन सर्व नियमांची तपासणी करीत असत. या तपासणीच्या कामावर आण्णाजी दत्तो यांची खास नेमणूक केलेली होती.

**स्वयं-अध्ययन प्रश्न क्र. ३**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१) शिवकाळात प्रामुख्याने किल्ल्यांचे प्रमुख ........... प्रकार पाहावयास मिळतात.

अ) दोन ब) तीन क) चार ड) पाच

२) सभासद बखरीमध्ये किल्ल्यांचे ........... प्रकार दिलेले आहे.

अ) २४० ब) २४१ क) २४२ ड) २४३

३) गडकोट संरक्षणाचे कार्य फार नाजूक असे ........... ग्रंथात म्हटले आहे.

अ) आज्ञापत्र ब) अर्थशास्त्र क) शिवभारत ड) यापैकी नाही

४) छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ल्यावर समान दर्जाचे ........ अधिकारी नेमलेले होते.

अ) २ ब) ३ क) ४ ड) ५

५) किल्ल्याच्या संपूर्ण संरक्षणाची जबाबदारी ..........या अधिकाऱ्यावर असे.

अ) हवालदार ब) सबनीस क) कारखानीस ड) किल्लेदार

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) चिटणीस बखर कोणी लिहिली आहे.

२) किल्ल्याचे ३६१ प्रकार कोणत्या बखरीत दिलेले आहेत.

३) किल्ल्यावरील सर्व मुलकी जमाखर्चाचा व्यवहार कोण पाहत असे.

४) किल्ले प्रशासनातील कारखानीसाचे मुख्य काम कोणते होते.

५) किल्ले प्रशासनामध्ये हवालदारास प्रतीवर्षी किती वेतन होते.

## २.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

- **जकीरा :** संग्रह गडावर वेळोवेळी लागणाऱ्या विविध वस्तूंचा केलेला संग्रह म्हणजे जकीरा.
- **अरक किल्ला :** भुईकोट किल्ल्यातील बालेकिल्ला.
- **ओटा :** चौथरा दगड किंवा विटांनी बांधलेला भाग. त्या जोत्यावर घरे, मंदिरे बांधली जात असत.

- **कडेलोट :** स्वराज्याशी बेईमानी करणाऱ्या अथवा गंभीर गुन्हे करणाऱ्या अपराध्याला डोंगरी किल्ल्याच्या उंच व सरळ तुटलेल्या कड्याच्या टोकावरून खाली ढकलून दिले जाई.
- **खलबतखाना :** गुप्त गोष्टी बोलण्यासाठी अथवा एखादी योजना जवळच्या अथवा संबंधित मंडळींना समजावून सांगण्याची जागा.
- **सदर :** किल्ल्यावर भेटीसाठी येण्याची जागा.
- **घेरा :** एखाद्या दुर्गाच्या प्रत्यक्ष सत्तेखाली येणारा आणि त्या दुर्गाच्या परिघात असणारा चहूबाजूचा प्रदेश म्हणजे त्या दुर्गाचा घेरा.
- **चर्या :** तटबंदीच्या माथ्यावर बांधलेल्या भक्कम बांधकामाला चर्या किंवा कंगोरा असे म्हणतात.
- **फांजी :** तटबंदीच्या माथ्यावर केलेल्या संरक्षणात्मक बांधकामाला फांजी असे म्हणतात.
- **जिभी :** दरवाज्या बाहेरून दुर्गाच्या आत काय चालले आहे ते दिसू नये म्हणून दरवाजासमोर काही अंतरावर आडवी बांधलेली संरक्षणात्मक भिंत म्हणजे जिभी.
- **अंबरखाना :** अंबरखाना म्हणजे धान्याचे कोठार.
- **जंग्या :** तटावरील छिद्रांनाच जंग्या म्हणतात.
- **झरोके :** किल्ल्याच्या तटाला बंदुकीचा मारा करण्यासाठी छिद्रे/झरोके ठेवलेले असतात.
- **थट्टी (पागा) :** थट्टी म्हणजे गडावरील घोडे बांधायची पागा.
- **देवड्या :** बुरुजांवरील किंवा दरवाज्यांच्या दोन्ही बाजूंस असलेली पहारेकऱ्याची जागा.
- **पीलखाना :** पीलखाना म्हणजे हत्ती ठेवायची जागा.

## २.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयं-अध्ययन प्रश्न क्र. १ ची उत्तरे

अ) १) अ) यादव २) ब) अर्थशास्त्र ३) अ) आज्ञापत्र क) शिवभारत क) प्रचंडगड

ब) १) रामचंद्रपंत अमात्य २) जेम्स डग्लस ३) पन्हाळा ४) शिवनेरी ५) गंगासागर

स्वयं-अध्ययन प्रश्न क्र. २ ची उत्तरे

अ) १) ड) राज्यव्यवहार कोश २) अ) अडसर ३) अ) जंग्या ४) ब) ३) ५) अ) आदित्यका

ब) १) अंबरखाना २) चिलखती ३) उपत्यका ४) प्रचंदगड ५) देवडी

स्वयं-अध्ययन प्रश्न क्र. ३ ची उत्तरे

अ) १) ब) तीन २) अ) २४० ३) अ) आज्ञापत्र ४) ब) ३ ५) अ) हवालदार

ब) १) मल्हार रामराव चिटणीस २) चित्रगुप्त बखर ३) सबनीस ४) प्रभू ५) १२५ होन

## २.५ सारांश

प्राचीन भारतीय राजनीती शास्त्रज्ञांना दुर्गाचे महत्त्व इतके वाटत होते की, सप्तांगात्मक राज्य संस्थेचे एक अत्यंत महत्त्वाचे अंग म्हणून सेनेच्या बरोबरीने त्यांनी दुर्गाचा निर्देश केलेला आहे. राज्याच्या बलस्थानात दुर्गाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे, यासंबंधी शुक्राचार्यांनी म्हटले आहे की, ''दुर्गाच्या आश्रयाने एक सशस्त्र मनुष्य शंभर योद्ध्यांशी लढू शकतो व शंभर योद्धे दहा सहस्त्रांशी लढू शकतात. यास्तव राजाने दुर्गाचा आश्रय करावा'' गिरीदुर्ग, महीदुर्ग, जलदुर्ग आणि वनदुर्ग या किल्ल्यांच्या संकल्पना प्राचीन काळापासून अस्तित्वात आहेत. दुर्गांची महती लक्षात घेवूनच शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे भौगोलिक क्षेत्र ज्या ठिकाणचे निवडले त्यावरून त्यांची दूरदृष्टी दिसून येते. सह्याद्रीच्या डोंगराळ प्रदेशांचे वैशिष्ट्ये पाहून दुर्गाचे दुर्गमत्व अधिकच साध्य करणारे नवीन किल्ले स्वराज्याचे आधारस्तंभ केले. ''थोरले महाराज यांनी हे राज्य गडावरून निर्माण केले'' व 'गड होते म्हणून राज्य मात्र अवशिष्ठ राहिले'. ही दोन विधाने स्वराज्यांच्या निर्मितीचे गमक प्रस्तुत करतात. शिवाजी महाराजांनी एकानंतर एक गड घेऊन स्वराज्याची उभारणी केली. किल्ल्याच्या निर्मितीपासून ते प्रशासनापर्यंत अत्यंत बारीक-सारीक गोष्टीची नोंद आपणास आज्ञापत्रात पहावयास मिळते. ''संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग. दुर्ग नसता मोकळा देश परचक्र येताच निराश्रय, प्रजा भान होऊन देश उध्वस होतो. देश उध्वस झाल्यावरी राज्य असे कोणास म्हणावे ? याकरिता पूर्वी जे-जे राजे झाले त्यांनी आधी देशामध्ये दुर्ग बांधून तो देश शाश्वत करून घेतला आणि आले परचक्र संकट दुर्गाश्रयी परिहार केले. हे राज्य तर तीर्थरूप थोरले कैसालवासी स्वामींनी (शिवाजी महाराज) गडावरून निर्माण केले. जो-जो देश स्वशासनवश न होय त्या-त्या देशी स्थल विशेष पाहून गड बांधिले .... ज्यापेक्षा राज्य संरक्षण करणे आहे त्यापेक्षा अधिकोत्तर साधनी स्वतः गड किल्ल्याची उपेक्षा न करता परम सावधपणे असतील त्या गड किल्ल्याची यशोक्त मजबुती करावी गडकोटाचा आश्रय नसता फौजे ज्याने परमुलखी टिकाव धरून राहावत नाही. फौजे विरहित परमुलखी प्रदेश होणेच नाही. इतक्याचे कारण ते गडकोट विरहित जे राज्य त्या राज्याची स्थिती म्हणजे अभ्रपटल न्याय आहे. याकरिता ज्यास राज्य पाहिजे त्यांजी गडकोट हेच राज्य, गडकोट म्हणजे राज्याचे मुळ, गडकोट म्हणजे खजीना, गडकोट म्हणजे सैन्याचे बळ, गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी, गडकोट म्हणजे आपली वसतिस्थळे, गडकोट म्हणजे सुखनिद्रागार, किंबहुना गडकोट म्हणजे आपले प्राण संरक्षण असे चित्तास आणून कोणाचे भरवशावर न राहता त्याचे संरक्षण करणे व नूतन बांधण्याचा हव्यास स्वत:च करावा कोणाचा विश्वासू मानू नये.'

वरील विधानावरून छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ल्याचे महत्त्व किती अचूक ओळखलेले होते व किल्ल्यासंबंधी त्यांची धारणा व धोरण काय होते हे स्पष्ट होते. यासंबंधी डॉ. बाळकृष्ण आपल्या ग्रंथात म्हणतात, ''शिवाजींचे वास्तव्य डोंगरी मुलखातच होते. असे डग्लस याने यथार्थ म्हटले आहे. त्यांचे सर्व सामर्थ्य डोंगरी प्रदेशाच्या भरवशावरच होते. तो खराखुरा दुर्गस्वामी होता. त्याचा जन्म दुर्गात झाला. त्याला जे वैभव प्राप्त झाले तेही सर्व दुर्गाच्यामुळे झाले व त्याच्या दुर्गाना जे सामर्थ्य प्राप्त झाले तेही त्याच्याच

प्रयत्नाने झाले. त्याचे दुर्ग म्हणजे भारतातील त्याच्या शत्रूंना धाक होता. त्याच्या राष्ट्राची ती संवर्धन भूमी होती. त्याच्या विजयाचा तो पाया होता. त्याच्या वाढत्या महत्त्वकांक्षेचा तो जिना होता. दुर्ग हेच त्यांचे निवास्थान व तेथे त्याच्या आनंदाचे निधान होते. कित्येक दुर्ग त्याने स्वतः बांधले व जे आधी बांधलेले होते त्या सर्वांना त्याने बळकटी आणली.''

गडकोटाच्या मालिकेने स्वराज्याला स्थैर्य लाभले. तसेच आपत्काळी आत्मरक्षणाचे साधनही गडकोटांनी उपलब्ध करून दिले. किल्लेनिर्मिती संबंधी शिवाजी महाराजांची दृष्टी विलक्षण, निष्णात शिल्पज्ञाची व स्थापत्य क्षेत्रातील सूक्ष्म अवलोकनाची होती. यासंबंधी समकालीन युरोपीयन म्हणतात की, ''सेनापतीचे कार्य व सैनिकाचे कार्य या विषयाचा शिवाजीने सूक्ष्म अभ्यास केलेला असून दुर्गाची पुनर्रचना करण्याची कला उत्कृष्ठ स्थापत्य विशारदापेक्षाही त्याला अधिक अवगत होती.''

शिवाजी महाराजांनी किल्ल्याच्या बांधकामासाठी मोठ्या प्रमाणात खर्च केला. हे किल्ले बांधणीचे धोरण राजकीय होते. याचे उत्तम उदाहरण आपणास शिवदिग्विजय मधील उताऱ्यावरून सहज ध्यानात येते. आपणास धर्मस्थापना करणे व राज्य संपादणे सर्वांना अन्न लावून, शत्रू प्रदेश न होय ते किल्ल्यामुळेच होते. सर्वांचा निर्वाह आणि दिल्लीद्रासारखा शत्रू उरावर आहे, तो आला तरी नवे जुने तीनशे साठ किल्ले हजरीस आहेत. एक-एक किल्ला वर्ष वर्ष लढला तरी तीनशे साठ वर्षे पाहिजेत. यावरून शिवाजी महाराजांचा दुर्ग विषयक दृष्टिकोण सुस्पष्ट दिसतो.

किल्ले प्रशासनासंदर्भात एक महत्त्वाचे धोरण त्यांनी अंगीकृत केलेले होते. ते म्हणजे प्रत्येक किल्ला प्रत्यक्ष मध्यवर्ती सत्तेच्या स्वामित्वाखाली ठेवला होता. कोणत्याही वतनदार अथवा जहागिरदारांना स्वतंत्र किल्ला अथवा साधी गढी बांधण्याचीही परवानगी नव्हती. प्रत्येक गडावर सरकारी सैन्य, प्रत्येक गडाच्या कारभाराची स्वतंत्र व्यवस्था त्यांनी कार्यान्वित केली होती. यासंबंधी आज्ञापत्र व सभासदांच्या लिखाणातून नोंद मिळते. हवालदार, सुभेदार, कारखानीस, सबनीस, तट सरनोबत इत्यादी अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या आणि कार्य वेगवेगळी होती.

मुस्लिम राजवटीतील वंशपरंपरेची वतनदारी पद्धत बंद करून किल्लेदार बलवान होणार नाही याची दक्षता घेतली. वतनदारांच्या राजनिष्ठेचे दुष्परिणाम लक्षात घेऊन गड-कोटाच्या प्रशासनात 'सवते-सुभे' तयार करून प्रत्येक किल्ल्याच्या अधिकाऱ्यास त्यांचे कार्यक्षेत्र मर्यादित करून ठेवले होते. कोणत्याही एका अधिकाऱ्याच्या हाती किल्ल्याची व्यवस्था अथवा अधिकार एकवटलेले नव्हते. त्यामुळे फंदफितुरीला लगाम बसला. त्याचबरोबर कोणत्याही एका अधिकाऱ्याची मिरासदारी उत्पन्न होऊ नये यासाठी त्यांनी अधिकाऱ्यांच्या बदल्यांची व्यवस्था केलेली होती.

'दुर्ग हे संपूर्ण राज्याचे सार' त्यामुळे किल्ल्याच्या व्यवस्थापनात शिवाजी महाराजांनी कोणावरही विश्वास न टाकता किल्ल्याची व्यवस्था हा खास राजाच्या अधिकारकक्षेत येणारा विषय केला. यासंबंधी सभासद लिहितात की, ''जे-जे गड घेतले त्या गडावर राजियाने कारभारी बंदोबस्त ऐशी पद्धत घातली की, गडावरी हवालदार एक व कारखानीस एक व सबनीस एक असे तिघेजण एका प्रतीचे, जोर कारभार करणे तो

तिघांनी एका प्रतीचा करावा. गडावरी गल्लाचे, सामानाचे अंबर करावे. त्यास कारखानीस म्हणून कारभारी केला. त्याचे विद्यमाने सर्व कारखाने यास जमाखर्च लिहावा. गड तोलदार आहे तेथे त्या गडाचा घेरा थोर, त्या जागा सात पाच तट सरनोबत ठेवावे .... लोकांत बंदुखी व इटेकरी व तिरंदाज व आड हत्यारी असे लोक मर्दाने चौकशीने आपण राजियांनी नजर गुजर करून एक-एक माणूस पाहून ठेवावे. गडावरी लोक हवालदार व सरनौबत मराठे जातिवंत ठेवावे. त्यास जामीन आपले हजुरातील लोक असतील त्यापैकी होऊन मग ठेवावे. सबनीस, ब्राह्मण हुजरातीचे ओळखीचे ठेवावे व कारखानीस प्रभू ठेवावे असे एकास एक प्रतिभेचे ठेवावे. एक हवालदाराचे हाती किल्ला नाही. हर एक फितवा फांदा यास किल्ला कोणाच्याने देववेना ये रीतीने बंदोबस्तीने गड कोटाचे मामले केले नवी पद्धत घातली वरील उताऱ्यावरून शिवाजी महाराजांचे किल्ले प्रशासनाचे धोरण व व्यवस्थापनाचे सूत्र परम उग्र होते असे दिसते, त्याला आज्ञापत्रकारही दुजोरा देतात.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

**अ) टिपा लिहा**

१) स्थळ संशोधन

२) किल्ल्यावरील जलसंचयन

३) किल्ल्याची तटबंदी

४) १८ कारखाने

५) किल्ल्याचे सर्वसाधारण नियम

**ब) सविस्तर उत्तरे लिहा**

१) शिवकाळात किल्ला कोठे व कसा बांधला जात असे याची सविस्तर माहिती द्या.

२) मराठाकालीन किल्ल्याचे स्थापत्यशास्त्राची चर्चा करा.

३) मराठाकालीन किल्ले प्रशासनाचे विश्लेषण करा.

## २.७ अधिक वाचनासाठी पुस्तके/संदर्भ ग्रंथ सूची


१) अक्कलकोट सतीश., दुर्ग, सह्याद्री दुर्गभ्रमण मंडळ, सांगली, २००९

२) घाणेकर प्र. के., अथातो दुर्गजिज्ञासा, स्नेहल प्रकाशन, पुणे, १९९९

३) बेंद्रे वा. सी., गडकोट दुर्ग आणि त्यांची वास्तु, मुंबई मराठी ग्रंथमाला, १९६५

४) तेंडुलकर महेश., शिवकालीन दुर्ग व दुर्गव्यवस्था, स्नेहल प्रकाशन, पुणे, २००९

५) सरदेसाई बी. एन., इतिहासलेखनशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर

६) कुलकर्णी श्री. रं., शिवाजी महाराजांची राजनीति आणि रणनीती.


❑❑❑

## घटक १
# महाराष्ट्रामधील किल्ले

**अनुक्रमणिका**

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ गिरिदुर्ग : रायगड

१.२.२ जलदुर्ग : सिंधुदुर्ग

१.२.३ भुईकोट : नळदुर्ग

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द

१.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

## १.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास,

- महाराष्ट्रातील डोंगरी, समुद्री व पठारावरील किल्ल्यांची विस्तृत ओळख होईल.
- राजधानी किल्ले रायगडाची ऐतिहासिक व पर्यटनाच्या दृष्टीने महत्व अभ्यासता येईल.
- जलदुर्ग सिंधुदुर्गचा पूर्वइतिहास आणि प्रमुख ठिकाणे समजून घेता येईल.
- महाराष्ट्रातील क्षेत्रफळाने मोठा भुईकोट आणि जोडकिल्ला नळदुर्गचा वृत्तांत समजून घेता येईल.
- किल्ल्याचा इतिहास, प्रमुख ठिकाणे आणि सद्यस्थिती याबाबत पर्यटनाच्या दृष्टीने ओळख करून घेता येईल.

## १.१ प्रस्ताविक :

'गडकोट हेच राज्याचे सार' असे मध्ययुगामधील राजप्रशासनाचे प्रमुख सूत्र सांगणाऱ्या आज्ञापत्रकार रामचंद्रपंत अमात्य यांनी किल्ल्याबाबत छत्रपती शिवाजी महाराजांची दूरदृष्टी स्पष्ट करताना ''गडकोट विरहीत जे राज्य त्या राज्याची स्थिती म्हणजे 'अभ्रपटलन्याय' (आकाशात ढग येणे आणि अचानक नाहीसे होणे) आहे. याकरिता ज्यास राज्य पाहिजे त्यांनी गडकोट हेच राज्य, गडकोट म्हणजे राज्याचे मूळ, गडकोट

म्हणजे खजिना, गडकोट म्हणजे सैन्याचे बळ, गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी, गडकोट म्हणजे आपले प्राण संरक्षक, ऐसे पूर्ण चितांत आणून कोणाचे भरवशावर न राहता, आहे त्याचे संरक्षण करणे व नूतन बांधणेचा हव्यास करावा, कोण्हाचा विश्वास मानु नये.'' यावरून किल्ल्याचे अनन्यसाधारण महत्व समजते.

मानवी इतिहासाच्या आरंभापासून दुर्ग महत्त्वाचे ठरतात. शुक्रनितीसार, अर्थशास्त्र ग्रंथामधून किल्ल्याचे महत्व आणि राज्य संरक्षणात त्याचे महत्त्व स्पष्ट केले आहे. महाराष्ट्रात प्राचीन सातवाहन काळापासून किल्ल्याचा अधिकृत प्रारंभ झाल्याचे मानतात. त्यानंतर राष्ट्रकुट, चालुक्य, शिलाहार काळापासून हि परंपरा पुढे चालू राहिली. देवगिरीचे यादव काळात किल्ले स्थापत्य आणि व्यवस्थापनात अनुकूल बदल झाले. परंतु यादवच्या पराभवानंतर ही परंपरा खंडित झाली. पुढे छत्रपती शिवाजी महाराजांनी हि परंपरा नव्याने सुरू करतानाच किल्ले बांधणी, प्रशासन यात कालानुरूप सुधारणा केल्या. सदर प्रकरणात शिवरायांचा पराक्रमाचा साक्षीदार किल्ले राजधानी रायगड, शिवलंका म्हणून ओळखला जाणारा समुद्रामधील किल्ले सिंधुदुर्ग आणि महाराष्ट्रामधील सर्वात आकर्षक आणि क्षेत्रफळाने मोठा जोडकिल्ला नळदुर्ग या तीन किल्ल्याची प्रातिनिधिक माहिती आहे.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ गिरिदुर्ग : रायगड

''राजा खासा जाऊन पहाता गड बहुत चखोट, चौतर्फा गडाचे कडे तासिल्याप्रमाणे, दीड गाव उंच, पर्जन्यकाळी कडियावारी गवत उगवत नाही, आणि धोंडा तासीव एकच आहे. दौलताबादही पृथ्वीवर चखोट गड खरा, परंतु तो उंचीने थोटका, दौलताबादचे दशगुणी गड उंच असे देखोन बहुत संतुष्ट जाले आणि बोलिले तक्तास जागा गड हाच करावा.''

– सभासद बखरकार 'कृष्णाजी अनंत सभासद'

मराठी माणसाच्या मनामध्ये विशेष आदराचे स्थान ज्या विशेष गिरीदुर्गास आहे तो म्हणजे शिवतीर्थ किल्ले रायगड होय. भारतीय इतिहासामधील सुवर्ण क्षण म्हणजे शिवराज्याभिषेक आणि शिवाजी महाराज यांच्या समाधीचे स्थान म्हणून रायगड विशेष ठरतो. सह्याद्रीच्या डोंगररांगामध्ये गनिमी कावा निपुण शिवरायांनी भौगोलिक परीस्थितीचा पुरेपूर विचार करून आणि राजकीयदृष्ट्या महत्वाच्या या गिरीदुर्गाची निवड केली.

**रायगडचा पूर्वइतिहास :**

रायगडच्या डोंगरास आरंभी राजगिरी, रायगिरी, रायरी, राजविरा, तणस, जम्बूद्वीप, नंदादीप, बंदेनुर, भिवेगड, राहीर, रेड्डी, शिवलंका या विविध नावाने ओळखतात. रायगडची भव्यता आणि दुर्गम स्थानामुळे ब्रिटीश या किल्ल्यास 'पूर्वेचा जिब्राल्टर' म्हणत. औरंगजेब या दुर्गास इस्लाम गड म्हणत असे. मुलत: रायरीचा डोंगर हा स्वतंत्र सुट्टा डोंगर असून या किल्ल्याच्या भोवती तुटलेल्या डोंगर कड्यामुळे तो सह्याद्रीच्या मूळ रांगेपासून विभक्त झाला असून सभोवताली साधारण दीड किलोमीटरची नैसर्गिक दरी निर्माण

झाली आहे. समुद्र सपाटीपासून २८२९ फुट उंचीवर असलेला किल्ले रायगड मैदानी आक्रमकांच्या टप्प्याच्या पलीकडे सह्याद्रीच्या आडोशास एकाकी डोंगर आहे. तसेच गडावरील असलेल्या विस्तीर्ण पठारामुळे अनेक भव्य वास्तू निर्माण करता आल्या. गडाच्या शेजारील दरीमधून काळ आणि गांधारी या नद्या उगम पावतात.

'रायरी' या मूळ पर्वताचा सातवाहन काळामध्ये प्रथम राजकीय कारणासाठी वापर सुरू झाला असावा. रायगड हा एक पुरातन किल्ला आहे. बाराव्या शतकामध्ये एका मराठे पाळेगारांचे वस्तीचे ठिकाण होते. तेच शिर्के होत. आरंभी देवगिरीचे यादव तसेच विजयनगर साम्राज्याचा हा किल्ला भाग होता. इ.स.१४३६ मध्ये अल्लाउद्दिनशहा बहामनी याने रायगड ताब्यात आणला आणि आपला सरदार दिलावरखान याची नेमणूक केली. बहामनी राज्याची ५ शकले झाल्यानंतर इ.स १४७९ ते इ.स. १६३६ पर्यंत रायगडवर अहमदनगरच्या निजामशहाची सत्ता होती. इ.स. १६३६ मध्ये मोगलशाही आणि आदिलशाही यांनी मिळून निजामशाहीचा पराभव केला त्यानंतर हा किल्ला आदिलशाहीच्या ताब्यात राहिला. स्वराज्य स्थापनेच्या आरंभी मावळचा प्रदेश पुर्णपणे जिंकून घेतल्यानंतर जावळीच्या चंद्रराव मोरे यांच्या वाढत्या उद्दामपणाचा बंदोबस्त करण्यासाठी १५ एप्रिल १६५६ रोजी शिवाजी महाराजांनी या किल्ल्यास वेढा घातला आणि १४ मे १६५६ रोजी मोरे शरण आले आणि हा किल्ला महाराजांकडे आला. आरंभी शिवाजी महाराजांनी कल्याणचा सुभेदार आबाजी सोनदेव आणि हिरोजी इंदुलकर यास आज्ञा केली, त्यानुसार जुनी बांधकामे पाडून नवीन वास्तूंची उभारणी केली. एकंदर ३०० हून ज्यादा दगडी इमारतीचे बांधकाम रायगडावर करण्यात आले. त्यामध्ये राजवाडे, कचेऱ्या, धान्य आणि दारूगोळ्याची कोठारे, शिबंदीच्या राहण्याच्या जागा, व्यापारी पेठ, पाण्याचे हौद, तलाव इत्यादीचा अंतर्भाव होतो. इ.स १६७० मध्ये महाराजांनी स्वराज्याची राजधानी राजगडावरून रायगडास स्थलांतरित केली. रायगड शिवाजी महाराजांच्या काळामधील अनेक महत्त्वाच्या घटनांचा साक्षीदार झाला. दुसऱ्या सुरत लुटीचे नियोजन रायगडावरून झाले. २४ फेब्रुवारी १६७० रोजी राजाराम महाराजांचा जन्म रायगडावर झाला. इ.स १६७२ मध्ये डच वकील अब्राहम लेफेबर रायगडावर आला होता. इ.स १६७३ दरम्यान गडावरील वास्तूंचे बांधकाम पूर्ण झाले. इ.स १६७४ मध्ये दंडराजपुरी येथे सैन्य रायगडावरून पाठवले. १८ मार्च १६७४ रोजी शिवाजी महाराजांच्या पत्नी काशीबाई यांचे निधन रायगडावरच झाले.

६ जून १६७४ रोजी देशाच्या इतिहासामधील सुवर्णक्षण म्हणजे शिवराज्याभिषेक किल्ले रायगडावर संपन्न झाला. यावेळी अधिकृत रायरीचे नाव बदलून किल्ले रायगड करण्यात आले. महाराजांची दक्षिण दिग्विजयी कर्नाटक स्वारी किल्ले रायगडावरून नियोजन आणि संयोजन झाले. महाराजांचे देहावसान किल्ले रायगडावर ३ एप्रिल १६८० रोजी झाले. त्यानंतर संभाजी महाराज छत्रपती झाले. त्यांच्या काळामध्ये मोगल-मराठा संघर्ष तीव्र झाला. इ.स १६८९ मध्ये संभाजी महाराज यांच्या हत्त्येनंतर मोगल सरदार झुल्फीकार खान यांनी रायगड हस्तगत केला. इ.स १६८९ ते १७०७ दरम्यान रायगडावर मोगलांचे वर्चस्व होते. त्यांनी रायगडची जबाबदारी सिद्धी याकूतखानकडे दिली होती. छत्रपती शाहू महाराज यांनी इ.स १७३३ मध्ये हा किल्ला जिंकून घेतला. आणि किल्ल्याचा प्रमुख म्हणून यशवंत पोतनीस यांची नेमणूक केली. हा किल्ला इ.स १८१८ पर्यंत मराठ्यांच्या ताब्यात होता. पुढे १० मे १८१८ रोजी कर्नल प्रॉथर याने तो मराठ्यांकडून ताब्यात घेतला. आणि संपूर्ण देशाप्रमाणेच रायगडावरही ब्रिटीश अंमल प्रस्थापित झाला.

**रायगडाकडे जाण्याचे प्रमुख मार्ग –**

रायगडावर जाण्यासाठी चार प्रमुख मार्ग आहेत. पहिला मार्ग महाडमार्गे रायगडला जाणे सोईचे असून महाड–रायगड हे अंतर २४ किलोमीटर आहे. बस किंवा खाजगी वाहनाने गडाच्या पायथ्यापर्यंत जाता येते. दुसरा मार्ग छत्री निजामपूरपासून २६ किलोमीटर वायव्य दिशेस दुर्गम भागामधून पायवाटेने गडावर जाता येते. तिसरा मार्ग ईशान्येकडून बिरवाडीमार्गे स्वताच्या वाहनामधून जाता येते. चौथा मार्ग ट्रेकर्ससाठी असून माणगावपासून दऱ्याखोरी ओलांडून जाता येते. गडावर जाण्यासाठी चढण असलेल्या आणि लहान–मोठ्या १४०० पायऱ्या आहेत. वयस्कर महिला, लहान मुले अथवा ज्यांना गड चढण्यास अडचणी आहेत अशा शिवभक्तांसाठी रोपवेची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यातून शारीरिक आणि वेळेची बचत झाली आहे. हा रोपवे केबल पद्धतीचा पाऊण मीटर आहे. याद्वारे १६ व्यक्ती एकावेळी गडावर जाऊ शकतात. या रोपवेची सुरवात ३ एप्रिल १९९६ रोजी झाली आहे. विद्युत पुरवठा खंडित झाल्यास जनरेटरची व्यवस्था आहे. त्यामध्येही ऐनवेळी बिघाड झाल्यास हाताने चालू करता येतो. पूर्णतः स्वदेशी बनावटीचा हा रोपवे आहे. पुण्यामधील व्ही एम जोग कंपनीमार्फत याची देखभाल केली जाते.

**किल्ल्याची रचना आणि विविध वास्तू –**

**पाचाड कोट व शिवकालीन मार्ग –** रायगडच्या पायथ्याशी 'पाचाड' गाव असून शिवकालीन मोठी बाजारपेठेचे ठिकाण म्हणून ते प्रसिद्ध होते. येथूनच गडावर आवश्यक सामानाचा पुरवठा होत असे. गडावरील विषम वातावरण, प्रचंड थंडी, जोराचा पाऊस यामुळे शिवाजी महाराजांनी राजमाता जिजाबाईसाठी एक वाडा पायथ्याशी पाचाड येथे बांधला होता. त्याचे अवशेष आजही दिसतात. राज्याभिषेकानंतर अवघ्या १२ दिवसानंतर १८ जून १६७४ रोजी मातोश्री जिजाबाईंचे निधन याच वाड्यामध्ये झाले. पाचाडला तटबंदीयुक्त कोट होता. त्याची आत्ता पडझड झाली आहे. पाचाडच्या कोटामध्ये घोडे, हत्ती बांधण्याची जागा आहे. या शेजारी दोन विहिरी आहेत. यातील एक विहिरीमध्ये खाली उतरण्याच्या मार्गावर तक्क्यासारखी रचना असलेने या विहिरीस 'तक्क्याची विहीर' असे म्हणतात तर याशेजारी दुसरी विहीर आहे. पूर्वी ही पाण्याची टाकी होती नंतर त्यास विहिरीचा आकार दिल्याचे दिसते. या दोन्ही विहिरींची पडझड झाली आहे. या दोन विहिरींच्या एका बाजूस कोटाची तटबंदी आहे त्यामध्ये विस्तृत जागी भव्य वाड्याचे अवशेष आहेत.या वाड्याचे जोते खूप मोठे आहेत. ही सर्व जोती रखवालदार चौकी, कोटप्रमुखाचा वाडा, सबनीस वाडा, शस्त्रागार इत्यादी बांधकामे आहेत. कोटापासून जवळच मातोश्री जिजाबाईंचे स्मारक आहे. त्यामध्ये त्यांचा अर्ध पुतळा असून त्यासमोर तुळशी वृंदावन आहे. येथून शिवकालीन रायगडावर जाण्याचा मार्ग आहे.

इ.स १६९१ मध्ये मुघल बखरकार खाफीखान या कोटामध्ये काही काळ राहिला होता असे मानले जाते. इ.स १७७३ मध्ये नारायणराव पेशव्यांनी रायगड ताब्यात घेतल्यानंतर पेशव्यांचे सरदार अप्पाजी हरी या सरदाराने कोट पाडून टाकला.

**प्रारंभिक बुरुज : 'खुबलढा' –** जिजाबाईंच्या वाड्याकडून किल्ल्याकडे येवू लागल्यानंतर वायव्येस पहिल्यांदा खुबलढा बुरुज लागतो. या बुरुजाची उंची ८.२५ मीटर असून त्याचा परीघ १५.२५ मीटर आहे.

खुबलढा बुरुजासंबधी पेशवे दप्तरामध्ये अनेक नोंदी आहेत. या बुरुजास लागुनच 'चित दरवाजा' नावाचे एक प्रवेशद्वार होते. आज हा दरवाजा अस्तित्वात नाही परंतु त्याची जागा चिते दरवाजा म्हणून ओळखतात.

**वैशिष्ट्यपूर्ण प्रवेशद्वार : नाना दरवाजा –** खुबलढा बुरुजापासून पुढे एक किलोमीटर अंतरावर नाना दरवाजा लागतो. इ.स १६७४ मध्ये इंग्रज वकील हेन्री ऑक्झिडरने रायगडास दोन दरवाजे असल्याचा उल्लेख केला आहे. त्याने आपल्या डायरीमध्ये या दरवाजाचा उल्लेख नहाना (लहान) असा केला आहे. त्याचाच अपभ्रंश होऊन 'नाना दरवाजा' असा झाला. या दरवाजाची उंची १८ फुट होती. या दरवाजाकडे जाण्यास सतरा पायऱ्या आहेत. दरवाजाच्या दोन्ही बाजूस खंदकामध्ये पहारेकऱ्यांसाठी खोदलेल्या खोल्या आहेत. पुढे इ.स १७९६ मध्ये नाना फडणवीस यांनी रायगड किल्ल्याची डागडुजी केली तेव्हापासून या दरवाजास नाना दरवाजा म्हणतात.

**पहारेकऱ्यांची खोली परिसर :** मसाजिद मोर्चा नाना दरवाजामधून पुढे चढण चालून गेल्यानंतर पहारेकऱ्यांची खोली लागते. त्या शेजारी ७० फुट लांब आणि २० फुट रुंद धान्याचे कोठार लागते. या कोठारावर तोफेचा मोर्चा होता. या मोर्चा शेजारी शिवाजी महाराजांनी मशीद बांधली होती. आज मशिदीचे अवशेष नाहीत मात्र मदारशहाशी कबर आहे. तेथून जवळच चारशे मीटरवर खडकामध्ये तीन गुहा आहेत. त्यांचा उपयोग शिवकाळामध्ये धान्य साठवण्यासाठी होत असे.

**रायगडाचे मुख्यद्वार : महादरवाजा –** धान्य कोठारापासून पुढे साधारण १ किलोमीटरवर महादरवाजा आहे. त्याची उंची धान्य कोठारापासून साधारण ३०० फुट आहे. कठीण चढण चढून गेल्यानंतर ३२ पायऱ्या लागतात. त्यानंतर महादरवाजा लागतो. हा महादरवाजा अनुक्रमे ६० आणि ७० फुट उंचीच्या बुरुजामध्ये आहे. दोन्ही बुरुजावर तोफा आणि गोळीबारासाठी छिद्रे आहेत. दरवाजाची कमान इस्लामी स्थापत्याची असून कमानीच्या दोन्ही बाजूस शरभ शिल्पे आहेत. या शरभांच्या गळ्यात साखळदंड असून शरभाणे पायामध्ये हत्ती पकडलेला आहे. शरभ हे सामर्थ्याचे प्रतिक मानले जाते. रायगडावर तसेच अनेक किल्ल्यांच्या दरवाजांवर शरभ शिल्प आहे. या शिल्पावर विजयनगर आणि यादवांच्या वास्तूकलेचा प्रभाव दिसतो. खालून येणाऱ्या शत्रूस महादरवाजा एकदम दिसत नसलेने महादरवाजावर समोरून शत्रूस मारा करता येत नाही तसेच महादरवाजा जवळील पायऱ्या उंचीस जास्त आहेत. महादरवाजाच्या दक्षिणेस चोर दरवाजा आहे. शिवकाळामध्ये गडावर पोहोण्यास रायगडवाडीतून नाणे दरवाजापर्यंत जात होता आणि तेथून पुढे महादरवाजापर्यंत पोहोचता येत होते. महादरवाजाच्या मागील चढावर खडकात कोरलेली पाण्याची दोन टाकी आहेत. दरवाजाजवळील पहारेकऱ्यांची पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी म्हणून ही टाकी खोदण्यात आली आहे. महादरवाज्याजवळ आल्यावर गडावर पोहोचल्यासारखे वाटते पण महादरवाजा ते माथा हे अंतर तेथून पुढे साधारण पायी पाऊन तासाचे आहे.

**मदारशहाची कबर व त्याबाबतची मतमतांतरे –** महादरवाजा ओलांडून पुढे जाताना छोटे पठार लागते तेथे मदारशहाची कबर लागते. छत्रपती शिवाजी महाराज यांचा सेवक मदारी मेहतर याची ही कबर मानतात. महाराजांच्या आग्रा भेटीवेळी हा सेवक त्यांच्यासोबत होता. तथापी धुळ्याच्या राजवाडे इतिहास संशोधन

मंडळामध्ये 'रायगड किल्ल्याची हकीकत' नावाचे हस्तलिखित आहे. त्यामध्ये स्पष्ट उल्लेख आहे कि, निजामशाही कालखंडामध्ये 'पीर मदार' याचा दर्गा येथे बांधला गेला. या मदारशहाच्या कबरी जवळच सात फुट उंच लोखंडी स्तंभ असून त्याला एक लोखंडी कडी आहे. या लोहस्तंभावर चार ओळींचा अस्पष्ट लेख आहे त्यावरील अक्षरे गंज लागलेने दिसत नाहीत. या स्तंभाच्या दुसऱ्या ओळीवरील 'हीरो उनी' या अक्षरावरून हा स्तंभ हिरोजी इंदुलकर यांनी उभारला असावा.

**किल्ल्यावरील मुख्य पाण्याचे स्त्रोत : हत्ती व गंगासागर तलाव –** मदारशहाची कबरीपासून उजवीकडे अंडाकृती आकाराचा १२० फुट लांब आणि ३० फुट रुंद असा तलाव खडकामध्ये कोरलेला आहे. गडावर असलेल्या हत्तींच्या स्नानासाठी हा तलाव खोदला असावा. तसेच काही अभ्यासकांच्या मते तलावाचे नाव हत्ती तलाव नसून 'हती तलाव' आहे. 'हत' म्हणजे मृत त्यावरून ज्या तलावात पाणी टिकत नाही त्याला मृत तलाव असे म्हणतात. या हती तलावाजवळ रायगड जिल्हापरिषदेने बांधलेली धर्मशाळा आहे. पूर्वी हा तलाव उन्हाळ्याच्या दिवसामध्ये कोरडा पडत असे. परंतु रायगड संवर्धन प्राधिकरणाच्या प्रयत्नांमधून या तलावामधील गाळ काढण्यात आला तसेच तलावाची गळती काढण्यात आली त्यामुळे या तलावामध्ये बारमाही कायम पाणी असते.

हत्ती तलाव ओलांडून पुढे ३०० फुटावर सुप्रसिद्ध गंगासागर तलाव आहे. हा जवळपास ३५० फुट लांब आणि २७० फुट रुंद असून खडकामध्ये कोरलेला आहे. तलावाची पश्चिमेकडील बाजू चिरेबंदी दगडांनी बांधली आहे. गडावरील पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्त्रोत म्हणून गंगासागर तलाव आहे. राज्याभिषेकावेळी तत्कालीन संपूर्ण हिंदुस्थान मधून विविध नद्यांचे पाणी महाराजांवर अभिषेकासाठी एकत्रित केले होते त्यामधील उर्वरित पाणी या तलावामध्ये सोडले म्हणून या तलावास गंगासागर तलाव म्हणतात. आजही या तलावामध्ये मुबलक पाणी असते. या तलावाद्वारे हिरोजी इंदुलकर यांनी तीन मुख्य गोष्टी साध्य केल्या. पहिली प्रमुख म्हणजे बारमाही पाण्याची सोय, दुसरी या तलावामधील दगड बांधकामासाठी वापरता आले. तिसरा फायदा तलावामुळे बालेकिल्ल्यास खंदकासारखे सरंक्षण प्राप्त झाले. इ.स १६८९ मध्ये झुल्फिकारखान याने महाराजांचे सिंहासन या तलावामध्ये टाकले अशी दंतकथा प्रचलित होती. भारत स्वातंत्र्यानंतर इ.स १९५२ आणि इ.स १९८७ मध्ये भारतीय पुरातत्व खात्याने तलावाच्या तळाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. पन्नास हजार घनफूट गाळ उपसल्यानंतर तलावामध्ये काही वस्तू सापडल्या त्यामध्ये एक होडी, लोखंडी तवा, दोन तोफगोळे, वीस शिवराई नाणी, दोन मोगलकालीन नाणी, इस्ट इंडिया कंपनीचे नाणे, तीन पितळी कुंकवाचे करंडे, खंडोबाची मूर्ती अशा वस्तू सापडल्या. परंतु सिंहासनाचे कोणतेही अवशेष प्राप्त झाले नाहीत.

**वैशिष्ट्यपूर्ण मनोऱ्याची रचना –** गंगासागर तलावापासून दक्षिणेस दोन भव्य मनोरे असून सध्या ते भग्नावस्थेत आहेत. पूर्वी हे मनोरे पाच मजली असावेत असे मानतात. सध्या त्यामधील दोन मजले अस्तित्वात आहेत. या मनोऱ्याचा पाया द्वादशकोन पायावर आहे. या मनोऱ्यात तांब्याच्या नळ्या बसविण्यात आल्या आहेत. आतील प्रत्येक बाजूस कोनाडे असून पणत्या ठेवण्यास त्याचा उपयोग करत. या स्तंभाच्या

मध्यभागी कारंजाचे अवशेष दिसतात. या शेजारून बालेकिल्लात प्रवेश करण्याचा मार्ग आहे. शिवकाळामध्ये टेहळणी करण्यासाठी अथवा सुर्यदर्शनासाठी या मनोऱ्यांचा वापर केला जात असे.

**बालेकिल्ल्याची प्रवेशद्वारे : पालखी व मेणा दरवाजा –** मनोऱ्यांकडून पश्चिमेस बालेकिल्लाकडे जाता येते. बालेकिल्लात प्रवेश करताना एक चिरेबंदी कमान असलेले प्रवेशद्वार आहे. त्यास पालखी दरवाजा म्हणतात. हा दरवाजा दहा फुट उंचीचा आहे. दरवाजाच्या बाहेर पहारेकऱ्यांच्या खोल्या आहेत. हा दरवाजा ओलांडून चारशे फुट चालून गेल्यानंतर दक्षिण बाजूस मेणा दरवाजा आहे. राजघराण्यातील महिला किल्ल्याबाहेर जाण्यास या दरवाजाचा वापर करत. येथून आत आल्यानंतर छोटे मैदान आहे.

**राणीवसा व राजभवनाच्या इमारती –** पालखी दरवाजामधून मेणा दरवाजाकडे जात असताना उजवीकडे सहा वाड्यांचे अवशेष आहेत. राण्यांच्या निवासासाठी त्याचा वापर होत होता म्हणून त्यास राणीवसा किंवा राण्यांचे महाल म्हणतात. ९१ कलमी, सभासद बखरीमध्ये या वास्तूंची विस्तृत वर्णने आहेत. या वास्तूत शौचकुपाची व्यवस्था आहे. या राणीवसाच्या पश्चिमेस मुदपाकखाना (स्वयंपाक गृह) आहे. पालखी दरवाजाच्या डावीकडे राजसदरेकडे जाण्याचा रस्ता आहे. हा संपूर्ण बालेकिल्ल्याचा परिसर असून येथे ९० फुट लांब आणि ३५ फुट रुंद असा चौथरा आहे. हेच महाराजांच्या निवासाची जागा आहे. या वाड्याच्या पश्चिमेस भिंतीमध्ये एक दरवाजा असून तो केवळ कचेरीसंबंधी कामकाजास वापरला जाई. सिंहासन जागेपासून भिंतीपर्यंत शिवरायांचा कौटुंबिक राहता वाडा परिसर होता. महाराजांचे महानिर्वाण या परिसरामध्ये झाले. या परिसरामध्ये सराफ कट्टा, खजिना, रत्नशाळा, स्तंब, खासबाग, कचेऱ्या, अंधारकोठडी, मेणा दरवाजा असे अनेक अवशेष आहेत. या चौथऱ्या पुढे पाण्याचे २ मोठे आणि २ लहान हौद आहेत.

**रत्नशाळा व सदरेचे अवशेष –** राजभवनच्या पूर्वेस रत्नशाळा हि वास्तू असून ही वास्तू म्हणजे तळघर आहे. ते १८ फुट लांब आणि ९ फुट रुंद आहे. या तळघरात उतरण्यास १२ पायऱ्या आहेत. येथे गडावरील मौल्यवान रत्ने, जडजवाहीर ठेवले जात. या रत्नशाळेच्या पूर्वेस एक प्रशस्त चौथरा अनेक खांबाच्या खुणा असलेला असून काही गोल तर काही चौकोनी खांबाच्या खुणा आढळतात. या खुणांवरून ही इमारत अष्टकोनी आकाराची असावी.

**राजदरबार : सिंहासन, नगारखाना व इतर वास्तू :** सिंहासन, नगारखाना व इतर वास्तू अष्टकोनी महालापुढे चालत गेल्यावर अनेक चौथऱ्याचे अवशेष आहेत. विवेकसभा, कल्याणमहाल अशा अनेक वास्तू येथे असाव्यात. या कोणत्याच इमारतीवर छत नाही परंतु विटाच्या भिंती दिसतात. सिंहासनाच्या इमारतीमध्ये मध्यभागी बारा फुट लांब आणि दहा फुट रुंद चौथरा असून हीच सिंहासनाची जागा आहे. महाराजांचे ३२ मण सुवर्णसिंहासन या ठिकाणी विराजित होते. या इमारतीच्या दोन्ही बाजूस १५ फुट रुंदीच्या दोन खोल्या आहेत. खजिन्यासाठी त्या वापरत. सिंहासनाच्या समोर कारंज्याचे अवशेष आहेत. या समोरच नगारखाना दोनशे दहा फुटावर आहे. ही नगारखाण्याची वास्तू गडावरील सुस्थितीत असलेल्या वास्तूंपैकी एक आहे. ही वास्तू भव्य चौकोनी आकाराची आहे. त्याचे प्रवेशद्वार पूर्वेस असून त्यावरील शिल्पे सारासीन पद्धतीचे आहेत. यावर शरभाची दोन शिल्पे आहेत. प्रवेशद्वाराची कमान टोकास निमुळती आहे. ही वास्तू सर्वसाधारण

पन्नास फुट उंच असून प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस चौकोनी नक्षीकाम आणि प्रत्येक बाजूस नऊ चौकोनाच्या दोन ओळी आहेत. दोन्ही बाजूस कमळाची आकर्षक शिल्पे आहेत. प्रत्यक्ष नगारखान्यावर जाण्यास २९ पायऱ्या आहेत. याचे दगडी बांधकाम शिवकालीन असून त्यावरील वीट बांधकाम पेशवे काळामधील आहे. हे गडावरील सर्वोच्च ठिकाण आहे. येथून सह्याद्रीच्या रांगा, समुद्र यांचे विहंगम दृश्य दिसते. राजगड, लिंगाणा, तोरणा, कांगेरी, प्रतापगड, तळगडाचे दर्शन होते. नगारखान्याच्या पूर्वेस उतरतीला कुशावर्त तलाव आहे. कुशावर्त तलावाच्या खाली दरीकडे वाघ दरवाजा आहे. याच वाघ दरवाजामधून छत्रपती राजाराम महाराज निसटले होते. या दरवाजा समोर 'पोटल्याचा डोंगर' दिसतो. या डोंगरावरून ब्रिटिशांनी इ.स १८१८ मध्ये रायगडावर तोफांचा मारा केला होता.

**होळीचा माळ व गडदेवता शिर्काईचे मंदिर –** नगारखाना ओलांडून डावीकडे एक मोठा खडक आहे तो ओलांडल्यानंतर होळीचा माळ लागतो. या विस्तीर्ण माळावर शिवकालखंडामध्ये होळी पेटवली जात होती तसेच होळीवेळी विविध करमणुकीचे कार्यक्रम होत असत. सध्या या माळावर सिंहासनावर बसलेली छत्रपती शिवाजी महाराजांची आकर्षक मूर्ती बसवण्यात आली आहे. या विस्तीर्ण माळाच्या डावीकडे गडदेवता शिर्काई देवीचे मंदिर आहे. अत्यंत छोटेखानी हे मंदिर असून शिर्के घराण्याचे आद्य दैवत आहे. येथे देवीची अष्टभुजा महिषासूरमर्दिनी मूर्ती आहे.

**प्रधानांची निवासस्थाने व कुशावर्त तळे –** नगारखान्याच्या बाहेर पडल्यानंतर कुशावर्त तळे लागते. तेथे किल्ल्यावरील प्रधानांची निवासस्थाने आहेत. या वास्तूंची रचना राणीवसा येथील घरांसारखी आहे. या वाड्यांची प्रवेशद्वारे भव्य असून दाराच्या चौकटीवर नक्षीकाम आहे. चौकटीवर श्री गणेश आणि विविध शुभचिन्हे कोरली आहेत. सचिवांची घरे आणि बालेकिल्ला यामध्ये तीन अंधारकोठड्या आहेत. या वाड्याशेजारी असलेल्या कुशावर्त तलावामध्ये उतरण्यास दगडी पायऱ्या असून तलावाच्या काठी महादेवाचे मंदिर आहे. मंदिरासमोर एक चौथरा आहे. या परिसरामध्ये अठरा कारखाने असावेत. कुशावर्तपासून काही अंतरावर वाघ दरवाजा लागतो. या भागामध्ये ब्राह्मणवाडी नावाचा भाग असून येथे ब्राह्मण समाजाची घरे असावीत.

**गडावरील वैशिष्ट्यपूर्ण बाजारपेठ अथवा कचेरी –** नगारखाना ओलांडून होळीचा माळावरून पुढे बाजारपेठ आहे. राजधानी रायगडास अनुकूल बाजारपेठेची रचना आहे. आजही अत्यंत भक्कम असे चौथरे असून या पेठेतून जाणारा चाळीस फुट रस्ता आहे. दोन्ही बाजूस प्रत्येकी बावीस दुकानांची रचना आहे. या दुकानांच्या जोत्यांची उंची इतकी आहे की, घोड्यावर बसूनही वस्तू खरेदी करता येईल अशी आहे. प्रत्येक दुकान चाळीस फुट लांब आणि तीस फुट रुंद अशा आकाराचे आहे. केवळ उजवीकडील अखेरचे दुकान चाळीस फुट लांब आणि पंधरा फुट रुंद आहे. या बाजारपेठेच्या मध्ये असणाऱ्या एका गाळ्याच्या भिंतीवर नागाची आकृती कोरली आहे. राज्याभिषेकावेळी महाराजांची हत्तीवरून मिरवणूक याच मार्गे जगदीश्वर मंदिराकडे गेली होती. काही अभ्यासकांच्या मते हे कचेरी अथवा नगरपेठेचे अवशेष असावेत. बाजारपेठेच्या वायव्येस पीलखाना आहे. येथे गडावरील हत्तींच्या वास्तव्याची जागा असावी. सध्या तेथे पुरातत्व खात्याचे

गडावरील कार्यालय आहे. पीलखाण्याच्या उजवीकडे काही घराचे अवशेष आहेत. तेथे कदाचित गडावरील शिबंदी राहत असावी.

**मुख्य लोकवस्तीपासून दूर : दारू कोठार –** रायगडावर मुख्य वस्तीपासून दूर अंतरावर दारूगोळ्याचे अवशेष आहेत. दारुगोळा कोठार गडाच्या उतरणीस असून कोठाराकडे जाताना अनेक इमारतींचे अवशेष दिसतात. ही कदाचित दारुगोळा विभागामधील अधिकाऱ्यांची घरे असावीत. त्याजवळ पाण्याच्या बारा टाक्या आहेत. यापैकी एक महाराजांच्या समाधीजवळ उतरणीवर आहे तर दुसरी टकमक टोकाकडे जाताना वाटेत आहे.

**गडावरील टकमक, भवानी, हिरकणी टोक –** बाजारपेठेतून उत्तरेकडे एक सुळका जातो तेथे टकमक टोक आहे या ठिकाणी तुटलेला खोल उभा कडा असून स्वराज द्रोह्यांना शिक्षा करण्यासाठी या टोकावरून ढकलून देत. जगदीश्वर मंदिराच्या पूर्वेस गडाच्या डोंगराला टोकदार आकार आलेला आहे याला भवानी टोक असे म्हणतात. येथे शिबंडीची व्यवस्था केली आहे. भवानी टोकाला लागुनच एक नैसर्गिक गुहा तयार झाली असून तेथे भवानी देवीची स्वयंभू मूर्ती आहे. हिचा उल्लेख जुन्या कागदपत्रात 'श्रीदेवी भवानी राजहुडा' असा केला आहे. किल्याच्या पश्चिमेस प्रसिद्ध असे हिरकणी टोक असून उतरणीवर असल्याने या टोकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर २७ पायऱ्या खोदल्या आहेत. या पायऱ्या उतरून गेल्यानंतर हिरकणी टोक लागते. या हिरकणी टोकाशी संबंधित हिरकणी गवळीनीची कथा प्रसिद्ध आहे.

**जगदीश्वर/व्याडेश्वर मंदिर –** बाजारपेठेतून बाहेर पडल्यानंतर जवळपास पाऊन किलोमीटर अंतर चालत गेल्यावर जगदीश्वर/व्याडेश्वर मंदिर आहे. मंदिराभोवती १०५ फुट लांब आणि १५० फुट रुंद भक्कम दगडाचा तट आहे. तटाच्या पूर्वेकडे दरवाजा असून घडीव दगडाची फरशी आहे. देवळाच्या आतील बाजूस धर्मशाळा आणि ओवऱ्या आहेत. प्रत्यक्ष मंदिर ३३ फुट लांब २१ फुट रुंद आणि १६ फुट उंच आहे. मंदिराचे सभागृह आणि गर्भमंडप असे दोन भाग आहेत. मंदिराची बांधणी हेमांडपंथी शैलीची असून त्यावर मुस्लीम स्थापत्याच्या प्रभाव आहे. विशेषतः मंदिराचे शिखर मशिदीच्या घुमटासारखे आहे.गाभाऱ्यामध्ये मारुतीचीही मूर्ती आहे. या मंदिरासमोर अत्यंत आकर्षक, डौलदार नंदी असून सध्या तो भग्नावस्थेत आहे. मंदिरात नगारखान्याच्या बाजूने प्रवेश करताना पायरीवर 'सेवेची ठायी तत्पर हिरोजी इंदुलकर' असा शिलालेख दगडी उंबऱ्यावर कोरला आहे. जगदीश्वर मंदिराच्या बाहेरील बाजूस नगारखान्याच्या शेजारी भिंतीवर संस्कृतमध्ये शिलालेख कोरला आहे. या शिलालेखामध्ये शिवरायांच्या आदेशाने गडावर कोणकोणती बांधकामे केली त्याचा उल्लेख आहे.

**छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी –** जगदीश्वर मंदिराच्या पूर्वेकडील दरवाजा ओलांडून गेल्यानंतरच छत्रपती शिवाजी महाराजांची अष्टकोनाकृती चौथऱ्यावर मेघडंबरीमध्ये समाधी आहे. ३ एप्रिल १६८० रोजी शिवरायांचे देहावसान झाल्यानंतर याठिकाणी त्यांचे दहन करण्यात आले. शिवकालापासून येथे केवळ अष्टकोनाकृती चौथरा होता. पुढे गडावर झालेली आक्रमणे, राजकीय अस्थिर परिस्थिती यामुळे चौथऱ्यावर

छत्रीचे बांधकाम करण्यात आले नव्हते. पुढे इ.स. १९६३ मध्ये श्री शिवाजी स्मारक समितीने मेघडंबरी/छत्रीचे बांधकाम केले.

रायगड हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजधानीचे ठिकाण होते. अनेक शतकाच्या पारतंत्र्यात असणाऱ्या जनतेने शिवराज्याभिषेकरुपी स्वातंत्र्याचे सुवर्णपान असणारा अभूतपूर्व सोहळा जनतेने अनुभवला. शककर्ते शिवाजी महाराजांच्या चिरनिद्रेची जागा म्हणून किल्ले रायगडास प्रत्येक मराठी माणसाच्या मनात आदराचे स्थान आहे. दुर्ग वारकऱ्यांची पंढरी म्हणून किल्ले रायगडसाठी इ.स २०१७ मध्ये 'रायगड विकास प्राधिकरण' निर्माण करण्यात आले. कोल्हापूरचे युवराज छत्रपती संभाजी महाराज यांची नियुक्ती या प्राधिकरणाच्या अध्यक्षपदावर केली आहे. पुरातत्व नियमाचे पालन करून शिवकालीन वास्तूंचे जतन आणि संवर्धन करण्याचे काम या प्राधिकरणामार्फत सुरू आहे. यामार्फत किल्ल्यावरील सर्व वास्तूंचे जतन व संवर्धन, शिवकालीन पद्धतीचे मार्ग निर्मिती, तात्कालिक सागाचे दरवाजे निर्मिती, तटबंदी मूळ स्वरूपास धक्का न लावता संवर्धन, तलावामधील गाळ काढणे, पर्यटकांना सुविधा, पोलीस चौकी व निवास व्यवस्था, पाचाडमधील राजमाता जिजाबाई समाधी व वाड्याचे जतन, पाणीपुरवठा योजना, वृक्षलागवड, किल्ल्यावर माहितीपट आणि त्यासाठी ध्वनी व प्रकाश योजना, शिवसृष्टी, गड परीक्रमा मार्ग अशी कामे अपेक्षित आहेत. एकूणच महाराष्ट्रचा स्वाभिमान म्हणून किल्ले रायगडचे जतन आणि संवर्धनाची कामे केंद्र आणि राज्य सरकारच्या पुढाकारातून सुरू आहेत.

**स्वयं अध्ययन प्रश्न–१**

**अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.**

१) रायगड किल्ल्याची गडदेवता ...... ही देवी आहे.

अ) रासाई  ब) शिर्काई  क) सातेरी  ड) भवानी

२) रायगडावरील ...... कडासंबंधी कथा प्रसिद्ध आहे.

अ) राधाबाई  ब) धाराऊ  क) कमळाई  ड) हिरकणी

३) शिवाजी महाराजांचा सिंहासनावरील पुतळा ..... येथे बसवण्यात आला आहे.

अ) होळीचा माळ  ब) खेळाचा माळ  क) देवाचा माळ  ड) रावजीचा माळ

४) जोड्या जूळवून योग्य पर्याय निवडा.

| गट १ | गट २ |
|---|---|
| १) गंगासागर | a) जगदीश्वर मंदीर परिसर |
| २) जिजाबाईंची समाधी | b) रायगडावरील आरंभाचा बुरुज |
| ३) खुबलढा | c) पाचाड |
| ४) शिवाजी महाराजांची समाधी | d) मुख्य जलस्त्रोत |

५) खालील विधानाच्या संदर्भात योग्य पर्याय निवडा.

विधान १ : रायगड स्वराज्याची पहिली राजधानी आहे.

विधान २ : रायगडावरील बाजारपेठेची रचना प्रसिद्ध आहे.

१. पहिले विधान सत्य आणि दुसरे विधान असत्य आहे.

२. दुसरे विधान सत्य आणि पहिले विधान असत्य आहे.

३. दोन्ही विधाने सत्य आहेत.

४. दोन्ही विधाने असत्य आहेत.

## १.२.२ जलदुर्ग : सिंधुदुर्ग

''चौऱ्याऐंशी बंदरात हा जंजिरा, अठरा टोपीकरांचे उरावर शिवलंका अजिंक्य जागा निर्माण केला. सिंधुदुर्ग जंजिरा जगी अस्मानी तारा, जैसे मंदिराचे मुंडण श्रीतुलसी वृंदावन तैसा महाराजांचे राज्याचा भूषणप्रद अलंकार चर्तुदश महारत्नापैकीच पंधरावे रत्न महाराजांस प्राप्त झाले.

–चित्रगुप्त बखर

१ मे १९८१ रोजी महाराष्ट्रामध्ये नव्याने निर्माण झालेला जिल्हा म्हणजे सिंधुदुर्ग होय. या जिल्ह्यात आठ तालुके असून पर्यटनाचा जिल्हा म्हणून या जिल्ह्याची ओळख निर्माण झाली आहे. या जिल्ह्याला १२१ किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभलेला असून या समुद्र किनारी अनेक पर्यटन स्थळे आणि मंदिरे आहेत. त्यापैकी थंड हवेचे ठिकाण आंबोली, रेड्डी गावामधील गणेश मंदिर, यशवंतगड आणि विजयदुर्ग किल्ला, लाकडी खेळण्यासाठी परिचीत सावंतवाडी हि प्रसिद्ध ठिकाणे आहेत.

**सिंधुदुर्ग किल्ला बांधणीचा पूर्ववृत्तांत –** छत्रपती शिवाजी महाराजांनी इ.स १६५९ नंतर मराठा आरमाराची निर्मिती केली. 'ज्याचे आरमार त्याचा समुद्र' या धोरणानुसार आरमाराची प्रमुख ठाणी निर्माण करून मजबूत असावीत या हेतूने समुद्राकाठी दुर्ग उभारण्याची योजना शिवरायांनी आखली आणि त्यादृष्टीने शोध सुरू झाला. महाराजांना स्वराज्याची निर्मिती करत असताना अनेक शत्रुंशी सामना करावा लागला. त्यामध्ये जमिनीवरील मोगल, आदिलशाह, निजामशहा, स्वकीय तर समुद्रावरील सिद्धी, पोर्तुगीज, इंग्रज, डच अशा शत्रूंशी सामना करण्यासाठी तसेच अरबी समुद्रावर स्वराज्याच्या बाजूने नजर ठेवण्यासाठी जलदुर्गाची आवश्यकता होती. कारण समुद्रावर मराठ्यांचा कट्टर शत्रू असलेल्या सिद्धीवर मात करण्यास महाराजांनी खूप प्रयत्न केले. जमिनीमार्गे मुरुड जंजीऱ्यास होणारा रसद पुरवठा खंडित केला तरी जलमार्ग सिद्धीस खुला राहिल्याने त्यांची संपूर्ण नाकेबंदी करता येत नव्हती. त्यामुळे भक्कम आरमार निर्माण करताना एका प्रचंड जलदुर्गाचे पाठबळ निर्माण करायचे होते. या भूमिकेतून उभारलेला समुद्रावरील किल्ला म्हणजे सिंधुदुर्ग होय. हा किल्ला मालवण बंदरापासून दीड किलोमीटर अंतरावर असलेल्या खडकास 'कुरटे बेट'

म्हणत. या कुरटे बेटावरच शिवरायांनी दूरदृष्टीने एक मजबूत आणि सुंदर सिंधुदुर्ग किल्ल्याची उभारणी केली. सुरतेवरील हल्ल्यात प्राप्त धनसंपत्ती मधून शुक्रवार दि २५ नोव्हेंबर १६६४ रोजी या किल्ल्याच्या बांधकामास सुरवात झाली. जलदुर्ग उभारणीस किनाऱ्यावर पुजेची तयारी करण्यात आली. परंतु आदिलशाहच्या भयाने कोणी पुजारी तयार होत नव्हते तेव्हा महाराजांनी जानभट्ट आणि दादभट्ट यांना पकडून आणले स्वराज्याबद्दल विश्वास दिला नंतर ते पुजेस तयार झाले. महाराजांनी प्रत्यक्ष कुरटे बेटावर जावून भूमिपूजन केले नाही तर मालवणच्या समुद्र किनाऱ्यावर दांडी नावाचा भाग आहे. या दांडी भागामधील मोठ्या खडकावर सूर्य, चंद्र, गणेश, शिवलिंग, नंदी, पादुका कोरण्यात आल्या आहेत. या शिळेचे शिवाजी महाराजांच्या हस्ते १० नोव्हेंबर १६६४ रोजी पूजन करण्यात आले. आजही दांडी भागामध्ये हि शिळा पहावयास मिळते. ही कोरीव शिळा 'मुहूर्ताचा धोंडा' किंवा 'मोरयाचा धोंडा' म्हणून प्रसिद्ध आहे. त्यामुळे समुद्रकिनारी शिळेचे पूजन केले जाते. त्याकाळी मुहूर्ताची पूजा करणाऱ्या पुरोहिताचा समुद्र प्रवास करू नये असा संकेत होता.

**हिरोजी इंदुलकर यांच्याकडे बांधकामाची जबाबदारी**

गडाचे बांधकाम हिरोजी इंदुलकर यांच्या कुशल नेतृत्वाखाली ५०० पाथरवट, २०० लोहार, १०० गोवेकर पोर्तुगीज कारागीर आणि ३००० मजूर कुरटे बेटावर सलग ३ वर्ष राबून या भक्कम जलदुर्गाची उभारणी केली. यासाठी गडाच्या पायाचा दगड तब्बल पाच खंडी शिशाच्या रसात बसवला. पुढे शिवाजी महाराज आग्ऱ्याच्या कैदेत अडकले आणि सुटण्याची शक्यता नाही अशा परिस्थितीतीध्येही सिंधुदुर्गचे काम विनाखंड चालू होते. २९ मार्च १६६७ रोजी या दुर्गाची वास्तुशांती शिवाजी महाराजांच्या हस्ते झाली. मराठा आरमाराचे मुख्य ठाणे करण्याच्या उद्देशाने शिवरायांनी प्रचंड पैसा खर्च करून हा किल्ला उभारला. या किल्ल्याभोवती पद्मगड, राजकोट आणि सर्जेकोट हे महाराजांनी बांधलेले उपकोट सिंधुदुर्गच्या रक्षणासाठी आहेत.

छत्रपती शिवाजी महाराजांचे स्थापत्यशास्त्रतज्ञ हिरोजी इंदुलकर यांनी अत्यंत विचारपूर्वक या सागरी किल्यांची उभारणी केली. या किल्याचे बांधकाम जवळपास ४ वर्ष सुरू होते आणि १ कोटी होनहून अधिक खर्च झाला होता. या किल्याच्या बांधकामासाठी शिवाजी महाराजांच्या सल्याने हिरोजींनी पोर्तुगीजांचे सहकार्य घेतले होते. पोर्तुगीज हे समुद्री किल्ला बांधणी स्थापत्यात पारंगत होते. या किल्ला बांधकामावेळी हिरोजी किल्ला बांधणीच्या प्रत्येक टप्याची माहिति महाराजांना पत्राद्वारे कळवत असत. त्यासंबंधीची अनेक पत्रे उपलब्ध आहेत. किल्ला बांधण्यासाठी लागणारे दगड काढण्यासाठी मालवण परिसरातच अनेक खाणी खोदल्या होत्या त्या खाणीतून काढलेले दगड समुद्रातून बोटीद्वारे कुरटे बेटावर नेले जात. या किल्यामध्येच बांधकामावेळी महादेव, मारुती, जरीमरी, भवानीमाता, देवरी इ. देवालयेही बांधण्यात आली होती.

**सिंधुदुर्ग किल्ल्याचा संक्षिप्त इतिहास –** स्वराज्याच्या आरमारी राजधानीचा मान प्राप्त झालेल्या किल्ले सिंधुदुर्ग शिवाजी महाराजांच्या वैभवशाली इतिहासाचा साक्षीदार म्हणून महत्वाचा ठरला. पुढे त्यांचे पुत्र छत्रपती संभाजी महाराज यांच्या कालखंडात सतत ९ वर्ष मोगल, आदिलशहा सोबत संघर्षाबरोबर सिद्धी,

पोर्तुगीज, डच, इंग्रज या विदेशी शत्रूंशीही त्यांनी निकराने झुंज दिली त्यांच्याशी लढताना सिंधुदुर्ग किल्ल्याने संभाजी महाराजांना चांगली साथ दिली. नंतर मराठ्यांच्या यादवी युद्धामुळे छत्रपतींचे दोन तख्त निर्माण झाले. या संघर्षामधून सातारकर छत्रपती शाहुंनी कोल्हापूर गादीच्या संस्थापिका महाराणी ताराराणीवर रांगणा किल्ल्यावर हल्ला केला. तेव्हा ताराराणींनी एक सुरक्षित किल्ला म्हणून सिंधुदुर्ग किल्ल्यावर इ.स १७०८ मध्ये आश्रय घेतला. तेथे त्या जवळपास एक वर्ष राहिल्या. वारणेच्या तहानंतर हा किल्ला करवीरकर छत्रपतीकडे आला. पुढे इ.स १७६३ मध्ये पोर्तुगीजांनी या किल्ल्यावर हल्ला केला. एक आठवडा मोठे युद्ध झाले अखेर पोर्तुगीजांना माघार घ्यावी लागली. पुढे ब्रिटीशांचा अंमल संपूर्ण भारतात वाढू लागला. २८ जानेवारी १७६५ रोजी इंग्रज अधिकारी मेजर गोडार्ड व कॅप्टन वॅटसन यांनी सिंधुदुर्ग किल्ल्यावर मोठा हल्ला केला. करवीर छत्रपती विरुद्ध इंग्रज यांच्यात मोठा संघर्ष झाला. परंतु अचानक गडावरील दारुगोळा कोठारास आग लागली. त्यात संपूर्ण दारुगोळा कोठार उद्धवस्त झाले. अखेर ब्रिटिशांनी किल्ला हस्तगत केला. ब्रिटिशांनी किल्ल्याचे नाव बदलून 'फोर्ट ऑगस्टस' असे नवीन नाव दिले. पुढे करवीरच्या राजमाता जिजाबाई आणि ईस्ट इंडिया कंपनी यांच्यात करार झाला आणि २ जानेवारी १७६६ रोजी सिंधुदुर्ग किल्ला करवीर छत्रपतीकडे आला. पुढे इंग्रजांनी पुन्हा आक्रमण करून करवीर छत्रपतींची ताकत क्षीण करण्यास सुरुवात केली. यादरम्यान निपाणीकर देसाई विरुद्ध इंग्रजांनी करवीरकर छत्रपतींना मदतीच्या मोबदल्यात सिंधुदुर्ग ब्रिटिशांना द्यावा असा करार करण्यात आला. अखेरीस ६ ऑक्टोंबर १८१२ रोजी इंग्रज आणि करवीर छत्रपतींमध्ये करार झाला. या कराराने सिंधुदुर्ग किल्ला इंग्रजांच्या ताब्यात गेला. तो स्वातंत्र्य प्राप्तीपर्यंत इंग्रजांकडे होता.

**सिधुदुर्गकडे जाण्याचे प्रमुख मार्ग –** सिंधुदुर्ग किल्ला मालवण तालुक्यामध्ये स्थित असून मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कणकवली, कसाल, कुडाळ, सावंतवाडी या चारही गावामधून मालवणला जाण्यास मुबलक बसेसची सोय आहे. मालवणनजीकच समुद्रामध्ये किल्ल्यावर जाण्यास होड्यांची सोय आहे. किनाऱ्यावरून किल्ल्यावर जाताना बोट सर्पाकार वळणे घेत जाते. कारण पाण्यात आडवे-तिडवे छुपे खडक तसेच कुरटे बेटाभोवती असणाऱ्या खडकामुळे बेटाभोवती तीन कोसपर्यंत मोठ्या नौका नेता येत नाहीत. त्यामुळे माहितगार, जाणकार लोक समुद्रामधील नागमोडी वळणाने गडापर्यंत पोहोचू शकतात.

**गडाची प्रवेशद्वार रचना :** मालवण किनाऱ्यापासून साधारण दिड किलोमीटर समुद्रामध्ये होडीद्वारे प्रवास केल्यानंतर गडाच्या समीप आल्यावरही नेमके प्रवेशद्वार दृष्टीस पडत नाही. गडाच्या सुरवातीस असणाऱ्या दोन प्रचंड बुरुजामधून पूर्वेकडे वळसा घातल्यानंतर गोमुखी बांधणीचे प्रवेशद्वार दृष्टीस पडते. या महादरवाजाचे लाकडी प्रवेशद्वार अजूनही सुस्थितीत असून दरवाजाची उंची नऊ फुट आणि रुंदी साडेतीन फुट आहे. येथून जवळच नगारखान्याची इमारत आहे. या दरवाजाची लाकडी चौकट उंबराच्या झाडाची आहे. उंबराचे लाकुड दीर्घकाळ टिकते आणि त्यावर पाण्याचा फारसा प्रभाव पडत नाही. लाकडी चौकटीसोबतच दगडी चौकटही दरवाजाला बसवली आहे. या प्रवेशद्वारामधून नजीकच मारुतीचे मंदिर आहे. किल्ला फिरण्यापूर्वी या मारूती मंदिरात दर्शन घेण्याची प्रथा आहे. येथुन जवळ जरीमरीचे मंदिर आहे. या मंदिराच्या उजव्या बाजूने तटावर जाण्यासाठी जिने असून ते चढून गेल्यानंतर महादरवाजावरील नगारखाण्यात पोहोचता

येते. शिवकाळामध्ये महाराज गडावर प्रवेश करत असताना येथूनच नौबत झडत असे त्यामुळे महाराज गडावर आल्याचे संपूर्ण किल्ल्यास समजत असे.

**किल्ल्यावरील तटबंदी आणि बुरुजाची रचना :** कुरटे बेटावर स्थित हा किल्ला सर्वसाधारण ४८ एकर क्षेत्रामध्ये पसरलेला आहे. या किल्ल्याच्या सभोवताली तटबंदी असून आजच्या काळामध्ये संपूर्ण गडावरून फेरफटका मारता येत नाही. अनेक ठिकाणी तटबंदी ढासळली आहे. तटबंदीवर चढण्यासाठी अनेक ठिकाणी पायऱ्या आहेत. ही तटबंदी सुमारे तीन किलोमीटर आहे. किल्ल्याच्या तटबंदीचे वैशिष्ट्य म्हणजे तटाची उंची प्रत्येक ठिकाणी तळामधून वेगवेगळी आहे. काही ठिकाणी तीस ते चाळीस फुट तर काही ठिकाणी वीस ते बावीस फुट आहे. तटास एकूण बावन्न बुरुज आहेत. तर पंचेचाळीस ठिकाणी चढण्या-उतरण्यासाठी दगडी पायऱ्या आहेत. या बुरुजावरून समुद्रावर दूरवर टेहाळणी करता येते. या बुरूजांवर अनेक ठिकाणी झरोके आहेत. या झरोक्याचा सहाय्याने ठासनीच्या बंदुकीद्वारे शत्रूंवर मारा करता येतो तसेच शत्रूंच्या हालचालींवर गुप्तपणे लक्ष ठेवता येते आणि मोठ्या बुरुजांवर तोफांच्या सहाय्याने मारा करता येतो.

गडाच्या तटामध्ये जवळपास ४० शौचकुपाची सोय आहे. शिवरायांच्या स्थापत्य विभागाचे प्रमुख हिरोजी इंदुलकर यांनी आपले सर्व कौशल्य हा समुद्री किल्ला बांधताना लावले आहे. किल्ल्याच्या दक्षिणेकडून समुद्रांच्या लाटांचा मारा जादा असल्याने दक्षिणेकडील तट बांधताना विशेष दक्षता घेण्यात आली आहे. दक्षिणेकडील तटांच्या पायात ५०० खंडी उकळते शिसे ओतले होते त्यातच पायाचे दगड बसवले होते त्यामुळे दक्षिणेकडील तटाचा पाया अत्यंत भक्कम झाला आहे. गडावरील तटांचे बांधकाम करण्यासाठी चुनखडी, शंख-शिंपले यांची भुकटी घाट माथ्यावर मिळणारी हिरडा वनस्पती यांचे एकत्रित मिश्रण करून तयार झालेल्या चुण्याने संपूर्ण तटाचे बांधकाम कौशल्याने केले आहे. त्यामुळे आजही किल्याचे तट भक्कम स्थितीत आहेत.

**सिधुदुर्गावरील वैशिष्ट्यपूर्ण 'राणीचे वेळा'** – सिंधुदुर्ग किल्ल्यावरील एक वैशिष्ट्यपूर्ण ठिकाण म्हणजे दुर्गाच्या दक्षिणेकडील तटामधून एक छोटी निमुळती किल्ल्याबाहेर जाण्याची वाट आहे. या वाटेतून वाकून बाहेर जाता येते. येथेच शुभ्र वाळूची छोटीसी चौपाटी आहे. या ठिकाणाला 'राणीचे वेळा' असे नाव आहे. राणीचे वेळा म्हणजे राणीचे स्नान करण्याची जागा होय. करवीर राज्य संस्थापिका महाराणी ताराराणी यांचे या किल्यावर काहीकाळ वास्तव्य होते त्यावेळी त्यांची ही खाजगीची जागा असे. त्यामुळे या भागाला राणीचे वेळा असे स्थानिक लोकांकडून नाव पडले असले तरी त्याला कोणताही ऐतिहासिक पुरावा नाही.

**सिधुदुर्ग किल्ल्यावरील शिवराजेश्वर मंदिर –**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मरणार्थ त्यांचे द्वितीय पुत्र छत्रपती राजाराम महाराज यांनी इ.स. १६९५ मध्ये सिंधुदुर्ग किल्यावर शिवराजेश्वर मंदिर बांधले. या मंदिरातील मूर्तीचे वैशिष्ट्य म्हणजे शिवरायांची मूर्ती नावाड्याच्या वेशात आहे. १५ मीटर रुंद गाभाऱ्यात ही वैशिष्ट्यपूर्ण मिशा असलेली पण दाढी नसलेली विरासनामधील मूर्ती आहे. पद्मासनात बसलेल्या या मूर्तीचा उजव्या हाताने आचमन करीत असलेल्या या मूर्तीचा डावा हात गुडघ्यावर आहे. छातीवर यज्ञोपवित कोरले आहे. गळ्यात कंठा आहे.

डाव्या दंडात आणि दोन्ही हाताच्या मनगटात कडे आहे. मूर्तीच्या मागे प्रभावळ असून उजवीकडे सुर्य तर डावीकडे चंद्रकोर आहे. सदर महाराजांची मूर्ती काळ्या पाषाणामध्ये आहे. या नावाड्याच्या वेशातील शिवमूर्तीची नित्यनियमाने पूजन केले जाते. महाराजांच्या मूर्तीचे पारंपारिक पद्धतीने पूजा विधी करण्याचे काम गडावरील 'सकपाळ' घराण्याकडे आहे. आजही या घराण्याकडून ही परंपरा चालवली जाते. या मूर्तीसमोर शिवरायांच्या वापरामधील मराठा मुठीची तलवार आहे. मंदिराच्या बाहेर मौनी महाराज, गणपती, मारुती यांच्या लहान रेखीव मुर्त्या आहेत. मुळ मंदिर लहान असल्याने १९०६-०७ च्या दरम्यान कोल्हापूरचे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी शिवराजेश्वर मंदिरासमोर भव्य सभा मंडप बांधला.

या शिवराजेश्वर मंदिर परिसरामध्ये पुजारी आणि इतर मानकऱ्यांची १० ते १२ घरे आहेत.' आकाशामध्ये चंद्र-सूर्य असेपर्यंत गड सोडू नका' हा शिवरायांचा आदेश शिरसावंद्य मानून हे इमानी लोक अपुऱ्या सोयींनी गडावर राहतात. या मंदिराजवळच डावीकडे दोन फांद्याचे नारळाचे झाड होते. निसर्गाचा हा अद्भुत चमत्कार होता. परंतु दुर्दैवाने या झाडावर वीज कोसळल्यामुळे या झाडाच्या सर्व फांद्या झडून गेल्या आहेत. त्यामुळे केवळ या झाडाचा बुंधा शिल्लक आहे.

**गडावरील पाण्याची व्यवस्था**

सिंधुदुर्गाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या दुर्गाच्या चहुबाजूला अरबी समुद्राचे खारे पाणी आहे तरीही किल्यात गोड्या पाण्याच्या तीन विहिरी आहेत. शिवराजेश्वर मंदिराबाहेर गडकऱ्यांची घरे ओलांडून पुढे उजवीकडे महादेव मंदिर आहे. या मंदिराच्या आत एक विहिर आहे. येथून पुढे तीन विहिरी असून त्याचे खोदकाम शिवकाळातील आहे. त्यांची नावे अनुक्रमे दुधबाव, दहिबाव, साखरबाव अशी आहेत. आजही या विहिरी याच नावाने ओळखल्या जातात. गडावर राहणाऱ्या लोकवस्तीची तहान भागवण्याचे काम आजही या विहिरी करतात. या विहिरीजवळ शिवाजी महाराज आणि महाराणी ताराराणी यांच्या वाड्याचे अवशेष दिसतात. येथून सरळ भगवती मंदिराकडे जाण्याचा मार्ग आहे. देवीची मूर्ती चतुर्भूंज, शस्त्रसज्ज आहे.

**निशाणकाठी बुरुज :** दुधबाव विहिरीच्या मागे गडाच्या पश्चिमेस एक स्वतंत्र बुरुज आहे. हा गडाच्या बुरुज साखळीतील भाग नसून तो स्वतंत्रपणे उभारला आहे. पायऱ्या चढून या बुरुजावर पोहोचल्यानंतर संपूर्ण किल्ल्याचा परिसर दृष्टीस पडतो. महादेव मंदिराशेजारी एका उंच तटावर ध्वजस्तंभाची जागा तयार करण्यात आली होती. या २२८ फुट उंच असलेल्या ध्वजस्तंभावर स्वराज्याचा भगवा ध्वज डौलाने फडकत होता. या बुरूजाशेजारी एक कोरडा तलाव आहे. उत्तर तटावर उंचवट्यावर महापुरुषाचे मंदिर आहे. शिवराजेश्वर मंदिराचे पुजारी या ठिकाणीही रोज पूजा करतात.

**शिवाजी महाराजांच्या हाता-पायाचे ठसे**

प्रवेशद्वारामधून किल्ल्यामध्ये प्रवेश करताना नगारखाण्याच्या डावीकडे बुरुजावर दोन छोट्या घुमट्या आहेत. एका घूमटीमध्ये चुण्यामध्ये उमटवलेला शिवाजी महाराजांच्या उजव्या हाताचा आणि डाव्या पायाचा ठसा आहे. सिंधुदुर्गचे बांधकाम चालू असताना शिवाजी महाराजांनी गडावर भेट दिली असता त्यावेळी चुण्याच्या ओल्या गिलाव्यावर महाराजांच्या हाता-पायाचा ठसा उमटवला. मग येथे काम करणाऱ्या कल्पक

गवंड्याने त्यावर थापी न फिरवता ते ठसे वाळू दिले अशी कथा सांगितली जाते. हा ठसा आजही स्पष्टपणे दिसतो. परंतु यातील हाताच्या ठशावर पर्यटकांनी आपला सतत हात ठेवून हा ठसा पुसट झाला आहे. महाराजांच्या प्रत्यक्ष हात-पायाचा ठसा सिंधुदुर्ग किल्ल्या व्यतिरिक्त कोणत्याही ठिकाणी नाही. त्यामुळे हा दुर्मिळ ठेवा आहे. याबाबत एक भक्कम कागदोपत्री पुरावा असून शिवाजी महाराजांची नातसून संभाजी महाराज दुसरे यांची पत्नी महाराणी जिजाबाई यांनी २१ नोव्हेंबर १६६३ रोजी सिंधुदुर्गचे शिलेदार येसाजी शिंदे यांना एक पत्र लिहिले त्या पत्रामध्ये सुभेदारांना पुढील आदेश दिला आहे कि, ''तीर्थरूप कैलासवासी महाराज राजश्री छत्रपती यांचा हात जंजिरा आहे याजवरी गच्ची व कोनाडा बांधून नैव्यध व पूजाचाले सारखे करणे. याविसी अंतर न करणे जाणिजे.'' यावरून हे शिवाजी महाराजांच्या हाता-पायांच्या ठसे असल्याचे सप्रमाण सिद्ध होते.

पुढे पुरातत्व विभागाच्या ताब्यात किल्ल्याची जबाबदारी आली. इ.स १९६१ मध्ये यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री असताना तटाची दुरुस्ती करण्यात आली. भारतीय पुरातत्व विभागाने सिंधुदुर्ग किल्ल्यावर डागडुजी केली असून अतिशय कौशल्याने गडाच्या तटबंदीस पडलेली तीन मोठी भगदाडे बुजवली आहेत. गडामध्ये विविध शिवकालीन अवशेषांकडे जाण्यास कॉंक्रीटचा छोटेखानी पदपथ केल्यामुळे झुडुपे, काटे यांचा त्रास होत नाही. पुरातत्व विभागाचा एक व्यक्ती कायम गडावर निगराणीसाठी असतो.

**सिंधुदुर्ग महोत्सवाचे आयोजन –** इ.स २०१६ मध्ये सिंधुदुर्ग किल्ल्याच्या बांधकामास ३५० वर्ष पूर्ण होत असल्याचे औचित्य साधून महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य संचलनालयामार्फत दि २२ एप्रिल ते २४ एप्रिल २०१६ दरम्यान सिंधुदुर्ग महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या अंतर्गत मालवण बाजारपेठेतून शिवप्रेरणा यात्रेचे आयोजन करण्यात आले. तसेच ३०० हून ज्यादा कलाकारांमार्फत शिवकालीन युद्धकला सादर करण्यात आली. तसेच केरळ, मणिपूर, पश्चिम बंगाल, झारखंड, आसाम, उत्तर प्रदेश येथील १०० हून ज्यादा कलाकारांनी युद्ध कलेचे सादरीकरण केले. तसेच शिवकालीन नाणी, किल्ले छायाचित्रे, ऐतिहासिक संदर्भ ग्रंथ, पुस्तके यांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. किल्ल्यावर जाण्यासाठी बोटीच्या दरात ५०% सवलत देण्यात येवून हा सोहळा सर्वसामन्यांपर्यंत पोहोचवण्यात आला. चिवला बीच येथे शिवाजी महाराजांचे नावाड्यांच्या वेशात वाळूशिल्प साकारण्यात आले. थोडक्यात शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीचे प्रतिक आरमारी राजधानी असलेल्या राष्ट्रीय स्मारक किल्ले सिंधुदुर्ग पर्यटन दृष्टीने विकसित करण्याचे अलीकडे मोठ्या प्रमाणात प्रयत्न सुरु आहेत.

**स्वयं अध्ययन प्रश्न-२**

**अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.**

१) सिंधुदुर्ग किल्ल्याची उभारणी ...... बेटावर करण्यात आली.

अ) कुरटे ब) झाडी क) कंडक ड) मोरया

२) कोल्हापूरच्या .... यांनी शिवाजी महाराज मंदिरासमोरील सभामंडपाचे बांधकाम केले.

अ) राजाराम महाराज ब) संभाजी महाराज क) चिमासाहेब महाराज ड) शाहू महाराज

३) शिवाजी महाराजांच्या हाता-पायाचे ठसे एकमेव ..... किल्ल्यावर आहेत.

अ) रायगड ब) सिंधुदुर्ग क) पद्मदुर्ग ड) खांदेरी

४) जोड्या जूळवून योग्य पर्याय निवडा.

| गट १ | गट २ |
|---|---|
| १) राणीची खाजगी जागा | a) दुधबाव |
| २) नावाड्याच्या वेशामधील शिवमूर्ती | b) इ.स. २०१६ |
| ३) सिंधुदुर्गवरील जलस्त्रोत | c) शिवराजेश्वर मंदिर |
| ४) सिंधुदुर्ग महोत्सव | d) राणीचा वेळा |

५) खालील विधानाच्या संदर्भात योग्य पर्याय निवडा.

विधान १ : सिंधुदुर्ग किल्ल्याच्या उभारणीस पोर्तुगीजांनी मदत केली.

विधान २ : सिंधुदुर्ग हा भुईकोट स्वरूपाचा किल्ला आहे.

१. पहिले विधान सत्य आणि दुसरे विधान असत्य आहे.

२. दुसरे विधान सत्य आणि पहिले विधान असत्य आहे.

३. दोन्ही विधाने सत्य आहेत.

४. दोन्ही विधाने असत्य आहेत.

### १.२.३ भुईकोट : किल्ले नळदुर्ग

'आज दीदन ई चष्म मुहिब्बात रोशन

मीगदर्द व चष्म दुष्मनान गर्दद कूर'

**अर्थ** - ''या पाणीमहालाकडे दृष्टी टाकल्यास मित्राचे डोळे प्रसन्नतेने उजळतील तर शत्रूच्या डोळ्यापुढे अंधारी येईल.'' (जलमहालाच्या पश्चिमेकडील भिंतीवरील शिलालेख)

स्वातंत्र्यपूर्वकालखंडात हैद्राबाद संस्थानाच्या पश्चिमेकडील एक जिल्हास 'नळदुर्ग' या नावाने ओळखला जात असे. या जिल्ह्याचे दोन भाग निर्माण करणारी एक वायव्येकडून उत्तरेस डोंगररांग आहे. भौगोलिकदृष्ट्या तूळजापूरपासून उस्मानाबादकडे जमीन उंच होत गेली आहे. या भागामधील सर्वात मोठी नदी मांजरा तर इतर लहान नद्या सिना, खेरी, तीरना आणि बिरना या आहेत. जंगल क्षेत्र फारसे नाही नळदुर्ग, औसा तालुक्याची हवा उष्ण व रुक्ष आहे. पर्जन्याचे प्रमाण मध्यम ते कमी प्रमाणात असते. या

परिसरामधील परांडा, औसा, सोलापूर, विजापूर ह्या सर्व भुईकोट किल्ल्यांचा मुकुटमणी म्हणून हा नळदुर्ग भुईकोट शोभतो.

**नळदुर्गचा संक्षिप्त इतिहास –** नळदुर्ग भागास प्राचीन इतिहास आणि समृद्ध संस्कृतीचा वारसा प्राप्त झाला आहे. चालुक्य कालखंडात नळदुर्ग किल्ल्याचे बांधकाम झाले. चालुक्यानंतर देवगिरीच्या यादवांचे राज्य होते. इ.स १३२६ मध्ये महंमद बीन तुघलक यांनी नळदुर्गवर आपले वर्चस्व निर्माण केले. नळदुर्गची सर्वप्रथम उभारणी कोणी केली याविषयी फारशी माहिती उपलब्ध होत नाही. स्थानिक दंतकथेनुसार नळदुर्गचा इतिहास राजा 'नल' आणि 'दमयंती' राणीपर्यंत मानला जातो. हा किल्ला कल्याणीच्या चालुक्यांकडे होता. त्यावेळी 'नलवाडी विषय' नावाने हा किल्ला परिसर ओळखत. तारीख-ए-फिरिश्ता या ग्रंथामधील उल्लेखानुसार हा किल्ला राजा 'नळ' याने बांधल्याचा उल्लेख आहे. त्यावरून या गडास नळदुर्ग असे नाव रूढ झाले. तसेच या किल्ल्याचा आकार 'न' सारखा असलेने या नावाने ओळखतात. किल्ल्याचे प्राथमिक बांधकाम बहामनी काळात झाले यावेळी मातीच्या भिंतीऐवजी मजबूत दगडी तटबंदी उभारण्यात आली. १४ व्या शतकापासून हा किल्ला इस्लामी शासकांच्या ताब्यात राहिला आहे. अल्लाउद्दिन खिलजीच्या काळामध्ये तो दिल्ली साम्राज्याचा एक भाग होता. हा किल्ला इ.स १३५१ ते इ.स १४८० पर्यंत बहामनी शासकांच्या ताब्यात होता. दुसरा अल्लाउद्दीन बहामनीच्या कालखंडामध्ये या किल्ल्याचा स्पष्ट उल्लेख मिळतो. पुढे तिसरा महंमदशहा बहामनीच्या काळामध्ये महमूद गवानने बहामनी साम्राज्याचे आठ प्रांत निर्माण केल्यानंतर ह्या किल्ल्यावर दस्तूर दिनार हा अधिकारी नेमण्यात आला. बहामनी साम्राज्याची पाच शकले निर्माण झाल्यावर हा गड आदिलशाहीकडे गेला. हा निजामशाही आणि आदिलशाहीच्या सीमेवर असल्याने आणि संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचा असलेने अली आदिलशाह याने किल्ल्यावर ज्यादा बांधकामे केली आणि किल्ला भक्कम केला. आदिलशाही काळामध्ये या दुर्गाचे 'शहादुर्ग'असे नाव ठेवले होते परंतु पुढे हे नाव प्रचलित झाले नाही. सध्याची किल्ल्याची बांधणी सुलतान अली आदिलशहा पहिलाच्या कालखंडात इ.स १५६० मध्ये विस्तारण्यात आली.

इ.स १५८७ साली या गडावर एक शाही लग्नसोहळा संपन्न झाला. आदिलशाही आणि कुतुबशाही यांच्यामधील शांतता प्रक्रियेचा भाग म्हणून इब्राहीम आदिलशाहचा विवाह गोवळकोंड्याच्या महमद कुतुबशहाची बहिण मलिक जहानशी भव्य निकाह झाला. इ.स १५५९ पासून ते इ.स १६७६ पर्यंत विजापूरच्या आदिलशाहची सत्ता या किल्ल्यावर होती. पुढे बहामनी शासकांकडे नंतर बहामनी शासकांच्यानंतर अहमदनगरच्या निजामशाहीकडे नंतर आदिलशाहीकडे या किल्ल्याचे स्वामित्व आले.पुढे औरंगजेबाने दक्षिणेतील स्वराज्य आणि शाह्या संपवण्यासाठी हल्ला केला तेव्हा हा किल्ला मोगलांकडे गेला. इ.स १६७७ मध्ये औरंगजेबाच्या ताब्यात हा किल्ला आला. 'दक्षिणेतील सर्वोत्तम किल्ल्यांपैकी नळदुर्ग हा एक किल्ला आहे' असे औरंगजेबाने उद्गार आहेत. इ.स १७२४ मध्ये मोगलांशी स्वातंत्र्य झाल्यानंतर निजाम-उल-मुल्क याने नळदुर्ग आपल्या ताब्यात आणला. २ जानेवारी १७५८ रोजी नानासाहेब पेशवे, विश्वासराव, सदाशिवराव भाऊ, दत्ताजी शिंदे आदींनी हा किल्ला मराठ्यांच्या ताब्यात आणला.पुढे पुन्हा हा निजामाकडे आला. ब्रिटीशांचा आगमनानंतर ईस्ट इंडिया कंपनीच्या कवायती फौजेच्या कर्जापोटी इ.स १८५३ मध्ये

निजाम-इंग्रज तहानुसार तात्कालिक वऱ्हाड, नळदुर्ग, रायचूर हे इंग्रजांकडे देण्यात आले. पुढे इ.स १८५७ च्या उठावावेळी निजामाने इंग्रजांना केलेल्या मदतीच्या बदल्यात नळदुर्ग आणि रायचूर हे पुन्हा निजामास देण्यात आले. १८ व्या शतकामध्ये हैद्राबाद संस्थानची स्थापना केली. तेव्हा हा किल्ला हैद्राबाद संस्थानाचा भाग बनला. इ.स १९४८ मध्ये तात्कालिक भारताचे गृहमंत्री सरदार वल्लभाई पटेल यांनी लष्करी कारवाई करून नळदुर्गसह मराठवाडा भारतात समाविष्ट केला.

**किल्ल्याचे स्थान व गडावरील वास्तू –** उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यात मुंबई-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावर बोरी नदीकाठी चौदाव्या शतकामधील नळदुर्ग किल्ला असून १८५३ पर्यंत जिल्ह्याचे नंतर आणि १९०५ पर्यंत तालुक्याचे हे मुख्य ठिकाण होते. हा एक वैशिष्ट्यपूर्ण दक्खन पठारावरील तटबंदी केलेला भक्कम भुईकोट आहे. हा किल्ला दोन भागामध्ये विभागला असून प्रामुख्याने दोन विविध शासन कालखंडात (चालुक्य आणि आदिलशाही) या किल्ल्याची उभारणी झाली. या किल्ल्याचे मूळ बांधकाम इ.स ५३७ मध्ये चालुक्य सम्राट नळपती तिसरा याच्या काळामध्ये झाले. हा मुलत: मातीचा होता नंतर त्यास दगडी तटबंदी उभारण्यात आली. प्राचीन काळामध्ये गढी सारख्या मातीच्या किल्ल्याची उभारणी केली जात असे. किल्ल्याशेजारी 'रणमंडळ' जोडकिल्ला आहे. विजापूरच्या इब्राहीम आदिलशाह दुसराचा सरदार किश्वतखान याच्या सल्याने मूळ नळदुर्ग किल्ल्याशेजारी हा जोडकिल्ला उभारला त्यास 'शहादुर्ग' नाव दिले. या दोन्ही जोडकिल्ल्याचे एकूण क्षेत्रफळ ११५ एकर आहे. या किल्ल्याचा मूळ भाग पाणीमहालाच्या पश्चिमेस असून हा जोडकिल्ला प्रकारामधील किल्ला आहे. रणमंडळ किल्ल्याच्या प्रवेशद्वारावर गंडभेरुड आणि माशांची शिल्पे आहेत. या भागावर चालुक्य, बहामणी आणि आदिलशाहीची सत्तांतरे झाली. दुसरा आदिलशहाने बोरी नदीवर धरण बांधून पाणीपुरवठ्याची कायमची सोय केली.त्याच्या काळात किल्ल्यातील पाणीमहल बांधण्यात आला. येथे १९४६ पासून नगरपालिका अस्तित्वात आली. कर्नल मेडोल टेलरच्या कारकिर्दीमध्ये (१८५३-५७) या नगरपालिकेची भरभराट झाली. येथील बाजारपेठेची भरभराट त्याच्या कार्यकालामध्ये झाली.त्याने किल्ल्याचा संक्षिप्त इतिहास लिहिला. त्याने लिहिले आहे कि, ''आजपर्यंत पाहिलेल्या अनेक ठिकाणांमध्ये नळदुर्ग किल्ल्यावरील सर्वात आकर्षित ही जागा आहे.

**किल्ल्यामधील विविध वास्तू**

**किल्ल्याची वैशिष्ट्यपूर्ण रचना –** मध्ययुगीन भारताच्या स्थापत्यकलेचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे किल्ले नळदुर्ग हा भुईकोट होय. नळदुर्ग गाव ओलांडल्यावर प्रचंड विस्तारीत किल्ला दिसतो. 'नवलदुर्ग' असणारा नळदुर्ग किल्ला प्रचंड मोठ्या क्षेत्रामध्ये पसरलेला असून अजिंक्य समजला जातो. किल्ल्याच्या बांधकामासाठी एका उंच टेकडीचा अतिशय कल्पकतेने वापर केला आहे त्यामुळे शत्रूस किल्ल्याच्या प्रवेशद्वारासमोर सहजासहजी पोहोचता येत नाही. दुर्गाच्या तिन्ही बाजूस बोरी नदीचे नैसर्गिक कवच आणि एका बाजूने किल्ल्याच्या संरक्षणासाठी खंदक खोदले आहे. या किल्ल्याची तटबंदी दक्षिण भारतामधील सर्वोत्कृष्ट आहे. ही तटबंदी दुपदरी असून त्यास मिनार पद्धतीच्या कमानी आहेत. या किल्ल्यावरील प्रमुख वास्तूमध्ये जलमहल, नौबुरुज, उपळी बुरुज, जामा मशीद, बारादरी, अंबरखाना, रंग महाल, हमामखाना हूलमुख दरवाजा प्रमुख आहेत. यापैकी पाणीमहाल किंवा जलमंदिर ही महत्वाची वास्तू या आहे. एकूणच या

किल्ल्याचे खंदक तटबंदी, प्रवेशद्वार, बुरुज, तोफा, जंगी यांची रचना इतर भुईकोट किल्ल्यापेक्षा वेगळी असलेने हा किल्ला शत्रूस युद्धात जिंकणे कठीण होते.

**नळदुर्ग किल्ल्याभोवतीचे खंदक/परिखा –** भुईकोट किल्ल्याच्या संरक्षणासाठी किल्ल्याभोवती खोल खंदक खणला जातो. या खंदकास परिखा असेही म्हणत. या खंदकामध्ये सातत्याने पाणी साठवून ठेवत. या किल्ल्याच्या बांधकामास एक उंच टेकडीचा वापर केला असलेने किल्ल्याभोवती आपोआप नैसर्गिक खंदक निर्माण झाला आहे. किल्ल्यास तिन्ही बाजूने खंदक तर चौथ्या बाजूस बोरी नदीच्या पात्राचा वापर केला आहे. ही नदी किल्ल्याभोवती इंग्रजी v आकारामध्ये वाहत जाते. बोरी नदीचा कल्पकतेने वापर केला असून या नदीचे पाणी अडवून एक बंधारा तयार केला आहे. आणि या बंधाऱ्याचे पाणी खंदकामध्ये सोडले होते. या खंदकाची रुंदी आणि खोली सर्वत्र एकसारखी नाही शहराच्या बाजूने खंदकाची रुंदी जवळपास ५० फुट आणि खोली २५ फुट आहे. या खंदकावर काढता–घालता येण्यासारखा पूल होता. आज मात्र या खंदकामध्ये मातीची भर पडली असलेने सहज किल्ल्यावर प्रवेश करता येतो.

**किल्ल्याभोवतीची विस्तीर्ण तटबंदी –** किल्ल्याभोवती संरक्षणासाठी अरुंद सलग अशी भिंत उभारली जाते त्यास तटबंदी किंवा तटभिंत म्हणतात. विस्तीर्ण नळदुर्ग किल्ल्याची तटबंदी अत्यंत मजबूत असून त्यात अनेक बुरुजांची रचना आहे. बुरुजावर जाण्यासाठी ठिकठिकाणी पायरी मार्ग आहे. किल्ल्याच्या भक्कमपणासाठी दुहेरी तटबंदी उभारली जाते. किल्ल्याच्या एका बाजूस नैसर्गिक टेकडी असलेने काही ठिकाणी दुहेरी तर काही ठिकाणी एकेरी तटबंदी आढळते. या तटबंदीची उंची सर्वत्र समान आढळत नाही ज्या ठिकाणी नैसर्गिक उंचवटा आहे त्या ठिकाणी कमी उंचीची तर पठारी किंवा खोलगट भाग आहे त्या ठिकाणी अधिक उंचीची तटबंदी आहे. या किल्ल्याची तटबंदी जास्तीत जास्त १०० फुट तर कमीत कमी ६५ फुट उंच आहे. किल्ल्याबाहेरील तटबंदी इ.स १५९८ मध्ये बांधली गेली.

**तटबंदीवरील फांजी आणि चर्या –** तटबंदीवरील माथ्यास फांजी म्हणतात. या फांजीवर फिरत राहून सैनिक गस्त घालत असत. या किल्ल्याच्या तटबंदीची रुंदी १३ फुट तर फांजीची रुंदी सर्वसाधारण जवळपास ९ फुट आहे. या फांजीवर पोहोचण्यास दगडी पायरी जिना आहे. किल्ल्याच्या तटबंदीच्या माथ्यावर एका विशिष्ट प्रकारची नक्षीदार दगड, विटा किंवा मातीची रांग असते अशा नक्षीदार रांगेस चर्या म्हणतात. नळदुर्ग किल्ल्याच्या तटबंदीच्या माथ्यावर असलेल्या चर्या बांधणीसाठी दगडांचा उपयोग केला जात असे. येथील चर्याचा आकार कमी–अधिक आढळतो. येथील चर्याची कमीतकमी रुंदी २ फुट आणि उंची ३ फुट आहे.

**किल्ल्यावरील भक्कम प्रवेशरचना –** नळदुर्ग किल्ला नळदुर्ग शहराच्या आणि बालाघाट डोंगर पायथ्याशी असून मध्ययुगात हा भक्कम करण्यात आला. त्याचाच भाग म्हणून या किल्ल्याचा महादरवाजा किल्ल्याजवळ आल्याशिवाय दृष्टीस पडत नाही. बाह्य तटबंदीत प्रवेशद्वार आहे. पश्चिमाभिमुख प्रथम दोन उंच बुरुजांमधून आत प्रवेशद्वार असून त्यास हूलमुख दरवाजा म्हणतात. या प्रवेशद्वाराचे बुरुज पाचकोनी आहेत. बाकीचे बुरुज गोलाकार आहेत. दोन छोटे कमानी दरवाजे लागतात. ते नागमोडी ओलांडून पुढे गेल्यानंतर पश्चिमाभिमुख मोठे प्रवेशद्वार आहे. हा दरवाजा 'गोलाबार दरवाजा' म्हणून ओळखला जातो. हेच

किल्ल्याचे मुख्य प्रवेशद्वार आहे. या मुख्य प्रवेशद्वाराच्या शेजारी दोन उपप्रवेशद्वार आहेत. येथे भव्य लाकडी दरवाजा आहे. येथे हैद्राबाद विलीनीकरणावेळी भारतीय सैन्याने डागलेला तोफगोळा पडून भंगलेला दगडी चिरा दिसतो. महादरवाजा २०-२२ से.मी जाड फळ्या, अणकुचीदार सुळे आणि आडव्या लोखंडी पट्टे यामुळे दरवाजा अजून भक्कम आहे. दरवाजामध्ये संरक्षकाच्या देवड्या डावी-उजवीकडे आहेत. डावीकडील देवडीमध्ये दोन फारसी शिलालेख, कोरीवकाम केलेल्या शिळा, अश्वमुख प्रतिकृती आहे. तर उजवीकडील देवडीमध्ये चौथऱ्यावर चार तोफा आहेत. या तोफापैकी एक तोफ सहा मीटर लांब आहे. या तोफेवर पंचधातूचे नक्षीकाम केले आहे.

**अंबरखाना आणि निजामकालीन मुन्सीफ कोर्ट –** महादरवाजा ओलांडल्यावर किल्ल्यामध्ये प्रथम अंबरखाना आहे. किल्ल्यावर धान्य साठवण्यास ज्या इमारतीचा वापर केला जातो त्यास अंबरखाना किंवा धान्यकोठार म्हणतात. प्रवेशद्वार ओलांडून आल्यावर प्रथम हि उत्तराभिमुख आयताकृती वास्तू आहे. ही जमीन पातळीपासून तीन फुट खोल असून अशी विस्तृत वास्तू या भागामधील कोणत्याच किल्ल्यावर नाही. तो ओलांडून पुढे अनेक भग्न इमारतींचे अवशेष आढळतात. पुढे किल्लेदाराचा वाडा आहे. सध्या तेथे महाविद्यालय आहे. याच्या उत्तरेकडे उजवीकडे निजाम कोर्ट अथवा मुन्सीफ कोर्ट आहे. या वास्तूचे बांधकाम निजाम मीर उस्मान अलीखानच्या कालखंडात इ.स १९३२ मध्ये करण्यात आले. या इमारतीमध्ये निजामकाळात न्यायालयाचे कामकाज चालत होते. ही इमारत चौरसाकृती असून यामध्ये कामकाजासाठी अनेक खोल्या आहेत. नंतर यामधील अनेक खोल्यांचे तुरुंगामध्ये रुपांतर करण्यात आले.

**जामा मशीद, राणीमहाल व बारादरी –** इ.स १५६० मध्ये अली आदिलशाह याने बांधलेली दगडी चौथऱ्यावर ही मशीद असून हिंदू बांधणी शैलीची आहे या मशिदीस जामे मशीद म्हणतात. या मशिदीच्या प्रांगणामध्ये एक मोठा पाण्याचा हौद आहे. या जामे मशिदीच्या समोर तटबंदीशेजारी भग्न दक्षिणाभिमुख राणीमहाल आहे. आज केवळ त्याचे भग्नावशेष आहेत. केवळ स्थंब आणि भिंतीचे अवशेष आहेत. येथे जवळच १५ फुट उंचीची बारादरी वास्तू आहे. या वास्तूस बारा दरवाजे असलेने हा महाल बारादरी म्हणून ओळखला जातो. या वास्तूच्या बांधकामास दगड, माती, चुना, चिपा, लाकूड याचा वापर करण्यात आला आहे. या महालाचे मुख्य प्रवेशद्वार १० फुट उंच आणि ५ फुट रुंद आहे. मुख्य प्रवेशद्वारावर आणि मागील द्वारावर नक्षीकाम केले आहे. महालाच्या पूर्व आणि पश्चिमेस गॅलरी असून या गॅलरीत प्रत्येकी चार स्थंब आहेत. याव्यतिरिक्त एक स्थंब भिंतीत आहे. ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीचा प्रशासक कर्नल मेडोज टेलर याने इ.स १८५३ ते इ.स १८५७ या कालावधीत येथे वास्तव्य केले. हैद्राबादचा निजामही उन्हाळ्यात आपल्या कुटुंबासहित येथे वास्तव्यास येत होता. या परिसरामध्ये एका अखंड शिळेत कोरलेला एक मीटरहून ज्यादा मोठे हत्ती शिल्प आहे. दुमजली पडक्या वाड्याचे अवशेषही मंदिर परिसरामध्ये आहेत. तेथून पुढे तटामध्ये एक दिंडी मार्ग असून त्यामधून पाहिले असताना बोरी नदीस दुर्गामध्ये वळवलेला फाटा, त्यावरील बंधारा आणि विस्तीर्ण जलाशय परिसर दिसतो. या राणी महालाच्या समोर मोठे प्रांगण असून येथे बाग होती. या बागेचे अवशेष आजही पाहण्यास मिळतात. या बागेमुळे किल्ल्याच्या सौंदर्यात भर पडत असे.

**किल्लेदाराचे निवासस्थान –** राणीमहाल म्हणजे बारादरी महालाच्या समोर तसेच जामा मशिदीच्या समोर एक भव्य भग्न वास्तूचे अवशेष आढळतात. ही वास्तू म्हणजे किल्लेदार निवासस्थान होय. किल्ल्याचा प्रमुख अधिकारी या इमारतीमध्ये राहत असे. राजवाडा, राणीमहाल जवळच किल्लेदार निवासस्थान आहे. ही वास्तू दुमजली असून भिंतीचे भग्न अवशेष दिसतात.

**शौचालय आणि स्नानगृह –** किल्ल्यामधील राणीमहालच्या दुसऱ्या मजल्यावर शौचालयाची वास्तू आहे. या भग्न अवशेषावरून या वास्तूची लांबी ७ फुट रुंदी ६.८ फुट आणि उंची १२ फुट असल्याचे दिसते. दक्षिणाभिमुख वास्तूमध्ये एकूण तीन शौचालये आहेत. शौचालयात बसण्यास पायदानही बांधले आहे. येथे जवळच स्नानगृह असून त्याच्या पूर्वेस शौचालयाचा टँक आहे. शौचालयामधील घाण एका खापरी पाईपद्वारे या टँकमध्ये सोडले जात असे. बारादरीच्या पूर्वेस हमामखाना ही वास्तू आहे. याचा वापर राजघराण्यातील व्यक्तीच्या स्नानासाठी केला जात होता. हे स्नानगृह तीन भागामध्ये विभागले असून एक भागात स्नान करण्यास एक भाग कपडे बदलण्यास आणि तिसरा भाग पाणी गरम करण्याची सोय आहे.

**दरबार महाल व कर्मचारी निवास वास्तू –** राणीमहालच्या पूर्वेस १० फुटावर एक भव्य भग्न वास्तूचे अवशेष आहेत. ही वास्तू म्हणजे गडावरील राजदरबार आहे. हा दुमजली असून दुसऱ्या मजल्यावर जाण्यास पश्चिमेकडून १४ पायऱ्यांचा जिना आहे. हा महल उत्तराभिमुख आहे. समोर मोठे पटांगण आणि राजबैठकीची रचना आहे. ही वास्तू दगड, मातीमध्ये बांधली असून भिंतीवर चुन्याचे प्लास्टर करून त्यावर कोरीव नक्षीकाम आढळते.

दरबार महालाच्या पूर्वेस आणि किल्ल्याच्या पूर्वेकडील तटबंदीस लागून ४० घरांचे भग्न अवशेष प्राप्त होतात. ही दगड मातीत असून चार ओळीत १० घरे आहेत. या प्रत्येक घरांचा आकारही समान आहे. येथील प्रत्येक घराची लांबी १५ फुट रुंदी १० फुट आणि उंची ९ फुट आहे. ही घरे किल्ल्यामधील कर्मचारी, सरदार किंवा सैनिकांसाठी बांधली असावीत.

**भक्कम बुरूज रचना –** किल्ल्याला एकूण ११४ बुरुज आहेत. त्यापैकी उपल्या बुरुज, नौबुरुज व परांडा बुरुज महत्वाचे आहेत. किल्ल्याच्या बुरुजांना जंग्या असून बुरुजावर व इतरत्र अनेक तोफा आहेत.

**वैशिष्ट्यपूर्ण नौबुरुज –** दक्षिणेकडील तटबंदी 'नौबुरुज' या नावाने ओळखली जात असून स्थापत्यशास्त्राचा एक उत्तम नमुना आहे. असा बुरुज इतर कोणत्याही किल्ल्यावर आढळत नाही. या दोन मजली बुरुजास नऊ छोटे कंगोरे आहेत. म्हणून यास नौबुरुज म्हणतात. या बुरुजाच्या प्रत्येक भागात एक अशा नऊ तोफा आणि बुरुजावर मुख्य तोफ आहे. हा बुरुज १०८ फुट उंच आणि त्याचा व्यास ४० फुटाचा आहे.या ठिकाणी पाणी अडवून छोटा बंधारा तयार केला आहे. ही जागा उताराची असून या ठिकाणी पाण्याचा दबाव येत असलेने बुरुजाची रचना भक्कम आहे. या बुरुजावरून हैद्राबादकडे जाणारा रस्ता आणि मछली बांध दिसतो. जलाशय परिसराचा भाग 'रणमंडल टेकडी' म्हणून ओळखतात. येथेही तटबंदी आहे. या ठिकाणी जाण्यास किल्ल्याच्या ईशान्येकडील उफळ्या बुरूजाशेजारी आहे. या वाटेवरील दरवाजावर

द्विमुखी गंडभेरुड शिल्प कोरले आहे. या किल्ल्यात राम, महादेव आणि हनुमान यांची मंदिरे आहेत. रामनवमीस या किल्ल्यावर उत्सव होतो तर उफळ्या बुरूजाजवळ असलेल्या खंडोबाची यात्रा भरते.

**टेहाळणीचा उफळ्या बुरूज –** गडावरील विस्तीर्ण पठारावर किल्ल्यावरून टेहळणीस उभारलेला किल्ल्याच्या मध्यभागामध्ये स्वतंत्रपणे बांधण्यात आलेला हा बुरुज असून त्यास उफळ्या बुरूज म्हणतात. हा किल्ल्याच्या तटबंदीचा भाग नसून किल्ल्याच्या मध्यभागामध्ये स्वतंत्रपणे बांधण्यात आला आहे. उफळ्या म्हणजे 'गोवऱ्या' यावरून या भागामध्ये दोन दंतकथा प्रचलित असून पहिली हा बुरुज तयार करताना मध्यभागी शेणाच्या गोवऱ्यांचा वापर केला आणि बुरुज तयार झाल्यानंतर गोवऱ्या काढून घेण्यात आल्या त्यामुळे या बुरुजास उपली बुरुज म्हणतात. दुसऱ्या दंतकथेनुसार एका स्त्रीने उफळ्या (गोवऱ्या) विकून हा बुरुज बांधण्याइतके पैसे गोळा केले म्हणून उफली बुरुज म्हणत. १५० फुट उंच आणि ६४ फुट व्यास आहे. बुरुजावर जाण्यास ७८ पायऱ्या आहेत. त्यापैकी ३१ आणि ६६ पायऱ्यानंतर थोडा सपाटीचा प्रदेश आहे. या बुरुजाचा माथा हे गडावरील सर्वोच्च स्थान आहे. या बुरुजाच्या माथ्यावर दोन तोफा आहेत. एका तोफेचे तोंड प्राण्याचे असून दुसरी तोफ साध्या बांधणीची आणि लांबीस ज्यादा आहे. या बुरुज माथ्यावरून संपूर्ण विस्तीर्ण पसरलेल्या दुर्गाचे संपूर्ण दर्शन होते. दुर्गामधील शेकडो सीताफळाची झाडे दृष्टीस पडतात. या बुरुजाच्या दक्षिणेकडील दारूकोठाराची जोडइमारत दिसते. या इमारतीच्या मागे असलेल्या बुरुजावर पंचधातूची तोफ आहे. या बुरुजावर जाताना पूर्वेकडे एका कोनाड्यात खंडोबाचे स्थान आहे. येथे शेंदूर लावलेला खंडोबाचे स्थान आहे हे महाराष्ट्राच्या ११ खंडोबा स्थानापैकी एक आहे.या उफळ्या बुरुजाच्या खाली उतरण्यास छोटी वाट आहे. ती वाट एका हवेशीर आणि पश्चिमाभिमुख दालनाकडे नेते. या जवळच शौचकूप आहे. या बुरुजाच्या पाठीमागील बाजूस एक हौद आहे.

**दारुगोळा कोठार –** या उफळ्या बुरूजाच्या पूर्वेस ५० फुट अंतरावर बारुदखाना आहे. या वास्तूत किल्ल्यावरील दारुगोळा ठेवला जात असे. दगडमातीची भक्कम ही वास्तू आहे. इतर किल्ल्यापेक्षा या गडावरील हा बारूदखाना भिन्न असून एकच वास्तू परंतु याच्या अर्ध्या भागात एक आणि दुसऱ्या अर्ध्या भागात एक असे दोन छत आहे. हे दोन्ही छत बौद्ध चैत्यगृहावरील छताप्रमाणे गजपृष्ठाकार आहेत. या वास्तूत एकूण ६ खोल्या आहेत. गवत, भुसा आणि तणस मिसळलेले असलेने प्लास्टर टिकाऊ बनले आहे.

**रंगमहाल –** तटबंदीशेजारी रंगमहाल आहे. अनेक दालनाचा समावेश असलेल्या रंगमहालामध्ये संगीत, नृत्य असे मनोरंजनाचे कार्यक्रम होत. या वास्तूच्या भिंतीवर विविध रंगकाम करून आणि विभिन्न प्रकारची रंगीत खापरे चिटकवून वास्तुस रंगीत बनवले आहे. त्यामुळे या वास्तुस रंगमहाल म्हणतात. या पश्चिमाभिमुख ७ खोल्या आहेत. या वास्तुत शौचालय आणि स्नानग्रह आहे. या महालाच्या भिंतीवर तीन वेळेस प्लास्टर केल्याचे दिसते. प्रथम चुन्याचे नंतर मातीचे आणि पुन्हा चुन्याचे प्लास्टर केले आहे. त्याचे स्पष्ट अवशेष आजही दिसतात. प्लास्टरमध्येच भिंतीवर विविध खापरी लहान तुकडे बसवले आहेत. त्यामुळे रंगमहालचे सौन्दर्य वाढले आहे. या रंगमहालासमोर बाग आहे. याच ठिकाणी आदिलशहाचा विवाह कुतुबशहाच्या राजकन्येशी झाला होता.

**कैदखाना आणि वधस्तंभ –** रंगमहालाच्या उजवीकडे हत्तीखाना इमारत आहे या हत्तीखान्याच्या शेजारी कैदखाना आहे. या ठिकाणी गुन्हेगारांना कैद करून ठेवत. येथेच कैद्यांना शिक्षा दिली जात असे. ही वास्तू किल्ल्याच्या पूर्वेकडील तटबंदीशेजारी असून कैद्यासाठी स्वतंत्र खोली आहे. या खोलीसमोर वधस्तंभ आहे. या ठिकाणी कैद्यास मृत्युदंड दिला जात असे. या वधस्तंभाच्या पाठीमागे मोठी खिडकी आहे. या खिडकीचे दोन उपयोग केले जात. कैद्यांना वधस्तंभावर मृत्युदंड दिल्यावर त्याचे शरीर या खिडकीतून बाहेर फेकत ते सरळ खोल दरीत पडत असे दुसरे म्हणजे कैद्यास शिक्षा देत असल्याचे शत्रूसही दिसावे. त्यामुळे शत्रूस जरब बसत असे. अनेक किल्ल्यावर कैदखाने आहेत परंतु असा वधस्तंभ नाही.

**हत्तीखाना आणि घोड्याची पागा –** रंगमहालाच्या उजवीकडे हत्ती बांधण्यात जी वास्तू आहे त्यास हत्तीखाना म्हणतात. ही उत्तराभिमुख वास्तू असून मागील भिंत मातीची आणि सर्व बांधकाम दगड आणि चुन्यात आहे. हत्तीखाण्याप्रमाणे प्रत्येक किल्ल्यात पागा नावाची वास्तू आहे. यास घोड्याचे तबेले असेही म्हणतात.

**गडावरील तोफा आणि जंग्या –** नळदुर्ग किल्ल्यावर अनेक प्रकारच्या तोफा आढळतात. मुख्य प्रवेशद्वारातून आत प्रांगणामध्ये चार तोफा आढळतात. त्यापैकी दोन तोफा १० फुट लांबीच्या एक तोफ ५ फुट लांबीची तर एक तोफ २५ फुट लांब आहे. उपल्या बुरुजावर २ तोफा आहेत. त्यापैकी एक तोफ १३ फुट तर दुसरी तोफ २१ फुट आहे. या बुरुजावर तोफेच्या तीन जागा आहेत. पण सध्या दोन तोफा आहेत. नौ बुरुजावर एक मुख्य आणि नऊ छोट्या तोफा आहेत.

किल्ल्याच्या तटबंदीवर शत्रूवर बंदुकीचा मारा करण्यासाठी छिद्रे असत. अशा छिद्रांना जंगी किवा जंग्या म्हणत असत. अशा जंग्या सरळ किंवा तिरक्या असत. नळदुर्ग किल्ल्यावर तिरक्या जंग्या आहेत. मुख्य प्रवेशद्वाराजवळील तटबंदी व बुरुजास अशा जंग्या मोठ्या प्रमाणावर आहेत.

**नळदुर्गचे मुख्य आकर्षण 'पाणीमहाल' –** नळदुर्ग किल्ल्यावरील सर्वात प्रेक्षनिय ठिकाण म्हणजे पाणीमहाल असणारा बंधारा. हे गडावरील मुख्य आकर्षण असून बहुतांश पर्यटक हा पाणीमहाल पाहण्यासाठी गडावर येतात. तुळजापूरहून बोरी नदी वाहत नळदुर्गला मिळते. मध्ययुगात विजापूरच्या आदिलशाहने या नदीचा किल्ल्यासाठी मोठ्या कल्पकतेने वापर केला आहे. बोरी नदीचे पात्र किल्ल्याजवळ अडवून एक मोठा बंधारा निर्माण केला आहे. अशा बंधाऱ्याची उदाहरणे सुरत येथील तापी नदीवर, उज्जैन येथील कुंप्रा नदीवर आणि नळदुर्गच्या बोरी नदीवर बांधलेले आढळतात. बोरी नदीवरील जमिनीपासून ९० फुट उंचीवर ही वास्तू आहे. हा संपूर्ण दगडी १७४ मीटर लांब १४ मीटर रुंद आणि १९ मीटर उंच असणाऱ्या बंधाऱ्याच्या अंतर्गत भागामध्ये अत्यंत हवेशीर असा जलमहाल अथवा पाणीमहाल आहे. तेथे जाण्यास पायऱ्या आहेत त्या उतरून खाली गेल्यानंतर बंधाऱ्याच्या अर्ध्या उंचीवर डावीकडे पाणीमहालकडे जाण्यासाठी मार्ग आहे.

या पाणीमहालाच्या बंधाऱ्यावरून जेव्हा पाणी पडते तेव्हा अत्यंत विलोभनीय दृश्य दिसते. या पाणीमहालाच्या गवाक्षामधून अत्यंत सुंदर समोरील विस्तीर्ण जलाशय दिसतो. या जलमहालाच्या आजूबाजूची हिरवीगर्द झाडी या जलमहालाच्या सौदर्यामध्ये भर घालतात. या पाणीमहालास जोडूनच

स्नानगृह आणि शौचकूप आहे. पाणीमहालाच्या दोन्ही बाजूस पाणी वाहून नेणारे दोन मार्ग असून हे धबधबे 'नर' आणि 'मादी' या नावाने ओळखतात. येथे साधारण २०० फुटावरून खाली पाणी पडते. पावसाळ्यात बोरी नदीचे पाणी वाढल्यानंतर दोन्ही बाजूस असणाऱ्या सांडव्यावरून पाणी वाहते. परंतु पाणी महालात त्याचा एक थेंबही पाणी पडत नाही. हे महत्त्वाचे वैशिष्ट्य या पाणीमहलचे आहे. या महालाच्या गच्चीतून संपूर्ण नजारा सुंदर दिसतो.

**गणेश महाल वास्तू –** या जलमहालच्या पश्चिमेस गणेश महल आहे. हा महलही बोरी नदीच्या बंधाऱ्यात आहे. या महालाच्या उत्तरेकडे एका दगडी खांबावर ६ x ६ च्या वास्तूत गणपतीची मूर्ती कोरली आहे त्या खोलीस गणेश महाल असे म्हणतात. गणपतीच्या पाठीमागे दोन्ही बाजूस दोन नर्तिका असून आतील बाजूस पुन्हा देवदेवता आहेत. या पाणीमहाल आणि गणेश महालचे बांधकाम इब्राहीम आदिलशहा दुसराच्या कालखंडात मीर महंमद इमादिन या वास्तूशास्त्रज्ञाच्या देखरेखीखाली इ.स १६१३ मध्ये केले. हा जलमहाल ७ मीटर लांब आणि ६ मीटर रुंद आहे. या महालाच्या पूर्वेस ८ मीटर लांब आणि १ मीटर रुंद एक सज्जा आहे. मुख्य किल्ला नळदुर्ग आणि जोडकिल्ला रणमंडळ हे पाणी महालाने जोडले आहेत. चोहोबाजूंनी असणाऱ्या पाण्याच्या प्रवाहामुळे हा महल कायम थंड असतो.

**वैशिष्ट्यपूर्ण पवनचक्की –** या किल्ल्यावरील आणखी एक महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे पवनचक्की होय. बोरी नदीवरून वाहत जाणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाचा वापर करून या बंधाऱ्यात पवनचक्कीची निर्मिती केली. आणि पडणाऱ्या पाण्यातून निर्माण होणारी उर्जा पवनचक्कीस वापरली. आणि याद्वारे धान्य दळण्यास चक्की चालवली. किल्ल्यामधील लोकांना या पवनचक्कीद्वारे धान्य दळण्याची सोय करण्यात आली.अशी सोय केवळ या किल्यावर आहे.

**रणमंडळ : नळदुर्ग किल्ल्याचा जोडकिल्ला –** नळदुर्ग किल्ल्याचा जोडकिल्ला म्हणजे रणमंडळ हा आहे.हा किल्ला ७७ एकरामध्ये आहे. उत्तराभिमुख असलेल्या या किल्ल्यास दोन बाजूस दोन मोठे बुरुज असून प्रवेशद्वाराच्या समोरील भिंतीवर द्विमुखी गंडभेरूड आहे त्याच्या पायात आणि तोंडामध्ये हत्ती आहेत.हे कर्नाटकमधील राजसत्तेचे प्रतिक आहे. सध्याच्या कर्नाटक राज्य परिवहन मंडळाच्या बसवर द्विमुखी गंडभेरूड चिन्ह आहे. हे मूळ विजयनगर साम्राज्याचे प्रतिक आहे. किल्याच्या बाहेरील तटबंदीस असलेले प्रवेशद्वार हे गडाचे मुख्य प्रवेशद्वार असून यातून आत गेल्यास तटबंदी सारखा लहान दरवाजा लागतो या दरवाज्यावर हत्तीचे शिल्प कोरले असलेने या दरवाजाला हत्ती दरवाजा असे म्हटले जाते विशेष म्हणजे रणमंडळ या किल्यात एकही वास्तू नाही. याठिकाणी आज शेती केली जाते. या किल्याची तटबंदी व बुरुज सुस्थितीत आहेत.

**नळदुर्ग किल्ल्यावरील जलव्यवस्थापन –** किल्ले स्थापत्यामध्ये जलव्यवस्थापनास अत्यंत महत्व असल्याचे दिसून येते. किल्यांवर असणारे पाण्याचे आड, विहिरी, टाक्या, बारव याची निर्मिती केली जाते. आणि मोटेद्वारे पाणी वर काढून ते किल्यातील सर्व वास्तूंना पुरवले जाते. विशेषतः नळदुर्ग किल्यावर आड, विहिरी, टाक्या, बारव आढळत नाही. टेहळणी बुरूजाजवळ एक विहीर आहे परंतु या विहिरीचा वापर

जलव्यवस्थापनासाठी केला जात नव्हता तर टेहळणी बुरूजावर तोफेला बत्ती दिल्यानंतर बत्ती देणारा सैनिक तोफेच्या आवाजाने बहिरा होऊ नये म्हणून या विहिरीत उडी मारून लपत असे. नौबुरुजाजवळ एक विहीर आहे ही विहीर उतारास असलेने किल्यातील पावसाचे पाणी विहिरीत एकत्र होते. वरील बाजूस बांध घालून पाणी अडवले जाते. या विहिरीतील पाण्याचा उपयोग किल्यातील दक्षिण भागातील वास्तूंना पाणी पुरवठा करण्यासाठी केला जात असे.

किल्याच्या दक्षिणेकडून बोरी नदी वाहते. या ठिकाणी छोटे धरण बांधले आहे. याच धरणातील पाणी प्रामुख्याने किल्यामध्ये वापरले जाते. राणी महालच्या पूर्वेस मोट आणि पाण्याच्या हौदाचे अवशेष आढळतात. मोटेद्वारे धरणातील पाणी वर काढण्यात येऊन ते मोठ्या हौदात एकत्र केले जात असे. हा हौद ९ फुट लांब, ४ फुट रुंद व ४ फुट खोल आहे. या हौदात जमा झालेले पाणी खापरी पाईप आणि नालीद्वारे किल्यात फिरवले जात असे. जेथे धरणातील पाणी वर काढत त्या शेजारी प्रथम लहान नालीतून पाणी पुरवले जात असे. किल्ल्यात सर्वत्र खापरी पाईपलाईन केल्याचे आढळून येते. थोडक्यात जलव्यवस्थापनाची उत्कृष्ठ पद्धत या किल्यावर आढळून येते.

नळदुर्ग किल्ला एक भव्य ऐतिहासिक स्मारक असून जगभरातील पर्यटकांना आणि इतिहास प्रेमीना आकर्षित करत आहे. या किल्ल्यामधील धरण पावसाळ्यात पाणी साठवून ठेवते आणि येथील तलाव स्थलांतरित पक्ष्यांसाठी वास्तव्याचे ठिकाण म्हणून कार्य करते. जेष्ठ पुरातत्त्वशास्त्रज्ञ डॉ कुरुश कलाल यांच्या मते, ''नळदुर्ग हा संपूर्ण भारतामधील उत्तम भू किल्ला आहे. महाराष्ट्रामधील मुरुंड जंजिरा किल्ला, राजगड डोंगरी किल्ला आणि उस्मानाबादचा नळदुर्ग किल्ला हे महाराष्ट्रामधील किल्ले त्रिमूर्ती आहेत.''

**स्वयं अध्ययन प्रश्न-३**

**अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.**

१) आदिलशाही कालखंडात नळदुर्ग किल्ल्यास ....... नावाने ओळखत.

अ) अजीमतारा ब) इस्लामगड क) शहादुर्ग ड) जहादुर्ग

२) नळदुर्ग किल्ल्यात स्वतंत्र्य टेहळणीस ...... बुरुज बांधला गेला.

अ) जागल्या ब) उफळया क) हरका ड) फिरंगी

३) नळदुर्ग किल्ल्याचा जोडकिल्ला म्हणून ....... ओळखला जातो.

अ) रणमंडळ ब) रत्नदुर्ग क) काळदुर्ग ड) सोनगिरी

४) जोड्या जूळवून योग्य पर्याय निवडा.

| गट १ | गट २ |
|---|---|
| १) नळदुर्ग किल्ल्याची तटबंदी | a) जोडकिल्ला |
| २) रनमंडळ | b) निजामाचा प्रदेश |

३) नळदुर्ग ब्रिटीशकाळात प्रदेश c) पाणीमहल

४) बोरी नदी d) नौबुरुज

५) खालील विधानाच्या संदर्भात योग्य पर्याय निवडा.

विधान १ : नळदुर्ग किल्ला चालुक्य कालखंडात बांधकामास सुरवात झाली.

विधान २ : नळदुर्ग किल्ला कुतुबशाही राजवटीखाली होता.

१. पहिले विधान सत्य आणि दुसरे विधान असत्य आहे.

२. दुसरे विधान सत्य आणि पहिले विधान असत्य आहे.

३. दोन्ही विधाने सत्य आहेत.

४. दोन्ही विधाने असत्य आहेत.

## १.३ सारांश

मानवी इतिहासाच्या आरंभापासून दुर्ग महत्वाचे ठरतात. शुक्रनितीसार, अर्थशास्त्र ग्रंथामधून किल्ल्याचे महत्व आणि राज्य संरक्षणात त्याचे महत्व स्पष्ट केले आहे. महाराष्ट्रात प्राचीन सातवाहन काळापासून किल्ल्याचा अधिकृत प्रारंभ झाल्याचे मानतात. छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ले बांधणी, प्रशासन यात कालानुरूप सुधारणा केल्या. सदर प्रकरणात प्रातिनिधिक तीन किल्ल्यांचा अभ्यास करण्यात आला असून एक डोंगरी किल्ला रायगड, समुद्री किल्ला सिंधुदुर्ग आणि भुईकोट किल्ले नळदुर्गचा अभ्यास करण्यात आला आहे.

महाराष्ट्रामधील सर्वात अभेद्य, भक्कम किल्ले राजधानी रायगडचा अभ्यास करण्यात आला असून विविध नावाने ओळखला जाणारा किल्ले रायगड हा मराठी मनाचा मानबिंदू म्हणून ओळखला जातो. हिरोजी इंदुलकर यांनी ३०० हून ज्यादा इमारतीने रायगड सजवला. पाचाड कोट, राजमाता जिजाबाई समाधी आणि राजवाडा, खूबलढा बुरुज, नानादरवाजा, मेणा दरवाजा, वाघ दरवाजा, मनोरे, हत्ती आणि गंगासागर तलाव, मेणा दरवाजा, राजदरबार, नगारखाना, दारुगोळा कोठार, होळीचा माळ, गडदेवता शिर्काईचे मंदिर, गडावरील टकमक, भवानी, हिरकणी टोक, छत्रपती शिवाजी महाराज समाधी, व्याडेश्वर मंदिर अशा शेकडो वास्तू असून सध्या त्या भग्न अवस्थेत आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी इ.स १६५९ नंतर मराठा आरमाराची निर्मिती केली. 'ज्याचे आरमार त्याचा समुद्र' या धोरणानुसार आरमाराची प्रमुख ठाणी निर्माण करून मजबूत असावीत या हेतूने जलदुर्ग किल्ले सिंधुदुर्गाची उभारणी केली. या किल्ल्याची उभारणीसाठी सुरत लुटीमधील धन वापरण्यात आले. गडाचे बांधकाम हिरोजी इंदुलकर यांच्या कुशल नेतृत्वाखाली ५०० पाथरवट, २०० लोहार, १०० गोवेकर पोर्तुगीज कारागीर आणि ३००० मजूर कुरटे बेटावर सलग ३ वर्ष राबून या भक्कम जलदुर्गाची उभारणी केली. ९ मार्च १६६७ रोजी या दुर्गाची वास्तुशांती शिवाजी महाराजांच्या हस्ते झाली. मराठा आरमाराचे मुख्य ठाणे करण्याच्या उद्देशाने शिवरायांनी प्रचंड पैसा खर्च करून हा किल्ला उभारला. या

किल्ल्याभोवती पद्मगड, राजकोट आणि सर्जेकोट हे महाराजांनी बांधलेले उपकोट सिंधुदुर्गच्या रक्षणासाठी आहेत. साधारण ४५ एकर विस्तार असलेल्या या किल्ल्यास ५२ बुरुज असून ४५ ठिकाणी बुरुजावर जाण्यास पायऱ्या आहेत. या किल्ल्यावर राणिवेळा, शिवराजेश्वर, पाण्याच्या सोईस दुधबाव, दहिबाव आणि साखरबाव अशा विहिरी, निशाणकाठी बुरुज, शिवाजी महाराजांच्या हाता-पायाचे ठसे असे अनेक महत्वाची ठिकाणे आहेत.

स्वातंत्र्यपूर्वकालखंडात हैद्राबाद संस्थानाच्या पश्चिमेकडील एक जिल्हा नळदुर्ग असून या परिसरामधील परांडा, औसा, सोलापूर, विजापूर ह्या सर्व भुईकोट किल्ल्यांचा मुकुटमणी म्हणून हा नळदुर्ग भुईकोट शोभतो. नळदुर्ग किल्ल्यास प्राचीन इतिहास आणि समृद्ध संस्कृतीचा वारसा प्राप्त झाला आहे. चालुक्य कालखंडात नळदुर्ग किल्ल्याचे बांधकाम झाले. चालुक्यानंतर देवगिरीच्या यादवांचे राज्य होते. नळदुर्गची सर्वप्रथम उभारणी कोणी केली याविषयी फारशी माहिती उपलब्ध होत. बहामनी साम्राज्याची पाच शकले निर्माण झाल्यावर हा गड आदिलशाहीकडे गेला. हा निजामशाही आणि आदिलशाहीच्या सीमेवर असल्याने आणि संरक्षणाच्या दृष्टीने महत्वाचा असलेने अली आदिलशाह याने किल्ल्यावर ज्यादा बांधकामे केली आणि किल्ला भक्कम केला. आदिलशाही काळामध्ये या दुर्गाचे 'शहादुर्ग' असे नाव ठेवले होते परंतु ते पुढे प्रचलित झाले नाही. सध्याची किल्ल्याची बांधणी सुलतान अली आदिलशहा पहिलाच्या कालखंडात इ.स १५६० मध्ये विस्तारण्यात आली. औरंगजेबाने दक्षिणेतील स्वराज्य आणि शाह्या संपवण्यासाठी हल्ला केला तेव्हा हा किल्ला मोगलांकडे गेला. इ.स १७२४ मध्ये मोगलांशी स्वातंत्र्य झाल्यानंतर निजाम-उल-मुल्क याने नळदुर्ग आपल्या ताब्यात आणला. अल्प काळ मराठ्यांच्या ताब्यात होता. पुढे पुन्हा हा किल्ला निजामाकडे आला.१८ व्या शतकामध्ये हैद्राबाद संस्थानाचा भाग होता. इ.स १९४८ मध्ये तात्कालिक भारताचे गृहमंत्री सरदार वल्लभाई पटेल यांनी लष्करी कारवाई करून नळदुर्गसह मराठवाडा भारतात समाविष्ट केला. ११५ एकर क्षेत्रात विस्तारीत या भुईकोट किल्ल्यात अनेक महत्वाच्या वास्तू आहेत त्यात विस्तीर्ण खंदक, तट, फांजी, प्रवेशद्वार, अंबरखाना, मुन्सीफ कोर्ट, जामा मशीद, राणी महल, बारदरी, शौचालय, स्नानगृह, दरबार, नौबुरुज आणि उपळया बुरुज, दारुगोळा, रंगमहाल, हत्तीखाना, कैदखाना, पाणीमहल, गणेश महाल आणि या किल्ल्याचा जोडकिल्ला रणमंडळ किल्ला या महत्वाच्या वास्तू आहेत.

## १.४ पारिभाषिक शब्द

- गडकोट : किल्ला, दुर्ग
- ट्रेकर्स : गड, किल्ल्याची तसेच डोंगर भागात साहसी पर्यटन करणारे
- कोट : भिंत
- शरभशिल्प, गंडभेरुड : काल्पनिक सामर्थ्यवान प्राणी/पक्षी
- हत : मृत, मृतप्राय
- पीलखाना व पागा : हत्ती ठेवण्याची गडावरील जागा व घोड्याचा तबेला

- मेघडंबरी : छत्रीसारखे समाधीवरील छोटे स्मारक, मराठा स्मारक
- बाव : विहीर, गोडे पाणी साठवणुकीसाठीचा आड
- निशाणकाठी : गडावरील उंच जागी राज्याचे निशाण ज्या काठीवर फडकावले जाते ती काठी
- उफाळ्या : गोवऱ्या, शेणी
- खंदक : किल्ल्याभोवती खोदलेली विस्तीर्ण चर

## १.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयं अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे

रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.

१) ब) शिर्काई २) ड) हिरकणी ३) अ) होळीचा माळ

४) १-d २-c ३-b ४-a

५) २) दुसरे विधान सत्य आणि पहिले विधान असत्य आहे.

स्वयं अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे

रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.

१) अ) कुरटे २) ड) शाहू महाराज ३) ब) सिंधुदुर्ग

४) १-d २-c ३-a ४-b

५) १) पहिले विधान सत्य आणि दुसरे विधान असत्य आहे.

स्वयं अध्ययन प्रश्न-३ ची उत्तरे

रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.

१) क) शहादुर्ग २) ब) उफळ्या बुरुज ३) अ) रणमंडळ

४) १-d २-a ३-b ४-c

५) १) पहिले विधान सत्य आणि दुसरे विधान असत्य आहे.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

प्रश्न १ ला : टिपा लिहा.

१) पाचाड कोट २) रायगडचा पूर्वइतिहास

३) रायगड संवर्धन कार्य ४) सिंधुदुर्ग किल्ला उभारणीची पार्श्वभूमी

५) नळदुर्ग किल्ल्यावरील विविध राजवटी  ६) नळदुर्ग किल्ल्यावरील पाणीमहल

७) नळदुर्ग किल्ल्याचा जोडकिल्ला : रणमंडळ

प्रश्न २ रा : खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

१) राजधानी रायगड किल्ल्याखालील पाचाड कोटाविषयी माहिती सांगा.

२) सिंधुदुर्ग किल्ल्याच्या उभारणीचा पूर्वइतिहास सांगा.

३) नळदुर्ग किल्ल्यावरील पाणी महालची माहिती सांगा.

प्रश्न ३ रा : खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१) मराठ्यांची पहिली राजधानी म्हणून किल्ले रायगडचे विस्तृत वर्णन करा.

२) सिंधुदुर्ग किल्ल्याची सविस्तर माहिती सांगा.

३) महाराष्ट्रामधील सर्वात मोठा भुईकोट किल्ला म्हणून नळदुर्ग किल्ल्याचे विश्लेषण करा.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


१) मराठवाड्यातील किल्ले, डॉ.उत्तम सावंत, मराठवाडा साहित्य प्रकाशन सहकारी संस्था नांदेड, २००१

२) सफर ऐतिहासिक किल्यांची, संभाजी पाटील, परी प्रकाशन कोल्हापूर, १४ नोव्हे. २०१२

३) महाराष्ट्रातील पर्यटनस्थळे, दत्ता कुलकर्णी, प्रकाशक दास्ताने रामचंद्र, १९९२

४) शिवछत्रपतींचे आरमार, संतोष शिंत्रे, परममित्र पब्लिकेशन ठाणे, २०१०

५) इतिहास लेखनपद्धत व ऐतिहासिक स्मारके यांचा अभ्यास,आर. डी. गायकवाड, डॉ.बी एन सरदेसाई, डॉ. व्ही. एन हनमाने, फडके प्रकाशन १९९८

६) रायगड जिल्ह्याचे दुर्गवैभव, सचिन जोशी,बुकमार्क पब्लिकेशन जुलै २०११

७) दुर्गसंपदा महाराष्ट्राची, भगवान चिले, शिवस्पर्श प्रकाशन, कोल्हापूर २००७

८) सोबत दुर्गाची प्र.के. घाणेकर, स्नेहल प्रकाशन पुणे २००१

९) महाराष्ट्रातील किल्ले, पूनम पठारे, एजुकेशनल पब्लिशर्स अॅण्ड डिस्ट्रीब्युटर, औरंगाबाद २०१४

१०) मराठवाड्यातील किल्ले, डॉ.उत्तम सावंत, मराठवाडा साहित्य प्रकाशन सहकारी संस्था २००१


❑❑❑

## घटक २
# भारतातील किल्ले

**अनुक्रमणिका**


२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ लाल किल्ला, आग्रा

२.२.२ ग्वाल्हेरचा किल्ला

२.२.३ जिंजीचा किल्ला

२.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

२.४ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ संदर्भ ग्रंथ


## २.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर खालील गोष्टींचे आकलन होईल.

- भारताच्या इतिहासात किल्ल्यांची प्रशासकीय व संरक्षणात्मकदृष्ट्या महत्त्वाची भूमिका होती त्याविषयी माहिती मिळेल.
- मध्ययुगीन कालखंडातील किल्ल्यावरील विविध वास्तू याबाबत माहिती मिळेल.
- किल्ल्यांचे स्वरूप आणि ऐतिहासिक महत्व याविषयी ज्ञान प्राप्त होईल.
- लाल किल्ला-आग्रा रचना व विविध वास्तूं विषयी विश्लेषण अभ्यासता येईल.
- ग्वाल्हेरचा किल्ला रचना व विविध वास्तूंचे वर्णन पाहता येईल.
- जिंजीचा किल्ला रचना व विविध वास्तूंविषयी माहिती मिळेल.

## २.१ प्रास्ताविक –

प्राचीन व मध्ययुगीन कालखंडात प्रशासनामध्ये किल्ल्यांना महत्वाचे स्थान होते. महत्त्वाच्या शहरांमध्ये आणि मोक्याच्या ठिकाणी किल्ले बांधले गेले. दक्षिणेकडे डोंगररांगावर तसेच उत्तरेमध्ये सपाटप्रदेशामध्ये किल्ल्यांची निर्मिती झाली. भारतामध्ये अनेक भव्य किल्ले आहेत. किल्ल्यावरूनच अनेक राजांनी राज्य

केले. किल्ले बांधण्याचा प्राथमिक हेतू लष्करी कारवायांचा असला तरी राजकीय आणि प्रशासकीय बाबींवर किल्ल्यांचा प्रभाव मोठया प्रमाणात होता. राज्यकारभार तसेच विविध प्रशासकीय कामकाज किल्ल्यावरून चालत असे. प्रशासन चालवणारे अधिकारी व राजा यांचे राहण्याचे ठिकाण प्राचीन व मध्ययुगीन कालखंडात किल्ल्यावर होते. सुरक्षा आणि संपत्तीचे संरक्षण यादृष्टिनेही किल्ल्यांचे महत्त्व होते. संस्कृतमध्ये किल्ल्यांना 'दुर्ग' असे म्हटले जाते. विविध पुराणग्रंथ, कौटिल्याचे अर्थशास्त्र, मनुस्मृती यामध्ये साम्राज्याचे रक्षण करण्यासाठी किल्ल्यांची अतिशय महत्त्वाची भूमिका असल्याचे नमूद केले आहे. किल्ले शक्तीचे प्रदर्शन करण्यासाठीही बांधले गेले. किल्ला ताब्यात असणे हे प्रतिष्ठेचे प्रतीक मानले जात असे. सदर प्रकरणामध्ये आग्रा येथिल लाल किल्ला, ग्वाल्हेरचा किल्ला व जिंजीचा किल्ला या निवडक किल्ल्यांचा आढावा घेतला आहे.

## २.२ विषय विवेचन:

### २.२.१ लाल किल्ला, आग्रा :



**लाल किल्ला आग्रा**

उत्तरप्रदेशातील आग्रा शहरात असणाऱ्या किल्ल्यास 'लाल-किला' किंवा 'किला-ए-अकबरी' म्हणून ओळखले जाते. ऐतिहासिकदृष्ट्या मोघलकालीन हा महत्वाचा किल्ला मानला जातो. सन १९८३ मध्ये आग्रा किल्ला युनेस्कोने जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषीत केला आहे. आग्रा शहर महाभारत कालखंडापासून अस्तित्वात होते असे मानले जाते. पुढे चौहान व राजपूतांच्या ताब्यात आग्रा किल्ला होता. सिकंदर लोदी याने आपली राजधानी दिल्लीहून आग्रा येथे आणली व पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या किल्ल्याची दुरूस्ती व नवीन इमारती बांधल्या. त्याच्या कालखंडात आग्रा शहरास राजधानीचा दर्जा मिळाला. पानिपतच्या पहिल्या लढाईनंतर (१५२६) मुघलांनी किल्ला ताब्यात घेतला. इ.स. १५३० मध्ये या किल्ल्यावर मुघल सम्राट हुमायूनचा राज्याभिषेक झाला. इ.स. १५६५ ते १५७३ या कालखंडात मुघल

सम्राट अकबराने या किल्ल्याचे नुतनीकरण केले. अकबराच्या कारकिर्दीत (१५५६-१६०५) किल्ल्याची दुरूस्ती व विस्तार करण्यात आला. इतिहासकार अबुल फझल यांनी लिहलेल्या नोंदीनुसार हा किल्ला प्रथम विटांचा किल्ला म्हणून ओळखला जात होता. तो उध्वस्त अवस्थेत होता. अकबराने राजस्थानमधील धौलपूर जिल्ह्यातील बरौली भागातील लाल वाळूच्या दगडाने किल्ल्याचे पुन्हा बांधकाम केले. बाहेरील पृष्ठभागावर लाल दगड व आतील गाभ्यामध्ये विटांनी बांधकाम केले आहे. सुमारे ४,००० बांधकाम मजुर व तंत्रज्ञांनी आठ वर्षे रोज काम केले आणि किल्ल्याचे बांधकाम पूर्ण केले. सन १६३८ पर्यंत मुघलांची राजधानी आग्रा होती तोपर्यंत मोघल राजघराण्यातील शासकांचे मुख्य निवासस्थान हा किल्ला होता. इ.स. १६३९ मध्ये मोघलांची राजधानी आग्राहून दिल्लीला स्थलांतरित करण्यात आली.

अकबराचा नातू शहाजहानच्या कारकिर्दीत काही प्रमाणात या किल्ल्याची डागडुजी झाली. शहाजहानने आपली पत्नी मुमताज महलच्या स्मरणार्थ ताजमहाल बांधला. पुढे औरंगजेब आपल्या सर्व भावांमध्ये वारसा युद्धात विजयी झाला तेंव्हा त्याने १६५८ मध्ये शाहजहानला याच किल्ल्यात कैद केले होते. हा किल्ला १३ वर्षे भरतपूरच्या जाट शासकांच्या ताब्यात होता. किल्ल्यात त्यांनी 'रतनसिंह की हवेली' बांधली. १८ व्या शतकाच्या सुरुवातीस मराठा साम्राज्याने किल्ल्यावर आक्रमण केले आणि किल्ला ताब्यात घेतला. १७६१ मध्ये अहमदशहा अब्दालीने पानिपतच्या तिसऱ्या लढाईत केलेल्या भयंकर पराभवानंतर मराठे काही काळ किल्ल्यापासून दूर राहीले. पुढे महादजी शिंदे यांनी १७८५ मध्ये हा किल्ला घेतला. १८०३ मध्ये झालेल्या दुसऱ्या इंग्रज-मराठा युद्धात तो इंग्रजांकडे गेला. १८५७ च्या भारतीय बंडाच्या वेळी हा किल्ला लढाईच्या केंद्रस्थानी होता.

### १. किल्ल्याची रचना:

किल्ल्याची रचना अर्धवर्तुळाकार आहे. यमुना नदीच्या काठावर हा किल्ला वसला असून तो नदीस समांतर आहे. किल्ल्याच्या भिंती सत्तर फूट उंच आहेत. दुहेरी तटबंदीमध्ये मध्यांतराने मोठे वर्तुळाकार बुरुज आहेत. किल्ल्याच्या चारही बाजूंना चार दरवाजे आहेत. खिजरी दरवाजा नदीकडील बाजूस उघडणारा आहे. 'दिल्ली दरवाजा' आणि 'लाहोर दरवाजा' हे किल्ल्याचे दोन दरवाजे उल्लेखनीय आहेत. चौथा दरवाजा 'अमरसिंग गेट' म्हणून प्रसिद्ध आहे.

### २. किल्ल्यावरील दरवाजे:

#### २.१ दिल्ली दरवाजा:

किल्ल्याच्या पश्चिमेला असणारा दिल्ली दरवाजा हा चार दरवाजांपैकी सर्वात भव्य आणि अकबराच्या काळातील उत्कृष्ट स्थापत्यशैलीचा नमुना मानला जातो. हा दरवाजा १५६८ मध्ये किल्ल्याची सुरक्षा वाढविण्यासाठी आणि राजाचे प्रवेशाचे औपचारिक गेट म्हणून बांधला गेला. संगमरवरी दगडामध्ये उत्कृष्ट जडणघडण करून हा दरवाजा सुशोभित केलेला आहे. किल्ल्याभोवताली असणारे खंदक ओलांडून मुख्य भूमीवरून गेटवर जाण्यासाठी लाकडी पुलाचा वापर केला आहे.

**२.२ हाथी पोल दरवाजा (एलिफंट गेट):**

हाथी पोल गेट हे किल्ल्याच्या आतील बाजूस असणारे प्रवेशद्वार आहे. या प्रवेशद्वारामध्ये दोन्ही बाजूस दगडी हत्ती आहेत. किल्ल्यास गोलाकार बुरूज आहेत. सुरक्षेच्या कारणास्तव थोडीशी चढण आणि बाहेरील आणि आतील गेट्समधील ९०-अंश वळण या प्रवेशद्वारजवळ देण्यात आले आहे. त्यामुळे किल्ला अभेद्य बनला आहे. शत्रू पक्षाचे सैन्य किल्ल्यात आल्यास किल्ल्याच्या दरवाजाजवळ त्यांना चिरडण्यासाठी हत्ती वापरत असत.

**२.३ अमरसिंग गेट:**



अमरसिंग गेट हे अकबर दरवाजा म्हणूनही ओळखले जाते. शाहजहानने अकबर दरवाजा (अकबर गेट) चे अमरसिंग गेट असे नामकरण केले. गेटची रचना दिल्ली गेटसारखीच आहे. लाल दगडात याचे बांधकाम करण्यात आले आहे. गेटच्या दोन्ही बाजूस खंदक व प्रत्येक बाजूस बुरूज आहे. गेटजवळ नौबतखानादेखील आहे. गेटवरील बुरूजावर छत्रीसह उलटे कमळ आहे.

**२.४. खिजरी गेट:**

खिजरी गेट यास पाणी गेट असेही म्हटले जाते. खिजरी दरवाजा नदीकडील बाजूस उघडणारा आहे.

**२.५. गझनी गेट:**

गझनी गेट हा दरवाजा मूळचा गझनी येथील महमूद गझनीच्या कबरीचा होता. इ.स. १८४२ मध्ये इंग्रजांनी तेथून तो आणला. गव्हर्नर जनरल लॉर्ड एलेनबरो यांनी ऐतिहासिक घोषणेमध्ये दावा केला की, हे सोमनाथ मंदीराचे चंदनाचे दरवाजे होते जे महमूद गझानीने इ.स. १०२५ मध्ये गझनीला नेले होते. मात्र इंग्रजांचा हा दावा खोटा होता. भारतीय जनतेची सदिच्छा मिळवण्यासाठी त्यांनी हा दावा केला होता. कारण हे गेट गझनीच्या स्थानिक देवदार लाकडापासून बनवलेले आहे, चंदनाचे गेट नाही. सजावटीची शैली प्राचीन लाकूडकामाशी साधर्म्य दाखवत नाही. वरच्या भागावर अरबी शिलालेखही कोरलेला आहे त्यामध्ये महमूदचा उल्लेख त्याच्या नावासहित आहे.

**३. किल्ल्यावरील इतर वास्तू :**

**३.१ शीश महाल**

लाल किल्ल्यामध्ये शीश महाल किंवा काचेचा महाल ही वास्तू आहे. सन १६३१ मध्ये शाहजहानने दिवाण-ए-खासच्या खालील बाजूस याचे बांधकाम केले. महालास जाड भिंती आहेत. याचा वापर प्रामुख्याने स्नानासाठी केला जात होता. भिंतींवर आरसे लावण्यात आले आहेत ज्यामुळे राजवाड्याचे सौंदर्य

वाढते. राजवाड्याच्या आतील बाजूस कृत्रिम दिवे लावले आहेत. राजवाडात दोन खोल्या असून त्यात दोन मार्ग आहेत. संगमरवरी टाकी ठेवण्यात आली असून कारंज्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**३.२ अकबरी महाल :**

अकबरी महाल १५६५ ते १५६९ यादरम्यान बांधला गेला. सध्या अकबर महाल उध्वस्त अवस्थेत आहे. हा महाल जहांगिरी महाल आणि मुस्मान बुर्ज दरम्यान बांधला गेला होता. त्यास मोठे अंगण आणि त्याच्या आजूबाजूला राहण्यासाठी अनेक खोल्या बांधल्या होत्या. राजवाडात दोन दालने होती. आजूबाजूच्या खोल्यांना पाणी देण्यासाठी अकबरी बाओली आहे. सपाट छत आणि लाल वाळूच्या दगडाने हा महाल बांधला होता.

**३.४ जहांगिरी महाल :**



जहांगिरी महाल १५६५ ते १५६९ यादरम्यान बांधण्यात आला. महालास दोन्ही बाजूंना टॉवर्ससह व खिडक्या आहेत. महालात खोल्या, कॉरिडोअर, व्हरांडा यांचा समावेश आहे. हा महाल जहांगीरची पत्नी नूरजहाँ हिने वापरला. या महालात एक पीकॉक हॉल किंवा मयुर मंडप देखील होता जो लाल दगडाने बांधला होता.

**३.५ जहांगीरचा हौज :**

जहांगीर हौजची निर्मिती सन १६१० मध्ये करण्यात आली. याचा वापर आंघोळीसाठी केला जात होता. त्याची उंची ५ फूट, व्यास ८ फूट आणि घेर २५ फूट आहे. याच्या बाहेरील बाजूस फारसी भाषेत एक शिलालेख आहे ज्यामध्ये हौज-ए-जहांगीर असा उल्लेख आहे. तो प्रथम अकबराच्या राजवाड्याच्या प्रांगणाजवळ सापडला. १८४३ मध्ये तो दिवाण-ए-आमच्या समोर ठेवण्यात आले. १८६२ मध्ये तो सार्वजनिक बागेत (कंपनी बाग) हलविण्यात आले जेथे त्याचे बरेच नुकसान झाले. नंतर सर जॉन मार्शल यांनी त्यास आग्रा किल्ल्यावर परत आणले. या हौजमुळे अकबराच्या बंगाली महालाचा भाग हा जहांगिरी महल म्हणून प्रसिद्ध झाला

**३.६ खास महाल:**



सम्राट शहाजहानने खास महाल १६३१ ते १६४० मध्ये बांधला. यास आरामगाह-इ-मुकर म्हणून ओळखले जाते. महालाचे मंडप पांढऱ्या संगमरवरांनी बनलेले होते. महालासमोर एक टाकी असून त्यात कारंजे होते. महालाचे मुख्य दालन बारादरी

दिवाणखान्यांशी जोडलेला होता. छतावर सुंदर नक्षीकाम केले होते. तर भिंतींवर मुघल सम्राटांची चित्रे कोरलेली होती.

### ३.७ अंगुरी बाग:

शाहजहानने १६३७ मध्ये द्राक्षांची बाग किंवा अंगुरी बाग बांधली होती. खास महालासमोर याचे बांधकाम करण्यात आले होते. मध्यभागी कारंजे असलेल्या कप्प्यांमध्ये बाग विभागली गेली होती. बागेत चांगल्या प्रतीची द्राक्षे येत असत. बागेत शाही महिलांसाठी अनेक मजली इमारत होती.

### ३.८ बंगाली महाल :

बंगाली महाल अकबराने बांधला होता. बंगाली महालात दोन भाग होते त्यास अकबरी महाल आणि जहांगिरी महाल असे म्हणतात. ही दोन मजली इमारत होती.

### ३.९ शहाजहानी महाल :

शहा जहानी महाल हा जहांगिरी महल आणि खास महाल यांच्यामध्ये आहे. महालामध्ये मोठे हॉल व राहण्यासाठी खोल्या होत्या. लाल दगडात याचे बांधकाम करण्यात आले आहे. भिंतींवर फुलांच्या रंगीबेरंगी रचना केल्या आहेत. पाच कमानी असलेले संगमरवरी दालन आहे.

### ३.१० मुस्मान बुर्ज:

मुस्मान बुर्ज हे समन बुर्ज आणि शहा बुर्ज म्हणूनही ओळखले जाते. शहाजहाने याचे बांधकाम केले. अष्टकोनी आकाराची ही वास्तू दिवाण-ए-खासजवळ बांधण्यात आली. शहाजहानने आपली प्रिय पत्नी मुमताज महलसाठी ही इमारत १६३१ ते १६४० च्या दरम्यान बांधली.

### ३.११ दिवाण–ए–आम :



शाहजहानने १६३१ ते १६४० च्या दरम्यान दिवाण-ए-आम बांधले. हा जनतेसाठी बांधलेला हॉल होता तो २०१ फूट लांब व ६७ रूंद फूट इतका आहे. सभामंडपाचे प्रवेशद्वार लाल दगडाचे बनलेले आहेत. हॉल तीन भागामध्ये विभाजित करण्यात आला आहे. हॉलला समोरील बाजूस नऊ कमानी आहेत. लाल वाळू व दगडाच्या इमारतीला पांढऱ्या प्लास्टरने प्लास्टर केले आहे जेणेकरून ते संगमरवरी इमारतीसारखे दिसते. सिंहासन संगमरवरमध्ये बांधण्यात आले असून त्यास 'तख्त-ए-मुरासा' असे म्हटले जात असे. महालात सम्राटाच्या बैठकीच्या डाव्या आणि उजव्या बाजूला असलेल्या खिडक्यांमधून महिला समारंभ पाहू शकत होत्या. वजीरास बैठकीसाठी खोलीच्या खाली एक बैठकव्यवस्था होती.

**३.१२ दिवाण–ए– खास:**



दिवाण-ए-खास हा खाजगी लोंकांकरीता बांधलेला हॉल होता. मुघल सम्राट राज्यातील राजदूत, राजे आणि इतर शाही लोकांशी चर्चा व व्यवहार येथे करत असे. दिवाण-ए-खास मध्ये दोन सभागृह बांधले गेले. त्यातील आतील सभाग्रहास तांबी खाना असे म्हणतात.

**३.१३ मिना मशीद :**

सम्राट शहाजहानने मिना मशीद स्वत:साठी व शाहीघराण्यातील स्त्रियांना नमाज पडता यावे यासाठी बांधली. मशीदीस उंच भिंतींची तटबंदी आहे. पश्चिमाभिमुख मिहराब असलेला प्रार्थना कक्ष आहे. छतास व इतरत्र संगमरवरी फरश्या लावण्यात आल्या आहेत.

**३.१४ मोती मशीद**



शाहजहानने मोती मशीद १६४८ ते १६५६ दरम्यान बांधली. ही मशीद दिवाण-ए-आम जवळ बांधली गेली आहे. मशीदीस व्हरांडासह बारा खांब आणि कमान आहे. मुख्य दरवाजाला तीन छत्री असलेल्या सुंदर कमानी आहेत. मशिदीला तीन घुमट आहेत. मुख्य प्रार्थना हॉलच्या दोन्ही बाजूला महिलासाठी स्वतंत्र प्रार्थना सभाग्रह बांधलेले आहे.

**३.१५ नगीना मशीद:**

नगीना मशीद शाहजहानने मोती मशिदीजवळ बांधली. ही मशीद १६३१ ते १६४० या काळात बांधली गेली. संपूर्ण मशीद संगमरवरी बांधलेली असून अतिशय साधी वास्तुकला आहे. प्रार्थना कक्षाच्या वर तीन घुमट आहेत.

एकूणच स्थापत्य शास्त्राच्यादृष्टिने इतिहासात आग्रा किल्ल्यास महत्त्वाचे स्थान आहे. बंगाल आणि गुजरातच्या रचनेतील पाचशे इमारती किल्ल्यात बांधल्या गेल्याची नोंद अबुल फजलने केली आहे. त्यापैकी काही बांधकाम शाहजहानने त्याच्या पांढऱ्या संगमरवरी राजवाडाकडे जाणारा मार्ग बनवण्यासाठी पाडले. १८०३ ते १८६२ दरम्यान ईस्ट इंडिया कंपनीच्या ब्रिटीश सैन्याने बॅरेक्स उभारण्यासाठी इतर बहुतेक इमारती नष्ट केल्या. मोघल कालखंडातील ऐतिहासिक वास्तू म्हणून आग्रा किल्ल्यास महत्वाचे स्थान आहे.

* **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – ०१**

**खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा व वाक्य पुर्ण करा.**

१. .......... या किल्ल्यास 'किला-ए-अकबरी' म्हणूनही ओळखले जात असे.

अ. ग्वाल्हेर ब. लाल किल्ला क. जिंजी ड. जंजिरा

२. मोती मस्जीद १६४८ ते १६५६ दरम्यान ............... याने बांधली होती.

अ. औरंगजेब ब. शहाजहान क. बहादूरशहा ड. जहांगीर

३. लाल किल्ला, आग्रा येथिल अकबर गेटचे 'अमरसिंग गेट' असे नामकरण ............ यांनी केले.

अ. शाहजहान ब. औरंगजेब क. बहादूरशहा ड. जहांगीर

४. लाल किल्ल्यावरील 'दिवाण-ए-खास' ...............लोकांकरीता बांधलेले सभागृह होते.

अ. खाजगी लोकांकरीता ब. जनतेकरीता

क. बेगमांकरीता ड. यापैकी नाही

५. लाल किल्ल्यावरील 'बंगाली महाल' .......... ने बांधला.

अ. अकबर ब. औरंगजेब क. बहादूरशहा ड. जहांगीर

## २.२.२ ग्वाल्हेरचा किल्ला :



**ग्वाल्हेर किल्ला**

ग्वाल्हेर किल्ला मध्य भारतातील अजिंक्य किल्ला मानला जातो. मध्य प्रदेशमध्ये ग्वाल्हेर किल्ला असून राजा सुर्यसेन याने उंच टेकडीवर या किल्ल्याचे बांधकाम केले. जुन्या संस्कृत ग्रंथामध्ये याचा उल्लेख 'गोपाचल', गोपगिरी, गोपाळ टेकडी असा आढळतो याच नावांवरून ग्वाल्हेर हे नाव पडले असावे असे मानले जाते. आज ग्वाल्हेर हे मध्यप्रदेशातील एक प्रमुख पर्यटन स्थळ आहे.

ग्वाल्हेरच्या पश्चिमेला ३ किमी अंतरावर गुप्तेश्वर येथे अनेक पाषाणयुगीन कलाकृती आढळून आल्याने या ठिकाणाची प्राचिनता प्रागैतिहासिक काळापर्यंत आहे. इ.स. ४०० पर्यंत ग्वाल्हेरवर मौर्य, शुंग, कुशाण आणि नागांनी राज्य केले. त्यानंतर इसवी सन ५०० च्या शेवटी गुप्त साम्राज्याच्या वर्चस्वाखाली हा भाग होता. किल्ल्यावर सापडलेल्या शिलालेखावरून या प्रदेशाचा समावेश कनौज राज्यामध्ये होता.

**१. किल्ल्याची भौगोलिक पार्श्वभूमी :**

ग्वाल्हेर किल्ला एका छोट्या टेकडीवर बांधला गेला आहे. किल्ल्याच्या टेकडीची उंची ३४२ फूट, लांबी सुमारे २.४ कि.मी. आणि रुंदी सुमारे २७० मीटरते ०१ कि.मी. आहे. राजवाड्याच्या जवळून स्वर्णरेखा ही छोटी नदी वाहते.

**२. ग्वाल्हेर किल्ल्याचा इतिहास:**

ग्वाल्हेरच्या किल्ल्याने इतिहासातील अनेक चढउतार पाहिले आहेत. किल्ल्यावर रजपूत राजांचे वर्चस्व होते. ग्वाल्हेर किल्ला संदर्भात भारत सरकारने प्रकाशित केलेल्या माहिती पुस्तकात सूर्य मंदिरातील शिलालेखामध्ये इ.स. ५२५ असा उल्लेख आहे. तसेच हूण सम्राट मिहिरकुल याच्या कालखंडात हा किल्ला बांधला गेला असे म्हटले आहे. किल्ल्यापासून सुमारे १२ मैलांवर असलेल्या सिहोनिया गावातील सूर्यसेन कच्चवाहा नावाच्या स्थानिक सरदाराने किल्ल्याचे बांधकाम इ.स. ७२७ मध्ये केले अशीही नोंद सापडते. पाल घराण्यातील सूरज पाल ते बुधा पाल पर्यंत राजांनी ९८९ वर्षाच्या कालावधीपर्यंत ग्वाल्हेरवर राज्य केले.

पाल राजघराण्याकडून प्रतिहार घराण्याकडे ग्वाल्हेरचे शासन हस्तांतर झाले व रामदेव प्रतिहार हा ग्वाल्हेरचा शासक बनला. ग्वाल्हेर येथील प्रतिहार राज्यकर्ते प्रमल देव, सलाम देव, बिक्रम देव, रतन देव, शोभांग देव, नरसिंह देव, प्रमल देव इ. होवून गेले. इ.स. १०२३ मध्ये गझनीच्या महमूदने किल्ला काबीज करण्यासाठी हल्ला केला परंतु त्यास यश प्राप्त झाले नाही. इ.स. ११९६ मध्ये, दिल्ली सल्तनतचा पहिला तुर्की सुलतान कुतूबूद्दीन ऐबक याने हा किल्ला ताब्यात घेतला. परंतु सन १२११ मध्ये तो पुन्हा किल्ला त्याचे ताब्यातून गेला. सन १२३१ मध्ये दिल्ली सल्तनत गुलाम वंशाचा शासक सुलतान इल्तुमस याने किल्ला जिंकला. मात्र अल्पावधीतच तैमुरलंगच्या शासकाने दिल्लीवर स्वारी केली. तोमरांनी १३९८ पासून ग्वाल्हेरवर राज्य केले. त्यापैकी सर्वात प्रसिद्ध मानसिंग (१४८६–१५१६) हा शासक होता त्याने मान मंदिर, राजवाडा बांधला. शेवटचा तोमर राजा विक्रमादित्य तोमर इ.स. १५१६–१५१८ हा होता. इब्राहिम लोदीने आक्रमण करून हा किल्ला ताब्यात घेतला आणि ग्वाल्हेरच्या किल्ल्यावरील तोमर राजवटीचा अंत केला.

**३. ग्वाल्हेर किल्ल्याचा मध्ययुगीन इतिहास–**

इ.स. १५१९ मध्येच लोदी राजवंशातील इब्राहिम लोदीने वर्चस्व निर्माण केले. त्याच्या मृत्यूनंतर, मुघल सम्राट बाबरने किल्ल्याचा ताबा घेतला. पुढे शेरशाह सुरीने हुमायूनचा पराभव केला व किल्ला सूरी राजघराण्याच्या ताब्यात आला. शेरशाह सूरीच्या मृत्यूनंतर १५४० मध्ये त्याचा मुलगा इस्लामशाह याने

आपली राजधानी दिल्लीहून ग्वाल्हेरला हलवली. कारण पश्चिमेकडून वारंवार होणा-या हल्ल्यांपासून ग्वाल्हेर सुरक्षित मानले जात होते. इस्लामशाहचा १५५३ मध्ये मृत्यू झाला. सत्तेवर आलेल्या आदिलशाह सूरीने हिंदू योद्धा हेमू उर्फ हेमचंद्र विक्रमादित्य यास राज्याचे पंतप्रधान व सेनाप्रमुख म्हणून नियुक्त केले. हेमूने १५५६ मध्ये राजधानी ग्वाल्हेरहून दिल्लीला हलवली. नंतर सम्राट अकबराने ग्वाल्हेर किल्ला ताब्यात घेतला.

जाट शासकांनी ग्वाल्हेर किल्ल्यावर काही काळ राज्य केले. मुघल साम्राज्याच्या पतनानंतर ग्वाल्हेरचा किल्ला गोहदच्या राणाने जिंकला. जाट शासक महाराजा भीमसिंग राणा (१७०७-१७५६) आणि महाराजा छतरसिंह राणा (१७५७-१७८२) यांची ग्वाल्हेर किल्ल्यावर सत्ता होती.

मराठा राजवटीमध्ये मराठ्यांनी ग्वाल्हेर किल्ल्यावर आपले वर्चस्व निर्माण केले होते. सन १७८४ मध्ये मराठा साम्राज्याचे सरदार महादजी शिंदे यांनी ग्वाल्हेर किल्ल्यावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले व आपले प्रमुख लष्करी ठाणे बनवले. सन १८०८ ते १८४४ या काळात शिंदे व इंग्रज यांच्यात किल्ल्याचा ताबा मिळवण्यासाठी वारंवार युध्द झाले. परंतु अखेरीस हा किल्ला शिंदेच्या ताब्यात राहीला.

**४. ग्वाल्हेर किल्ल्याची रचना :**

ग्वाल्हेर किल्ला आणि त्याचा परिसर आजही सुस्थितीत आहे. किल्ल्यावर अनेक ऐतिहासिक वास्तू आहेत. बुद्ध आणि जैन मंदिरे आहेत. आकर्षक राजवाडे आहेत त्यापैकी प्रसिद्ध मान मंदिर राजवाडा, गुजरी महाल (आता पुरातत्व संग्रहालय आहे.), जहांगीर महल, करण पॅलेस, सासबाहू मंदिर, तेली-का-मंदिर, जैन मंदीरे, हाती पोल गेट आणि शाहजहान महाल इत्यादी वास्तू आहेत.

**४.१ हाथी पोल गेट (हत्ती गेट) :**

Hathi Pol Gate front side



Hati pol gate back site



हाती पोल गेट (हत्ती गेट) हा किल्ल्यातील मुख्य दरवाजा आहे जो राजा मानसिंगने बांधलेल्या मान मंदिर राजवाडाकडे जातो. सात दरवाजांच्या मालिकेतील शेवटचा दरवाजा आहे. हत्तीच्या आकाराच्या पुतळ्याच्या नावावरून या दरवाजास हत्ती दरवाजा नाव ठेवण्यात आले. राजवाडाच्या आग्नेय कोपऱ्यात

दगडात बांधलेल्या दरवाजाला दंडगोलाकार बुरुज आहेत. बुरुजांवर घुमटाचा मुकुट आहे तसेच कोरीव पॅरापेट्स घुमटांना जोडतात त्यामुळे प्रवेशद्वार आकर्षक दिसते.

**४.२ लक्ष्मण पोल गेट :**

हत्ती गेटला सुरक्षा म्हणून या गेटची निर्मिती करण्यात आली. तोमर वंशाचे संस्थापक राजा वीरसिंह देवचा पुत्र लक्ष्मणसिंह याने या गेटची निर्मिती केली. याची उंची ८.२. मीटर,. रुंदी ५.३० मीटर व लांबी ३.६० मीटर आहे.

**४.३ गणेश पोल गेट :**

लक्ष्मण गेटच्या खालील बाजूस याची निर्मिती केलेली आहे. किल्ल्यास अधिक सुरक्षित करण्याच्या हेतूने राजा डुंगरसिंह यांने १४२५-१४५९ मध्ये याची निर्मिती केली. आपले वडिल गणपतीदेव यांच्या नावावरून त्याने गेटचे नाव गणेश गेट असे ठेवले. याची उंची ६ मीटर, लांबी ४.३० मीटर, रुंदी ३.६० मीटर आहे.

**४.४ भैरो पोल गेट :**

सदर गेट पुर्णतः नष्ट झाले असून रस्त्याच्या दोन्ही बाजूस फक्त चबुतऱ्याचे अवशेष शिल्लक राहिले आहेत. ग्वाल्हेरचा शासक भैरोपाल याने याची निर्मिती केली.

**४.५ बादलगढ पोल गेट :**


ग्वाल्हेर किल्ल्यावर पूर्व दिशेस सपाट भूभागावर राजा मानसिंगचे काका बादलसिंह यांनी अनेक घरांची बांधकामे केली. या भागास बादलगढ या नावाने ओळखले जात असे. येथे एक प्रवेशद्वार निर्माण करण्यात आले त्यास बादलगढ द्वार असे म्हटले जाते. याची उंची ६ मीटर, लांबी ३.६५ मीटर, रुंदी ४.७५ मीटर आहे.

**४.६ गुजरी महालः**



गुजरी महाल राजा मानसिंगने त्याची गुजर पत्नी मृगनयनी हिच्या प्रेमापोटी बांधला. कारण राणीने स्वत:साठी स्वतंत्र महालाची राजा मानसिंगकडे मागणी केली होती. सध्या तिथे पुरातत्व संग्रहालय आहे त्यामुळे हा महाल सुस्थितीत आहे. संग्रहालयातील प्रदर्शनात असलेल्या दुर्मिळ कलाकृतीमध्ये प्राचीन हिंदू आणि जैन शिल्पे, विविध मूर्ती, लेख भित्तिचित्रांच्या प्रतिकृती आहेत.


### ४.७ जैन मंदिरे :



ऋषभनाथाची ५८.४ फूट (१७.८ मीटर) मूर्ती



ग्वाल्हेर किल्ल्यात उर्वई गेटजवळील खडकात कोरलेल्या जैन मूर्ती



तीर्थंकरांच्या रॉक कट प्रतिमा.

ग्वाल्हेर किल्ल्यावर अनेक जैन मंदिरे आहेत. किल्ल्यावरील सिद्धाचल जैन मंदिर लेणी ७ व्या ते १५ व्या शतकात बांधली गेली. किल्ल्यात जैन तीर्थकरांना समर्पित अकरा जैन मंदिरे आहेत. दक्षिणेकडील बाजूस तीर्थकरांची बारीक नक्षीकाम असलेली २१ मंदिरे खडकात कोरलेली आहेत.

ग्वाल्हेर किल्ल्यात उर्वई गेटजवळील खडकात कोरलेल्या जैन मूर्ती आहेत. उर्वही परिसरात तीर्थकरांच्या पद्मासन मुद्रेतील २४, कयोतसर्ग मुद्रामधील ४० आणि भिंती आणि खांबांवर कोरलेल्या सुमारे ८४० मूर्ती आहेत. सर्वात मोठी मूर्ती म्हणजे उर्वही दरवाजाबाहेर असलेली आदिनाथाची ५८ फूट ४ इंच उंचीची मूर्ती आणि पाथर–की बावडी (दगडाची टाकी) परिसरातील पद्मासनातील पार्श्वनाथांची ३५ फूट उंचीची मूर्ती आहे.

गोपाचल टेकडीवरही अनेक जैन मुर्ती खोदण्यात आल्या आहेत. सर्व मूर्ती डोंगराळ खडक कापून कोरलेल्या आहेत. बहुतेक मूर्ती १३४१–१४७९ मध्ये तोमर घराण्यातील राजा डुंगरसिंग आणि किर्तीसिंग यांच्या काळात बांधल्या गेल्या आहेत.

### ४.८ तेली का मंदिर –

ग्वाल्हेर किल्ल्यावर असणारे तेली का मंदीर आठव्या शतकात बांधले गेले. प्रतिहार सम्राट मिहिर भोज याने हे हिंदू मंदीर बांधले. दक्षिण भारतीय आणि उत्तर भारतीय बांधकाम शैलीचा व विविध भारतीय स्थापत्य शैलींचा मिलाप याच्या बांधकामात दिसून येतो. मंदीराची रचना आयताकृती आहे. नागरी स्थापत्य शैलीमध्ये दगडी बांधकामात बांधलेला मनोरा आहे. त्याची उंची २५ मीटर (८२ फूट) आहे. हे मूळतः विष्णूला समर्पित होते, परंतु नंतर शिवाच्या उपासनेत त्याचे रूपांतरित झाले. हे तेली का मंदिर नसून ते

शिवाचे मंदिर होते. उपासक तेथे प्रार्थना करून आपली इच्छा पूर्ण करण्यासाठी ताली नावाची घंटा वाजवत. त्यावरून त्यास तेली का मंदिर हे नाव रूढ झाले.



Gate of Teli Mandir



Sculptures near Teli Mandir



Teli-ka-Mandir

**४.९ गरुड स्मारक**

तेली का मंदिराच्या जवळच गरुड स्मारक आहे, जे विष्णूला समर्पित आहे, किल्ल्यात सर्वात उंच ठिकाणी गरूड स्मारक आहे. यामध्ये मुस्लिम आणि भारतीय वास्तुकलेचे मिश्रण आहे.

**४.१० सास–बाहू/सहस्त्रबाहू मंदिर–**

Sas-Bahu temple



Small Sas Bahu temple



१० व्या शतकात ग्वाल्हेरच्या गुर्जर, प्रतिहार घराण्याची सत्ता होती. त्यानंतर कच्छपघट नावाच्या प्रादेशिक राजघराण्याने ग्वाल्हेरवर आपली सत्ता स्थापन केली. त्यांच्या राजवटीत त्यांनी अनेक वास्तूंचे बांधकाम केले. त्यामध्ये सास–बाहू मूळ नाव सहस्त्रबाहू मंदिर (भगवान विष्णूचे हजार हातांचे रूप) ही दोन मंदीरे होती. लहान मंदिर अधिक शोभिवंत आणि चांगले जतन केलेले आहे. एकमेकांना लागून असणारी ही मंदिरे सुरुवातीला विष्णूला समर्पित होती. दोन मंदिरांपैकी मोठा मंदिरावरील एका शिलालेखात मंदीर इ.स. १०९३ मध्ये बांधले असा उल्लेख आहे. लाल वाळू दगडात बांधलेल्या या मंदिरांचे अद्वितीय वास्तुशिल्प वैशिष्ट म्हणजे ते केवळ तुळई आणि खांबांच्या सहाय्याने अनेक मजली उंच केले गेले आहे. कोणत्याही

कमानीचा वापर केलेला नाही. मुख्य मंदिर अतिशय मजबूत दिसते. शैलीबद्ध छोटे सहस्त्रबाहू मंदिर हे मोठ्या मंदिराची प्रतिकृती आहे.

**४.११ मान मंदिर पॅलेस :**



The Man Mandir Palece also known as a Jauhar Kund Palece

मान मंदीर पॅलेसला 'जौहर कुंड पॅलेस' असेही म्हणतात. मानसिंग तोमर यांनी मानमंदिर पॅलेस बांधले. ही वास्तू नाजूक बांधकाम, रंग, आकृतिबंध आणि उकृष्ट कलाकृती याचे सौंदर्यपूर्ण संमिश्रण आहे. याच पॅलेसमध्ये मुघल सम्राटांनी आपल्या प्रतिस्पर्ध्यावर अनेक अत्याचार केले. औरंगजेबाने सुरुवातीला त्याचा भाऊ मुरादला या पॅलेसमध्ये कैद केले आणि नंतर राजद्रोहाच्या कारणावरून त्याची हत्या केली. यास 'जौहर कुंड पॅलेस' असे म्हटले जाते कारण युध्दात ग्वाल्हेरचा पराभव झाल्यानंतर राजघराण्यातील महिला स्वेच्छेने येथे सामुहिकरित्या सती गेल्या होत्या.

**४.१२ कर्ण महाल :**

कर्ण महाल हे ग्वाल्हेर किल्ल्यातील आणखी एक महत्त्वपूर्ण वास्तू आहे. कर्ण महाल तोमर घराण्याचा दुसरा राजा कीर्तीसिंह याने बांधला होता. त्याला कर्णसिंग या नावानेही ओळखले जात होते, म्हणून या महालाचे नाव कर्ण महाल असे पडले.

**४.१३ विक्रम महाल :**

विक्रम महल याला विक्रम मंदिर म्हणूनही ओळखले जाते. एकेकाळी हे शिवाचे मंदिर होते. महाराजा मानसिंग यांचा मोठा मुलगा विक्रमादित्यसिंग याने याचे बांधकाम केले. तो शिवभक्त होता. मुघल काळात हे नष्ट झाले होते परंतु सध्या विक्रम महालाच्या समोरील मोकळ्या जागेत त्याची पुर्नस्थापना करण्यात आली आहे.

**४.१४ भीमसिंह राणाची छत्री :**

गोहद राज्याचा शासक भीमसिंह राणा (१७०७–१७५६) यांचे स्मारक म्हणून ही छत्री बांधण्यात आली आहे. भीमसिंगचा उत्तराधिकारी छत्रसिंह यांनी याचे बांधकाम केले. इ.स. १७५४ मध्ये भीमसिंगने

किल्ल्यावर भीमताल (एक तलाव) बांधला. छत्रसिंहाने भीमतालजवळ छत्रीचे स्मारक बांधले. याचे स्वरूप घुमटाच्या आकाराचा मंडप असे आहे.

ग्वाल्हेर किल्ल्याच्या परिसरात इतरही अनेक स्मारके बांधलेली आहेत. विविध राजकीय व्यक्तींच्या छत्री, शिखांचे गुरुद्वार दाता बंदी छोर, प्रसिध्द शिद्यांची शाळा बांधण्यात आली आहे. ऐतिहासिकदृष्ट्या किल्ल्यास महत्त्वाचे स्थान आहे.

- **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – ०२**

**खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा व वाक्य पुर्ण करा.**

१. ग्वाल्हेर किल्ला ............. राज्यात आहे.

अ. मध्यप्रदेश ब. राजस्थान क. बिहार ड. महाराष्ट्र

२. तेली का मंदिर .............. किल्ल्यावर आहे.

अ. ग्वाल्हेर ब. लाल किल्ला क. जिंजी ड. जंजिरा

३. ग्वाल्हेर किल्ल्यात जैन तीर्थकरांना समर्पित ............... जैन मंदिरे आहेत.

अ. दहा ब. आठ क. आकरा ड. पाच

४. गुजरी महाल राजवाडा ............ यांनी बांधला.

अ. राजा जयसिंग ब. राजा मानसिंग क. रामसिंग ड. यापैकी नाही

५. ग्वाल्हेर किल्ल्याचे बांधकाम .................. यांनी केले.

अ. राजा सुर्यसेन ब. राजा जयसिंग क. राजा मानसिंग ड. रामसिंग

## २.२.३ जिंजीचा किल्ला



**जिंजीचा किल्ला**

जिंजीचा किल्ला तमिळनाडू राज्यातील विल्लुपुरम जिल्ह्यात आहे. तामिळनाडूची राजधानी चेन्नईपासून १६० किलोमीटर अंतरावर हा किल्ला आहे. इंग्रजानी या किल्ल्याला 'ट्रॉय ऑफ द ईस्ट' (Troy of the East) असे संबोधले होते. जिंजी किल्ल्याचा इतिहास इ.स. २०० वर्षापासून आहे. मद्रासमधील ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीचे उच्चपदस्थ अधिकारी कॅलिन मॅकेन्झी यांनी 'कर्नाटक राजांचा संपूर्ण इतिहास' लिहला. त्यामध्ये जिंजी किल्ल्याविषयी माहिती मिळते. मराठी कागदपत्रातील नोंदीमध्ये जिंजी किल्ल्यास 'चंडी' किंवा 'चंजी' असे म्हटले आहे. परंपरेनुसार 'जिंगी' किंवा 'सेंजी' हे नाव सेन्जी अम्मान या कुमारी देवीवरून आले आहे.

राजगिरी, कृष्णगिरी व चंद्रदुर्ग अशा तीन टेकड्यांचा मिळून जिंजीचा किल्ला बनला आहे. राजगिरी टेकडी सर्वात उंच १८३ मी. असून त्याच्या तीन बाजूंनी उंच तुटलेले कडे आणि उत्तरेकडून एक छोटीशी वाट आहे. चक्केली ही लहान टेकडी तिथेच परीसरामध्ये आहे. संरक्षणाच्या दृष्टिने किल्ल्याभोवताली ६० ते ८० फूट रूंद खंदक खोदण्यात आला होता. किल्ल्याभोवती तिहेरी तट असून वर जाण्याची वाट मजबूत व अरुंद आहे. तीन टेकड्यांमध्ये इतर अनेक वास्तू आहेत.

जिंजी किल्ल्याचे बांधकाम ११९० मध्ये करण्यात आले. १३ व्या शतकात किल्ल्याची डागडुजी, काही बदल करून त्यास अभेद्य बनविण्यात आले. शत्रू पक्षाचे आक्रमण रोखण्यासाठी एक मोक्याची जागा म्हणून हा किल्ला बांधण्यात आला. उत्तर तमिळनाडूमधील मुख्य ठाणे म्हणून किल्ल्याचा वापर करण्यात आला होता.

विजापूरच्या नवाबांनी सन १६६० ते १६७७ पर्यंत किल्ला ताब्यात घेतला व त्यास बादशाबाद असे नाव ठेवले होते. मराठ्यांनी हा किल्ला आपल्या ताब्यात आल्यानंतर यास 'चंडी' किंवा 'चंजी' म्हटले. सन १६९८ मध्ये मुघलांचे सरसेनापती नवाब झुल्फिकारखान नुसरत जंग यांनी हा किल्ला ताब्यात घेतला व किल्ल्याचे नाव नुसरतगड ठेवले. नंतर इंग्रज आणि फ्रेंचांनी त्याला जिंजी म्हटले.

किल्ल्यात अनेक प्राचीन प्रेक्षणीय अवशेष असून त्यात दोन कल्याण महाल, कोठारे, स्नानाचे चौरंग, तोफा, कैद्यांची विहीर, मंदिरे, मशिदी, खांब असलेले हॉल आणि पाण्याच्या टाक्या इत्यादी वास्तू आहेत. हा किल्ला कोणी बांधला याबाबत एकमत नसले, तरी बहुधा हा विजयानगरच्या राज्यकर्त्यांनी बांधला असावा, असा तर्क आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी या किल्ल्यास राजगड आणि रायगडनंतर तिसरी राजधानी मानले होते. सन १६७७ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांचे सरदार हरजी राजेमहाडिक यांनी हा किल्ला जिंकला होता. शिवाजी महाराजांनी किल्ल्याच्या आजूबाजूला नवीन तटबंदी बांधली, खड्डे खोदले, बुरुज उभारले. मूळ भिंतीच्या मागे २० फूट रुंद तटबंदी बांधली आणि नियमित अंतराने संरक्षक खोल्या आणि बॅरेक जोडल्या. जिंजीवर मराठयांची २२ वर्षे सत्ता होती.

छत्रपती राजाराम महाराजांनी जिंजीच्या मदतीने हिंदवी स्वराज्याचे रक्षण केले. मराठा स्वराज्यावर संकट आल्यानंतर छत्रपती राजाराम महाराज यांनी जिंजी किल्ल्याचा आश्रय घेतला. संताजी घोरपडे यांनी मोगल

फौजांना रोखून धरल्यामुळे छत्रपती राजाराम महाराजांना रायगड ते जिंजी प्रवास करता आला. शिमोगा येथे मुघलांनी जेव्हा राजाराम महाराज यांच्या सैन्यावर हल्ला केला, तेंव्हा संताजीचे धाकटे बंधू बर्हिजी ह्यांनी राजाराम महाराजांना जिंजीस पोहोचवले. या किल्ल्यात असताना औरंगजेबाचा सरदार झुल्फिकारखान याने जवळ जवळ ८ वर्षे या किल्ल्यास वेढा दिला. किल्ला मोगल सत्तेच्या ताब्यात गेला. नंतर तो कर्नाटकच्या नवाबाकडे गेला. नबाबाकडून १७५० मध्ये हा किल्ला फ्रेंचानी घेतला. त्याची त्यांनी चांगल्याप्रकारे देखभाल केली. तोफखाना व दारूगोळा याचा साठा त्यांनी तेथे केला. अर्कोट गेट व पाँडेचेरी गेट असे दोन दरवाजे त्यांनी बांधले. कर्नाटक युध्दासाठी हा किल्ला महत्वपूर्ण ठरला. ब्रिटीशांच्या ताब्यात जाईपर्यंत जिंजी किल्ला फ्रेंचाचे प्रमुख केंद्र होता. शेवटी ब्रिटीशांनी किल्ला जिंकून घेतला.

### १. राजगिरी टेकडी:

राजगिरी टेकडी यास आनंदगिरी किंवा कमलागिरी टेकडी असेही म्हटले जाते. याची उंची ८०० मीटरच्या आसपास आहे. तीन टेकड्यांपैकी ही सर्वात उंच टेकडी आहे. याच्यावर रंगनाथाचे मंदिर व गर्भगृह आहे. टेकडीकडे जाणाऱ्या मार्गावर कमलाकन्नी देवीचे मंदिर आहे जे किल्ल्यापेक्षा खूप जुने मानले जाते. दुसरे मंदिर देवी सेंजीचे आहे. याच देवीच्या नावावरून किल्ल्याला तसेच आसपासच्या परिसराला जिंजी हे नाव दिले गेले असावे. कमलाकन्नी आणि सेंजी हे सात कुमारी देवींच्या देवतांचे एक भाग आहेत ज्यांची या प्रदेशात पूजा केली जाते.

राजगिरी टेकडीवर दोन धान्य कोठार आहेत, प्रेक्षक हल आणि इंडो इस्लामिक शैलीतील बांधकाम आहे. रंगनाथ मंदिर विजयनगर काळातील आहे. या मंदिराच्या मंडपासमोर सुमारे अकरा फुट लांब व सात फुट घेर असणारी एक मोठी तोफ आहे. वेणुगोपालस्वामी मंदिर, बॅरेक्स, रयल हेरम, महाबुल खानची मशीद, पॅलेस कॉम्प्लेक्स, पट्टाभिराम मंदिर, हवा महल, कल्याण महाल इत्यादी आहे.

### २. कृष्णगिरी टेकडी:

कृष्णगिरी टेकडीवर रंगनाथ देवाचे मंदिर आहे. या टेकडीवरील बांधकामांमध्ये इंडो-इस्लामिक स्थापत्यकलेच्या खुणा दिसून येतात, विशेषत: राजाचा प्रेक्षक हल, घुमटाकार छत आणि सुंदर कोरीव कमानी आहेत. कृष्णगिरी टेकडीवर दोन मोठे धान्याचे कोठार, पायऱ्या असलेल्या विहिरी, एक प्रेक्षक हल दोन मंदिरे आणि महाल दिसून येतो.

### ३. चंद्रदुर्ग:

चंद्रदुर्ग आणि चक्किली दुर्ग हे जवळ जवळ आहेत. या दोन्हीही टेकडीस एकच तटबंदी दिसून येते. लष्करीदृष्टया या महत्वाच्या टेकड्या होत्या. मात्र सध्या तेथिल सर्व अवशेष पडलेले आहेत.

४. **व्यंकटरमणस्वामी मंदिर :**



व्यंकटरमनस्वामी मंदिर तामिळनाडू मधील जिंजी किल्ल्यावरील उत्कृष्ट स्थापत्यशैलीचा नमुना असलेले मंदीर आहे. मंदिर शहरातील सर्वात मोठी व आकर्षक वास्तू आहे. मुथ्यालू नायकाने १५४० ते १५५० मध्ये व्यंकटरामणस्वामी मंदिराचे बांधकाम केले. मंदीरामध्ये तमिळ शिलालेख आहेत. फ्रेंचाच्या ताब्यात १७६१ मध्ये जिंजी किल्ला गेल्यानंतर त्यांनी मंदिराचे काही अखंड सजावटीचे खांब काढून पाँडिचेरीला नेले. मंदीराच्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस महाकाव्य आणि पुराणांमधील दंतकथांच्या कोरीव कमांनी आहेत. रामायणामधील सुप्रसिध्द दृश्ये, विष्णुचे वेगवेगळे अवतार, देव व आसुरांच्या पुराण कथा रेखाटल्या आहेत.

५. **पाण्याची टाकी:**

व्यंकटरमनस्वामी मंदिराच्या जवळ अनैकुलम नावाची एक पाण्याची टाकी आहे. यास हत्ती टाकी असेही म्हणतात कारण याचा वापर हत्तींना आंघोळीसाठी केला जात असे. चक्रकुलम आणि चेट्टीकुलम नावाच्या आणखी दोन टाकी हत्ती टाकीच्या पश्चिमेला आहेत.

६. **सआदत–उल्ला–खानची मशीद:**

जिंजी किल्ल्यावर सआदत–उल्ला–खानची मशीद आहे. या मशीदीमध्ये पर्शियन शिलालेख आहे. ही मशीद १७१७–१८ मध्ये बांधली गेली.

७. **कल्याण महल:**



किल्ल्यातील सर्वात महत्त्वाच्या वास्तूंपैकी एक म्हणजे कल्याण महाल, ज्याला स्थापत्यशास्त्राचा आभूषण मानला जातो. कल्याण महलची रचना आठ मजल्यांची आहे. एका सुंदर बुरुजा सारखी याची रचना आहे. ज्याच्या वरील बाजूस पिरॅमिडिकल शिखर आहे. हे शिखर एका चौकोनी चौथाऱ्यावर वसलेले आहे. याच्या आजूबाजूला अनेक खोल्या आहेत. यामध्ये शाही महिला निवास करत असत. राजगिरी टेकडीवर असलेल्या दोन बारमाही झऱ्यांद्वारे येथे मुबलक पाणीपुरवठा होत असे.

किनाऱ्यालगतच्या प्रदेशावर नजर ठेवणे. युरोपियन व्यापारी शक्तींना आवर घालणे याकरीता जिंजी किल्ला लष्करीदृष्ट्या महत्त्वपूर्ण होता.

- **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – ०३**

**खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा व वाक्य पुर्ण करा.**

१. इंग्रजानी ............... किल्ल्यास 'ट्रॉय ऑफ द ईस्ट' (Troy of the East) असे संबोधले होते.

अ. रायगड ब. प्रतापगड क. जिंजी ड. पन्हाळा

२. व्यंकटरमनस्वामी मंदिर ................. किल्ल्यावर आहे.

अ. रायगड ब. प्रतापगड क. जिंजी ड. पन्हाळा

३. जिंजी किल्यावरील कल्याण महालाचे ............ मजले आहेत.

अ. सात ब. पाच क. आठ ड. चार

४. जिंजी किल्ला ............ राज्यात आहे.

अ. तामिळनाडू ब. केरळ क. महाराष्ट्र ड. गुजरात

५. छत्रपती शिवाजी महाराजांनी .................या किल्ल्यास तिसऱ्या राजधानीचा दर्जा दिला.

अ. विशाळगड ब. प्रतापगड क. जिंजी ड. पन्हाळा

## २.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

- **'ट्रॉय ऑफ द ईस्ट'** (Troy of the East) : हे तुर्कीमधील एक प्राचीन शहर होते. ३६०० BC हा त्याचा कालखंड होता.
- **दुर्ग** : म्हणजे किल्ला होय. संस्कृतमध्ये किल्ल्यांना 'दुर्ग' असे म्हटले जाते.
- **दिवाण–ए–आम** : हा जनतेसाठी बांधलेले सभागृह येथे बादशहा जनतेस संबोधित करत असे.
- **दिवाण–ए–खास** : खाजगी लोकांबरोबर बैठक घेण्यासाठी बांधलेले सभागृह
- **नौबतखाना** : गेट अथवा दरवाजा वरील जागा अथवा खोली जिथे नौबत अथवा इतर वाद्य वाजवले जात असे.
- **बाओली** : पायऱ्या असणारी पाण्याची विहीर

## २.४ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

- **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – ०१**

**खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा व वाक्य पुर्ण करा.**

१. ब. लाल किल्ला
२. ब. शहाजहान
३. अ. शहाजहान
४. अ. खाजगी लोकांकरीता
५. अ. अकबर

- **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – ०२**

**खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा व वाक्य पुर्ण करा.**

१. अ. मध्यप्रदेश
२. अ. ग्वाल्हेर
३. क. अकरा
४. ब. राजा मानसिंग
५. अ. राजा सुर्यसेन

- **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – ०३**

**खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा व वाक्य पुर्ण करा.**

१. क. जिंजी
२. क. जिंजी
३. क. आठ
४. अ. तामिळनाडू
५. क. जिंजी

## २.५ सारांश

शत्रूंपासून संरक्षण करण्यास सुलभ जावे आणि सभोवतालच्या प्रदेशावर नियंत्रण ठेवता यावे म्हणून प्राचीन व मध्ययुगीन कालखंडात किल्ले बांधले गेले. किल्ल्यावर किंबहुना किल्ल्याच्या सभोवताली घरे, मंदिरे, नगरे वसली व त्यास तटबंदी वा कोट बांधून सुरक्षित ठेवले गेले. शत्रूचा हल्ला झाल्यास नागरिकांना त्वरित संरक्षण मिळावे व शत्रूशी मुकाबला करण्यास सोयीचे व्हावे हा यामागील मुख्य हेतू होता.

आग्रा शहरात असणारा लाल किल्ला मध्ययुगीन कालखंडातील महत्वाचा किल्ला होता. सन १६३८ पर्यंत मुघलांची राजधानी आग्रा होती तोपर्यंत मोघल राजघराण्यातील शासकांचे मुख्य निवासस्थान हा किल्ला होता. काही काळ हा किल्ला मराठ्यांच्या ताब्यात होता. त्यानंतर तो ब्रिटीशांच्या ताब्यात गेला. स्थापत्याच्या दृष्टीने आग्रा किल्ला महत्वपूर्ण आहे.

मध्यप्रदेशातील ग्वाल्हेर किल्ला ऐतिहासिकदृष्ट्या महत्वाचा आहे. ग्वाल्हेरवर प्राचीन कालखंडात मौर्य, शुंग, कुशाण, हूण, पाल, प्रतिहार घराण्यातील राज्यकर्त्यांनी राज्य केले. मध्ययुगीन कालखंडात लोदी घराणे, सुरी घराणे, जाट घराण्याची सत्ता होती. मराठा राजवटीमध्ये मराठयांनी ग्वाल्हेर किल्ल्यावर आपले वर्चस्व निर्माण केले होते. मराठा साम्राज्याचे सरदार महादजी शिंदे यांनी ग्वाल्हेर किल्ल्यावर आपले वर्चस्व प्रस्थापित करून आपले प्रमुख लष्करी ठाणे बनवले होते. सध्या ग्वाल्हेर हे मध्यप्रदेशातील एक प्रमुख पर्यटन स्थळ आहे.

तामिळनाडू मधील जिंजी किल्ला अभेद्य व ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचा किल्ला मानला जातो. छत्रपती शिवाजी महाराजांनी या किल्ल्यास राजगड आणि रायगडनंतर तिसरी राजधानी मानले होते. छत्रपती राजाराम महाराजांनी जिंजीच्या मदतीने हिंदवी स्वराज्याचे रक्षण केले. मराठ्यांकडून हा किल्ला औरंगजेबाचा सरदार झुल्फिकारखान याने जिंकून घेतला व किल्ला मोगल सत्तेच्या ताब्यात गेला. नंतर तो कर्नाटकच्या नवाबाकडे गेला. १७५० मध्ये किल्ला फ्रेंचानी नबाबाकडून घेतला. शेवटी ब्रिटीशांनी किल्ला जिंकून घेतला. युरोपियन व्यापा-यांचा बंदोबस्त करण्याकरीता जिंजी किल्ला लष्करीदृष्ट्या महत्वपूर्ण होता.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

**अ) टिपा लिहा.**

१. आग्रा किल्ल्यावरील दरवाजे

२. लाल किल्ला, आग्रा किल्ल्यावरील विविध वास्तू

३. मोती मस्जीद

४. ग्वाल्हेर किल्ल्याचा इतिहास

५. ग्वाल्हेर किल्ल्याची रचना

६. मान मंदिर पॅलेस

७. ग्वाल्हेर किल्ल्यावरील जैन मंदिरे

८. तेली का मंदिर

९. सास-बाहू मंदिर

१०. व्यंकटरमणस्वामी मंदिर

**ब) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. आग्रा येथिल लाल किल्ल्याविषयी सविस्तर माहिती लिहा.

२. ग्वाल्हेर किल्ल्याविषयी सविस्तर वर्णन करा.

३. मराठ्यांची तिसरी राजधानी मानलेल्या जिंजी किल्ल्याचे विश्लेषण करा.

## २.७ संदर्भ ग्रंथ :


- ग्वाल्हेर विरासत, पुरातत्व संचालनालय, अभिलेखागार आणि संग्रहालय, बाणगंगा रोड, भोपाळ, मध्य प्रदेश, भारत.
- चौतन्य सक्सेना, ग्वाल्हेर के निशान, पुरातत्व संचालनालय, अभिलेखागार आणि संग्रहालय, मध्य प्रदेश, भारत, २००२.
- चौतन्य सक्सेना, गुजरी महल संग्रहालय, पुरातत्व संचालनालय, पुरातत्त्व आणि संग्रहालय विभाग, मध्य प्रदेश, २००२.
- कृष्णन व्ही.एस., मध्य प्रदेश जिल्हा गॅझेटियर, ग्वाल्हेर
- ॲलन, मार्गारेट प्रोसर, भारतीय वास्तुशास्त्रातील अलंकार, ग्वाल्हेर किल्ला, १९९१
- जिंजी आणि त्याचे स्मारके, पुरातत्व सर्वेक्षण भारत, चेन्नई.
- पुरातत्व स्मारके, तमिळनाडू आणि पाँडिचेरी, चेन्नई.
- Agra Fort & World Heritage Centre"- UNESCO-ORG
- Agra Fort, Uttar Pradesh – Archaeological Survey of India, 1983.
- Verma Amrit, Forts of India-New Delhi : The Director of Publication Division, Ministry of Information and Broadcasting, Govt. of India, 1985.


❑❑❑